**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सूर्यकांत साहेबराव जाधव
९०, गणराया हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
शाहुपुरी, ता.व जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,
लष्कर पाणी पुरवठा केंद्र, पोवई नाका,
सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
कृष्णानगर, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५६/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग,<br>सातारा श्री.संजय अनंत मोडक<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,<br>लष्कर पाणी पुरवठा केंद्र, पोवई नाका,<br>सातारा श्री.एस.एस.सप्रे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** घरगुती व व्यवसायिक पाणी पुरवठयाच्या दर आकारणीबाबतची माहिती | |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.सूर्यकांत साहेबराव जाधव यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.४.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सातारा यांच्याशी झालेल्या चर्चेमध्ये माझे पूर्ण समाधान झाल्याने मी आयोगाकडे दाखल केलेले अपील मागे घेत आहे', असे अपीलकर्ता श्री.जाधव यांचे निवेदन सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सातारा श्री.एस.एस.सप्रे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ५जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भरत किसन देसाई
मु.आणे, पो.कोळे, **अपीलकर्ता**
ता.कराड, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,**
जिल्हा रुग्णालय, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी प्रशासकीय अधिकारी,**
जिल्हा रुग्णालय सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०२/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी प्रशासकीय अधिकारी,**<br>जिल्हा रुग्णालय सातारा<br>डॉ.ज्ञानेश्वर रामचंद्र शितोळे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००४ पासून जिल्हा रुग्णालय, सातारा येथे करण्यात आलेल्या विविध शस्त्रक्रिया, रुग्णांची नावे, ॲडमिट फॉर्म, केस पेपर, डॉक्टरांची नावे तद्नुषंगिक एकूण १८ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भरत किसन देसाई यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.४.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेल्या माहितीच्या छायाप्रती मला प्राप्त झालेल्या आहेत. त्याबाबत माझी काही तक्रार नाही. माझ्या अपिलावर ठेवण्यात आलेली सुनावणी रद्द करावी', असे अपीलकर्ता श्री.देसाई यांचे निवेदन सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय, सातारा डॉ.ज्ञानेश्वर रामचंद्र शितोळे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ५ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भरत किसन देसाई
मु.आणे, पो.कोळे, **अपीलकर्ता**
ता.कराड, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी अधीक्षक अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु मंडल, प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
विद्युत भवन, कृष्णानगर, सातारा-४१५००३

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु मंडल, प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
विद्युत भवन, कृष्णानगर, सातारा-४१५००३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६०/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु मंडल, प्रशासकीय इमारत, पहिला मजला,<br>विद्युत भवन, कृष्णानगर, सातारा-४१५००३<br>श्री.एम.बी.जाधव | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी अधीक्षक अभियंता,**<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु मंडल, प्रशासकीय इमारत, पहिला मजला,<br>विद्युत भवन, कृष्णानगर, सातारा-४१५००३<br>श्री.एस.के.पाटील |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००४-१० या कालावधीत महावितरण, सातारा सर्कलने राबविलेले कार्यक्रम, योजना त्यासाठी झालेला खर्च तद्नुषंगिक एकूण ८ मुद्दे |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भरत किसन देसाई यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.४.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, संवसु मंडल, सातारा यांच्याकडून समक्ष पाहण्यास मिळाली व आवश्यक छायाप्रती देखील मला प्राप्त झाल्या आहेत. त्याबाबत माझी काही तक्रार नाही. कृपया, आपण दि.४.१.२०११ रोजी ठेवलेली सुनावणी रद्द करावी', असे अपीलकर्ता श्री.देसाई यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी अधीक्षक अभियंता, सातारा मंडल, सातारा यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ५ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

श्री.विजय निवृत्ती वाघमारे
स.नं.२८१, वाकड गावठाण, वाकड,
ता.मुळशी, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,मुळशी,
मुळशी तहसील कार्यालय,
ता.मुळशी, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,मुळशी,
मुळशी तहसील कार्यालय,
ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९२/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २१.०५.२०१० |

**शुध्दीपत्रक**

**वाचा :- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि.०४.०९.२०१०**

सदर अपिलावर आयोगाने पारित केलेल्या दि.०४.०९.२०१० च्या आदेशामधील अनुक्रमांक ३ येथील उपस्थितीमध्ये जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,मुळशी,मुळशी तहसील कार्यालय,ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर घाडगे उपस्थित असल्याचे आदेशामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून श्री.किशोर घाडगे यांचा उल्लेख करण्यात आला असून त्याना आदेशित करण्यात आले आहे. श्री.किशोर घाडगे यांचा उल्लेख चुकीने करण्यात आलेला आहे. श्री.किशोर घाडगे हे सुनावणीस गैरहजर होते. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी तहसील कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून पुरवठा निरीक्षक, मुळशी, पुणे श्री.रोहिदास जाधव हे

सुनावणीस उपस्थित असल्याने उपस्थितीमधील, तसेच आदेशातील श्री.किशोर घाडगे यांच्या नावाचा उल्लेख  वगळण्यात येत आहे.

आदेशातील अनुक्रमांक ३ येथील उपस्थितीमध्ये, तसेच आयोगाच्या आदेशामध्ये (आदेश क्र.२) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी तहसील कार्यालय,ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर घाडगे ऐवजी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी तहसील कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे यांचे प्रतिनिधी पुरवठा निरीक्षक, मुळशी, पुणे श्री.रोहिदास जाधव असे वाचण्यात यावे. या दुरुस्तीसह आयोगाचे यापूर्वीचे म्हणजेच दि.०४.०९.२०१० रोजीचे आदेश कायम ठेवण्यात येत आहेत.

**स्थळ : पुणे**
**दि.   ७ जानेवारी २०११**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दशरथ नानासाहेब राऊत
मु.पो.खांडज, ता.बारामती, जि.पुणे-४१३११६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ,
माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे-४१३११५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ,
माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे-४१३११५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दशरथ नानासाहेब राऊत<br>मु.पो.खांडज, ता.बारामती, जि.पुणे-४१३११६ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शिवनगर विद्या प्रसारक मंडळ या संस्थेकडे मागितलेल्या माहितीबाबत आपण पाच अपिले आयोगाकडे केली आहेत. संस्थेच्या तंत्रनिकेतनची माहिती न मिळाल्यामुळे प्रस्तुत अपील केले आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.दशरथ नानासाहेब राऊत यानी केले.

संस्थेचे तंत्रनिकेतन कायमस्वरूपी विनाअनुदानित आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच) मधील तरतुदीनुसार ते सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यामुळे उक्त अधिनियम लागू होत नाही, असे लेखी निवेदन संस्थेचे सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे यानी सादर केले. ते लक्षात घेता संदर्भित तंत्रनिकेतन संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तसेच अपीलकर्त्यांनी बहुसंख्य मुद्दयांमध्ये खुलासा, स्पष्टीकरण, आगामी संभाव्य कार्यवाही अशा स्वरूपाची विचारणा केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील माहितीच्या व्याख्येत समाविष्ट होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.विमल बाळासाहेब चोखर
एच-२, २५८७, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे परिमंडळ, ब्लॉक २०८, रास्ता पेठ, पुणे-४११०११ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे परिमंडळ, ब्लॉक २०८, रास्ता पेठ, पुणे-४११०११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.विमल बाळासाहेब चोखर
एच-२, २५८७, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे-४११००६

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे परिमंडळ, ब्लॉक २०८, रास्ता पेठ, पुणे श्री.आत्माराम बाबूराव खांडेकर
तत्कालीन-श्रीमती मनिषा ज.प्रयाग

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या पथकाने आपल्याशी गैरवर्तन केल्याबाबतची तक्रार आपण केली होती. त्यांच्यावरील कारवाईबाबतची माहिती एकतर्फी व चुकीची दिली. संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक असताना केली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ.विमल बाळासाहेब चोखर यानी केली.

अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती संबंधित विभागांकडून मागवून घेऊन निःशुल्क दिली. त्यांच्या तक्रारीबाबत कार्यकारी अभियंता यानी चौकशी करून दिलेल्या अहवालाची प्रतही त्याना दिली. विजेची चोरी लपविण्यासाठी अधिकाऱ्यांविरूध्द खोटी तक्रार अपीलकर्त्या व त्यांचे पती यानी केली असून हा माहितीच्या अधिकाराचा दुरूपयोग आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे परिमंडळ, ब्लॉक २०८, रास्ता पेठ, पुणे श्री.आत्माराम बाबूराव खांडेकर यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश मारूती बोऱ्हाडे
६, प्रभा अपार्टमेंट, कोहिनूर कॉलनी, स.नं.८८/१८१(१ ते ६),
प्लॉट नं.ए/५/बी, सि.स.नं.१२९३बी, सहकारनगर नं.२, पेठ पर्वती, पुणे-९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.३,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग क्र.३,
टिळक रोड, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश मारूती बोऱ्हाडे
६, प्रभा अपार्टमेंट, कोहिनूर कॉलनी, स.नं.८८/१८१(१ ते ६),
प्लॉट नं.ए/५/बी, सि.स.नं.१२९३बी, सहकारनगर नं.२, पेठ पर्वती, पुणे-९

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग क्र.३,
टिळक रोड, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रमेश रोहिदास वाघमारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका इमारतीचा मूळ व अंतिम नकाशा यात तफावत असून बेकायदेशीर बाबींबाबत कारवाई केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश मारूती बोऱ्हाडे यानी केली.

संबंधित बांधकाम जुने असून नकाशे अभिलेखात शोध घेऊनही उपलब्ध नसल्यामुळे देता आले नाहीत. अन्य संबंधितांकडून ते प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला असून आजच प्रती देण्यात येतील, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग क्र.३, टिळक रोड, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रमेश रोहिदास वाघमारे यानी केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती अन्य ठिकाणाहून प्राप्त करून घेऊन देण्यात येत असून त्यांच्या तक्रारी हा माहितीच्या अधिकारातील निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

सुधा. आदेश

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री.शाम आबा अहिवळे,
११५-अ, मंगळवार पेठ,
फलटण, जि. सातारा
.. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
कृषी विभाग फलटण, ता. फलटण जि. सातारा.

.. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
दहिवडी, ता.माण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०३/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २०.११.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,<br>कृषी विभाग फलटण, ता. फलटण जि. सातारा<br>श्री.आर.एच.सरतापे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,<br>दहिवडी, ता. माण जि. सातारा<br>श्री.राजेंद्र बा.माने | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री.शाम आबा अहिवळे यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारीत केलेल्या दि.२२ मार्च २०१० च्या आदेशामधील अ.क्र.२ मध्ये १) श्री.व्ही. व्ही. कुलकर्णी, दहिवडी २) श्री. बी.जी.कदम, मलवडी ३)

श्री.एस.पी.वाघ, वरकुटे मलवडी ४)श्री.आर.एल.घोळवे, मार्डी ५) श्री.व्ही.सी.गमरे, म्हसवड यांना प्रत्येकी रु.८०००/- याप्रमाणे शास्ती करण्यात आली आहे.

या संदर्भात श्री.कदम यानी आयोगास दि.२६.४.२०१० रोजी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला होता. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा यानी दि. २२.१०.२०१० च्या पत्रान्वये अहवाल सादर केला असून त्यामध्ये श्री.आर.बी.माने, तालुका कृषी अधिकारी, दहिवडी यानी द्वितीय अपिलानंतर अयोग्य पध्दतीने त्यांच्या बचावासाठी अभिलेख तयार केले असून सदर प्रकरणी श्री.आर.बी.माने, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, दहिवडी हे पूर्णतः दोषी असून श्री.कदम यांच्यावर लादलेली शास्ती श्री.आर.बी.माने यांच्यावर निश्चित करण्याची शिफारस चौकशी अंती नमूद केली आहे. श्री.अहिवळे यांचा दि.३.४.२००९ चा माहिती-मागणी अर्ज जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी दहिवडी, जि.सातारा यांना दि.८.४.२००९ रोजी प्राप्त झाला आहे. सदर माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी श्री.आर.बी.माने यांनी ३० दिवसात अर्जदारास माहिती देणे आवश्यक होते. तथापि अर्जदारास ही माहिती प्रत्यक्षात दि.१५.६.२००९ रोजी देण्यात आली आहे. त्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास दि.८.५.२००९ ते १५.६.२००९ असा ३९ दिवस इतका विलंब झाला आहे. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा यांनी सादर केलेला अहवाल विचारात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार याविलंबास जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी दहिवडी, जि.सातारा श्री.आर.बी. माने हे शास्तीस पात्र ठरतात.

जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा यांचा चौकशी अहवाल विचारात घेता आयोगाचा सुधारित आदेश पुढील प्रमाणे :

## <u>सुधारित आदेश</u>

१. १) श्री.व्ही. व्ही. कुलकर्णी, दहिवडी २) श्री. बी.जी.कदम, मलवडी ३) श्री.एस.पी.वाघ, वरकुटे मलवडी ४)श्री.आर.एल.घोळवे, मार्डी ५) श्री.व्ही.सी.गमरे, म्हसवड यांना प्रत्येकी रु.८०००/- याप्रमाणे करण्यात आलेली शास्ती रद्द करण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी माहिती देण्यास दि.८.५.२००९ ते १५.६.२००९ अशा ३९ दिवस झालेल्या विलंबास जबाबदार श्री.आर.बी.माने, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, दहिवडी, जि.सातारा हे असल्याने त्याना प्रतिदिन रु.२५०/- या प्रमाणे ३९ दिवसांकरिता रु.९७५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही

अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी विभाग, फलटण जि.सातारा यानी करावी.

३. सदर प्रकरणी खोटी कागदपत्रे सादर करुन आयोगाची दिशाभूल केल्याबद्दल श्री.आर.बी.माने तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, दहिवडी, जि.सातारा यांचे विरुध्द जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा यांनी शिस्तभंगाविषयक कारवाई करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. - 7 JAN 2011

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ .

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कैलास गुलाबराव साळवी
सर्व्हे नं.२७, चंद्रमानगर, येरवडा,
पुणे ४११ ००६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ज्ञ,
५ फोटोझिंको पथ, पुणे ४११ ००१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ज्ञ,
५ फोटोझिंको पथ, पुणे ४११ ००१
येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.०५.२०१० |

**शुध्दीपत्रक**

**वाचा :- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि. २९.०७.२०१०**

सदर अपिलावर आयोगाने पारित केलेल्या दि.२९.०७.२०१० च्या आदेशामध्ये उत्तरवादीमध्ये

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापक,
येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६

**माहिती अधिकारी,**
येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६

असे नमूद करण्यात आले आहे. त्या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ज्ञ,
५ फोटोझिंको पथ, पुणे ४११ ००१

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ज्ञ,
५ फोटोझिंको पथ, पुणे ४११ ००१

तसेच आदेशामधील अनुक्रमांक ३ येथील उपस्थितीमध्ये

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापक,
येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६ श्री.न.म.गोटे

**माहिती अधिकारी,**
येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६ श्री.बी.चव्हाण

असे नमूद करण्यात आले आहे. त्या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

**जन माहिती अधिकारी,**
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ज्ञ,
५ फोटोझिंको पथ,
पुणे ४११ ००१ श्री.आर.व्ही.दवने यांचे प्रतिनिधी श्री.ज्ञा.शि.रघतवान

उपरोक्त दुरुस्तीसह आयोगाचे यापूर्वीचे म्हणजेच दिनांक २९.०७.२०१० रोजीचे आदेश कायम ठेवण्यात येत आहेत.

**स्थळ : पुणे**
**दि. १७ जानेवारी २०११**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक नेमचंद दोशी
मु.पो. गुजर गल्ली, ता.करमाळा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा,
ता.करमाळा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत सहकारी संस्था मर्यादित, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा,
ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.संतोष बी.शिरशेटवार

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत सहकारी
संस्था मर्यादित, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.नासीर शमसुद्दीन कबीर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत सहकारी संस्था मर्यादित, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर संस्थेविषयीची माहिती अपीलकर्ता श्री.अशोक नेमचंद दोशी यानी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा या कार्यालयाकडे मागितली होती. त्यानी अर्ज आपल्या कार्यालयाकडे वर्ग केला. अर्जदार व्यक्तिशः माहिती नेणार असल्यामुळे माहिती तयार असल्याचे विहित मुदतीत लेखी व तोंडीही कळविले. परंतु त्यानी माहिती नेली नाही. तसे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर याना कळवून त्यांच्यासमक्ष अपीलकर्त्यास माहिती देऊन पोहोच घेतली व नंतर टपालानेही पाठविली. त्यांच्या बेकायदेशीर मोबाईल टॉवरला संस्था ना-हरकत प्रमाणपत्र देत नसल्यामुळे त्रास देण्यासाठी ते अशा प्रकारचे अर्ज करून माहितीच्या अधिकाराचा दुरूपयोग करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत सहकारी संस्था मर्यादित, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.नासीर शमसुद्दीन कबीर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.संतोष बी. शिरसेटवार यानी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र कोंडिबा महाजन
मु.पो.महूद बु., ता.सांगोला, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे-११ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग,
फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे
प्रतिनिधी श्री.एस.पी.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग,
फलटण, जि.सातारा श्री.यु.डी.कोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामचंद्र कोंडिबा महाजन यानी सन १९७६ ते १९७८ या काळातील रोजगार हमी योजनेमधील हजेरीपट, वेतन इ.बाबतची स्वतःच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. उपलब्ध माहिती त्याना देण्यात आली असून दहा वर्षे जतनाचा कालावधी असलेल्या कागदपत्रांच्या प्रती आता त्याना देता येणार नाहीत, असे त्याना स्पष्ट केले आहे. ३८ वर्षांपूर्वीची माहिती असल्यामुळे शोधून देण्यास काही प्रमाणात विलंब झाला. वेळोवेळी माहिती दिल्याची त्यांची पोहोच दप्तरी आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.यु.डी.मोरे यानी संबंधित पोहोचपत्राच्या प्रतीसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मच्छिंद्र रामचंद्र पवार
देवीचा माळ, ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा,
ता.करमाळा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, करमाळा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९२ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मच्छिंद्र रामचंद्र पवार
देवीचा माळ, ता.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा,
ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.संतोष बी.शिरशेटवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर यानी माहिती देण्याचा आदेश देऊन दोन वर्षे झाली तरी करमाळा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर या संस्थेकडून माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मच्छिंद्र रामचंद्र पवार यानी केली.

काही कागदपत्रांच्या प्रती दिल्याचे संस्थेच्या सचिवानी प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान सांगितले होते. ऊर्वरित माहिती देण्याचे आदेश त्यावेळी दिले होते, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.संतोष बी. शिरशेटवार यानी नमूद केले. संस्थेला कोणतेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहाय्य वा अनुदान शासनाकडून मिळत नसल्याचे त्यानी स्पष्ट केले. ते लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही, म्हणून तिला हा कायदा लागू होणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमाकांत आप्पासाहेब वीर
८६५/३४, 'व्यंकटेश' रिंग रोड, कळंबा, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९१ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमाकांत आप्पासाहेब वीर
८६५/३४, 'व्यंकटेश' रिंग रोड, कळंबा, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ प्रतिनिधी श्री.पी.डी.बच्छाव

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ श्री.पी.डी.बच्छाव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

रजिस्ट्रार पदाची सुधारित वेतनश्रेणी आपल्याला नाकारली गेली त्याबाबत कोणतीही माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमाकांत आप्पासाहेब वीर यानी केली.

श्री.वीर यांची ही तक्रार जुनी असून त्यांना वेतनश्रेणी नाकारण्याबाबत सर्व माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे. त्याच संदर्भात २२ वेळा माहितीच्या अधिकारात त्यानी अर्ज केले असून केवळ त्रास देण्यासाठी ते या अधिकाराचा दुरूपयोग करीत असल्याचे त्यानाही कळविले आहे. शासनाने त्यांच्या मागणीबाबत अंतिम निर्णय घेतला असून राज्य माहिती आयोगानेही या संदर्भातील त्यांचे अपील यापूर्वी फेटाळले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.पी.डी.बच्छाव यानी पूरक कागदपत्रांसह केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र नागाप्पा पाटील
मु.पो.चिखली, ता.कागल, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री जनता ववविध कार्यकारी सहकारी(विकास),
सेवा संस्था मर्यादित, खिली (नानीबाई), ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६८४ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र नागाप्पा पाटील
मु.पो.चिखली, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.सुनिल सुधाकर सिंगतकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

श्री जनता विविध कार्यकारी सहकारी (विकास), सेवा संस्था मर्यादित, चिखली (नानीबाई), ता.कागल, जि.कोल्हापूर या संस्थेच्या सचिवांनी माहिती दिली नाही. नक्कल शुल्क आकारून माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यानी देऊनही माहिती मिळाली नाही. विलंब झाल्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.राजेंद्र नागाप्पा पाटील यानी केली.

श्री.पाटील यानी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून सचिवानी आपल्या आदेशानंतर शुल्क कळविले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रीट पिटीशन क्र.५२९४/२००८, दि.२८.४.२००९ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. परंतु सहकार कायद्याच्या कलम ३२ प्रमाणे सभासद म्हणून माहिती मागता येते, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.सुनिल सुधाकर सिंगतकर यानी केले.

संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्यामुळे विषय या कायद्याच्या कक्षेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक महादेव कांबळे
मु.पेरीड, पो.शिरगांव, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०८ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक महादेव कांबळे
मु.पेरीड, पो.शिरगांव, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी,
ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन २००६ ते २००९ या काळातील ताडपत्री, सौर कंदील आदि पुरवठ्याबाबतची माहिती मागितली होती. ती मिळाली नसल्याचे तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक महादेव कांबळे यानी केली.

माहिती तयार असल्याचे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले होते. परंतु त्यानी माहिती नेली नाही. प्रथम अपिलाच्या वेळी त्यानी माहिती टपालाने देण्याची मागणी केली. माहिती तयार आहे. शुल्क व टपालखर्च भरल्यानंतर ती देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.आबासाहेब हरी पवार यानी केले.

अपीलकर्त्याने प्रथम व्यक्तिशः माहिती नेणार असल्याचे म्हटले होते. नंतर ती टपालाने पाठविण्याची मागणी केली. जन माहिती अधिकारी यानी त्वरित शुल्क कळवून त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक होते याची समज जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.आबासाहेब हरी पवार याना देण्यात येत आहे. तयार असलेली माहिती अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क भरून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- १० जानेवारी २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.परशराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (उद्योग),
पंचायत समिती, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत हाजगोळी खुर्द,
ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६१ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.परशराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (उद्योग),
पंचायत समिती, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.मारूती लक्ष्मण दळवी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत हाजगोळी खुर्द, ता.आजरा, जि.कोल्हापूर
विद्यमान-श्री.बाळू आप्पा खवरे, तत्कालीन-श्रीमती मनिषा संपतराव चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जागेच्या बेकायदेशीर नोंदीसंबंधात ग्रामपंचायतीकडून माहिती मिळाली नाही. तहसीलदारांकडे केलेला अर्ज त्यानी गटविकास अधिकाऱ्यांकडे वर्ग केला. ग्रामसेवक व तहसीलदार यानी माहिती दिली, परंतु ती अपूर्ण आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.परशराम बंडू पाटील यानी केले.

दप्तरी उपलब्ध असल्यानुसार सर्व माहिती दिली, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत हाजगोळी खुर्द, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्रीमती मनिषा संपतराव चव्हाण यानी केले. मंडल अधिकाऱ्यांना पत्र देऊन तहसील कार्यालयाकडील माहिती दिली, असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.मारूती लक्ष्मण दळवी यानी सांगितले.

संबंधित नोंदी बेकायदेशीर असल्याची अपीलकर्त्याची तक्रार असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. त्या संबंधातील माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. तहसील कार्यालयातील अभिलेखांचे अवलोकन करून आवश्यक असल्यास अधिक तपशील अपीलकर्त्यास प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय भीमाशंकर रत्नपारखी
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्या नगरी,
मुंबई विद्यापीठ, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-९८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२२२२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२२२२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०९ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.संजय भीमाशंकर रत्नपारखी<br>डी-१६, शिक्षक वसाहत, विद्या नगरी, मुंबई विद्यापीठ, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-९८ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने आपल्याला पीएच.डी. नाकारली. या निर्णयाच्या संदर्भात २२ प्रश्न आपण उपस्थित केले होते. त्यांचे समाधानकारक उत्तर जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री,

गंगापूर धरणाजवळ, नाशिक यांच्या पातळीवर मिळाले नाही. १४००० रूपये शुल्क भरून ७००० पृष्ठांची माहिती आपल्याला मिळाली. परंतु ती अपूर्ण आहे. त्या संदर्भातील अभिलेखांचे अवलोकनही केले असून योग्य उत्तर दिले जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.संजय भीमाशंकर रत्नपारखी यानी केले. आपल्या प्रबंध मान्यतेच्या संदर्भात आपण त्या त्या वेळच्या कुलगुरूंना भेटून केलेल्या चर्चेचा व पत्रव्यवहाराचा तपशील श्री.रत्नपारखी यानी दि.२९.१०.२०१० च्या आयोगाला सादर केलेल्या निवेदनामध्ये दिला आहे. आपल्या प्रबंध मान्यतेबाबत व्यवस्थापन परिषदेसमोर विषय ठेवून निर्णय घेण्याचे आश्वासन विद्यमान कुलगुरूंनी दिले होते. त्याबाबत काहीही कळविलेले नाही, असे त्यानी या निवेदनात म्हटले आहे.

श्री.रत्नपारखी यांच्या अर्जाला मुद्देनिहाय उत्तर देऊन परीक्षापध्दतीविषयीची गोपनीय माहिती वगळता सर्व माहिती दिली आहे, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक श्री.प्रफुल्ल चिकेरूड व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक डॉ.प्रकाश आतकरी यानी पूरक कागदपत्रांसह सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी योग्य कार्यवाही केली असून अपीलकर्त्याच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संतोष दिगंबर कुलकर्णी
१५५२, वाणी प्लॉट, आगळगांव रोड, **अपीलकर्ता**
कॅन्सर हॉस्पिटल जवळ, मु.पो.ता.बार्शी,
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक,**
सोलापूर ग्रामीण, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
बार्शी विभाग, बार्शी,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**<br>बार्शी विभाग, बार्शी, जि.सोलापूर<br>श्री.ए.बी.बंडगर | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करुन वसूल करण्यात आलेल्या दंडाबाबतची माहिती, तसेच बार्शी विभागातील तडीपार आरोपींबाबतची माहिती, तदनुषंगिक एकूण ६ मुद्दे | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.संतोष दिगंबर कुलकर्णी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्यात यावे, माझी काहीही तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री.कुलकर्णी यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी विभाग, जि.सोलापूर श्री.ए.बी.बंडगर यानी सुनावणीच्या वेळी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ११ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष शंकर बावकर
मु.पो.नातेपुते, ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय
आवार, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख,
माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४९ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष शंकर बावकर
मु.पो.नातेपुते, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री.ज. व.निकम

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख,
माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.के.बी.मदने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जमीन मोजणीबाबत आपण वारंवार मागणी करूनही तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, माळशिरस यांच्या कार्यालयाकडून योग्य कार्यवाही केली जात नाही. त्यानी दाखविलेल्या जमिनीच्या हद्दी आपल्याला मान्य नाहीत. त्यामुळे योग्य प्रकारे मोजणी होऊन समाधानकारक माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुभाष शंकर बावकर यानी केली.

श्री.बावकर यांच्या मोजणीबाबतच्या अर्जावरील कार्यवाहीला विलंब झालेला नाही. दाखविलेल्या हद्दी त्याना मान्य नसून त्याबाबत उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयाच्या स्तरावरील कार्यवाहीही पूर्ण झाली आहे. पुनःपुन्हा त्याच बाबीसाठी श्री.बावकर अर्ज व पत्रव्यवहार करून, तसेच स्थानिक राजकीय दबाव आणून शासकीय यंत्रणेला वेठीला धरत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माळशिरस, जि.सोलापूर श्री.के.बी.मदने यानी केले.

याच मागणीबाबतची श्री.बावकर यांची अ.क्र.९८५/२०१०/सोलापूर व १२४२/सोलापूर ही अपिले यापूर्वी आयोगाने निकाली काढलेली आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जि.सोलापूर श्री.ज.व.निकम यानी नमूद केले.

अपीलकर्त्यांची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ जाजेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय पांडुरंग धारूरकर
घ.नं.२५०८/ब, दर्शन मंडपाजवळ, महाद्वार, मु.पो.ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, नगरपरिषद, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१९३ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय पांडुरंग धारूरकर
घ.नं.२५०८/ब, दर्शन मंडपाजवळ, महाद्वार, मु.पो.ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.रविंद्र जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, नगरपरिषद, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.एस.एस.भावी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

इमारत धोकादायक झाल्यामुळे पाडण्याबाबतची नोटीस नगरपरिषदेने आम्हाला दिली होती. त्यावर नगरपरिषदेला इमारत पाडण्यास कळविणारी नोटीस आपण दिली. परंतु त्यानुसार कोणतीही कार्यवाही नगरपरिषदेने केली नाही. स्मरणपत्रे देऊनही कार्यवाहीबाबतची वस्तुस्थिती कळविली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय पांडुरंग धारूरकर यांचे प्रतिनिधी ॲड.सार्थक चिवरी यानी केली.

भाडेकरूंकडून इमारतीचा ताबा काढून मालक म्हणून आपल्याला द्यावा, नगरपरिषदेतर्फे इमारत पाडावी, अशी श्री.धारूरकर यांची मागणी मागणी आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही, असे त्याना स्पष्ट केले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगरपरिषद, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.एस.एस.भावी व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.रविंद्र जाधव यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र सिताराम शिंदे
मु.पो.जातेगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (संवसु), महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी, बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी, करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र सिताराम शिंदे
मु.पो.जातेगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (संवसु), महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी, बार्शी, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.आर.डी.गाढवे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी, करमाळा, जि.सोलापूर श्री.अमजदअली जाफरअली

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

नियमबाह्य पध्दतीने दिलेल्या वीज जोडणीबाबतची माहिती अपुरी व चुकीची दिली. नमूद गट क्रमांकामध्ये व एका मिळकतधारकाच्या वीजपुरवठ्यातील कोटेशन व बिले यात बरीच तफावत असून माहिती खोटी आहे. कागदपत्रे खोटी आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रविंद्र सिताराम शिंदे यानी केली.

अभिलेखानुसार उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता याना दिली. कार्यालय स्तरावर उपलब्ध नसलेली माहिती नंतर प्राप्त करून घेऊन पुरविली, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, करमाळा, जि.सोलापूर श्री.अमजदअली जाफरअली यानी नमूद केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्याच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय साहेबराव भोंगळे
माळीनगर, गट नं.२, ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
अकलूज विभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१९४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजय साहेबराव भोंगळे
माळीनगर, गट नं.२, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
अकलूज विभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर डॉ.डी.एस.स्वामी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या दुकानासमोर बेकायदेशीरपणे मूर्ती ठेवून क्रमाक्रमाने अतिक्रमण करीत आपले सर्व रस्ते बंद केले. दर वेळी पोलिसांना कळवूनही त्यानी कोणतीही कारवाई केली नाही व त्याबाबतची माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विजय सोपानराव भोंगळे यानी केली.

संबंधित सोसायटीमध्ये दोन गट असून त्यांच्यामधील दावा न्यायालयात चालू आहे. श्री.भोंगळे यांच्या तक्रारीनुसार वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह दिली आहे. मूळ प्रश्न जागेच्या मालकीबाबतचा असून तो निर्णय झाल्याशिवाय अंतिम उपाययोजना होऊ शकणार नाही, असेही श्री.भोंगळे याना स्पष्ट केले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलूज विभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर डॉ.डी.एस.स्वामी यानी केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्याची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- ११ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पोपट रंगनाथ मारकड
मु.पो.उमरड, ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा,
ता.करमाळा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, उमरड विविध कार्यकारी सेवा सोसायटी,
उमरड, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२५ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पोपट रंगनाथ मारकड
मु.पो.उमरड, ता.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा,
ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.संतोष बी.शिरशेटवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

उमरड विविध कार्यकारी सेवा सोसायटी, उमरड, ता.करमाळा, जि.सोलापूर या संस्थेकडून माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.पोपट रंगनाथ मारकड यांचे प्रतिनिधी श्री.चांगदेव पोपट मारकड यानी केली.

संस्थेकडील माहिती १५ दिवसांत देण्याचे संस्थेच्या सचिवानी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी मान्य केले होते. त्यानुसार माहिती देण्याचे आदेश दिले होते, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.संतोष बी.शिरशेटवार यानी सांगितले. संस्थेला शासनाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात अनुदान वा अर्थसहाय्य मिळत नसल्याचे त्यानी स्पष्ट केले. ते लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही, म्हणून तिला हा कायदा लागू होणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रमोद जीवराज गायकवाड
अशोक नगर, अकोट फाईल, **अपीलकर्ता**
राजगुरु मार्ग, अकोला-४४४ ०००३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,**
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक,**
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०११/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक,**<br>अपंग कल्याण आयुक्तालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१<br>श्री.भास्कर शिवाजी अहिरे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,**<br>अपंग कल्याण आयुक्तालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१<br>श्री.हंबीरराव रामचंद्र कांबळे | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अपंग आयुक्तालयातील पदभरतीच्या संदर्भातील प्रत्यक्ष मुलाखतीदरम्यान सर्व उमेदवारांना देण्यात आलेल्या गुणांचा तुलनात्मक तक्ता, शैक्षणिक पात्रता अनुभव इ.माहिती |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.प्रमोद जीवराज गायकवाड यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.७.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मूळ दस्तऐवज मला दाखविण्यात आले असून पाहण्याअंती माझे समाधान झाले आहे', अशी अपीलकर्ता श्री.गायकवाड यांची लेखी पोहोच अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.संगीता जगन्नाथ साठे
मु.पो.वडाळा, ता.उत्तर सोलापूर, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,**
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
भीमा विकास विभाग क्र.२,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>भीमा विकास विभाग क्र.२, सोलापूर<br>श्री.अ.बा.साळे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** भीमा विकास विभाग क्र.२ या विभागातील निविदा सूचना क्र.३ ते ७ अन्वये सन २००९-१० मधील कामे, अंदाजपत्रक, कार्यारंभ आदेश, धनादेश क्रमांक तदनुषंगिक माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्त्या सौ.संगीता जगन्नाथ साठे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी माहिती अधिकाराखाली मागणी केलेली माहिती स्वत:

कार्यालयात उपस्थित राहून पाहिली आहे व मला पाहिजे ती माहिती मला मिळाली असून माझी त्याबद्दल काही तक्रार नाही, तरी माझे अपील निकाली काढावे', असे अपीलकर्त्या सौ.साठे यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र.२, सोलापूर यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. धनंजय शामराव देशमुख
मु. पो. वडापुरी, ता. इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (उद्योग)
पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत वडापुरी, ता. इंदापुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (उद्योग)
पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. सिद्राम गोरोबा माटे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत वडापुरी, ता. इंदापुर, जि. पुणे श्री. शहाजी ओमप्रकाश कोकाटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

सोनाई दूध संघाची नोंद व वसुली यात भ्रष्टाचार असल्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहिती देण्यास टाळाटाळ केली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. धनंजय शामराव देशमुख यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. देशमुख यानी गटविकास अधिका-यांकडे अर्ज केला होता. तो आपल्याला प्राप्त झ ाल्यानंतर माहिती समक्ष दिली. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. सिद्राम गोरोबा माटे यांच्या आदेशानुसार अधिक माहिती यु.पी.सी. ने पाठविली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडापुरी, ता. इंदापुर, जि. पुणे श्री. शहाजी ओमप्रकाश कोकाटे यानी केले. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. सिद्राम गोरोबा माटे यानी त्याला दुजोरा दिला. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १२ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.तुकाराम यशवंत खाटमोडे पाटील
मु.पो.केत्तुर, ता.करमाळा, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती करमाळा,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत केत्तुर, ता.करमाळा,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५२/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**<br>ग्रामपंचायत केत्तुर, ता.करमाळा,<br>जि.सोलापूर<br>श्री.सर्जेराव मारुती लटके<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**<br>पंचायत समिती करमाळा,<br>जि.सोलापूर<br>श्री.अरुण भानुदास भुजबळ | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** केत्तुर नं.१ ग्रामपंचायतीच्या मासिक सभेच्या अनुषंगाने एकूण १७ मुद्दयांची विस्तृत माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.तुकाराम यशवंत खाटमोडे पाटील यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी माहिती अधिकारात मागणी केल्याप्रमाणे मला माहिती मिळाली असल्याने माझी काहीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.खाटमोडे पाटील यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. युगानंद गुलाबराव साळवे
घर नं. २, आशानगर को. ऑप. सोसायटी, अपीलकर्ता
सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

‘आशानगर को.ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, शिवाजीनगर, सर्व्हे नं. १०२, ब या संस्थेचा १०४ सभासदांचा मंजूर नकाश (ले.आऊट) अस्पृश्यतेमुळे गायब केल्याची माहिती’ अशी माहिती अपीलकर्ता श्री. युगानंद गुलाबराव साळवे यानी मागितली होती. त्याना विहित मुदतीत उत्तर दिले. सन -१९६१ चा नकाशा त्यानी मागितला असून अभिलेखात उपलब्ध असल्यामुळे सन १९६३ पासूनच्या नकाशांच्या प्रती दिल्या, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय सहादू करपे
मु. पो. निमोणे, मु. गुनाट, अपीलकर्ता
ता. शिरुर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. व्यवस्थापक,
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
४ ब, बी. जे. रोड, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
रांजणगाव गणपती, ता. शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी व्यवस्थापक,
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
४ ब, बी. जे. रोड, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. विजय रंगनाथ कोरपे

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
रांजणगाव गणपती, ता. शिरुर, जि. पुणे श्री. सुरेश बन्सीराम कटारिया

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संजय सहादू करपे यानी खाजगी कारखान्यातील कामगार सोसायटीच्या नावे कंपनीने दिलेल्या धनादेशाबाबतची माहिती मागितली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत शासनाचा कोणताही आर्थिक सहभाग नाही . तसेच कर्जविषयक सवलती व अनुदान शासनातर्फे मिळत नाही. त्यामुळे बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तसेच बँकिंग गोपनीयतेनुसारही अन्य व्यक्तींना इतर खात्यांची माहिती देता येणार नाही. चर्चेसाठी अपीलकर्त्यास बोलाविले असता ते आले नाहीत, असे प्रतिपादन बँकेचे प्रभारी व्यवस्थापक यांचे प्रतिनिधी श्री. विजय रंगनाथ कोरपे यानी प्रभारी व्यवस्थापकांच्या लेखी निवेदनासह केले.

वरील बाबी-विषेशतः बँकिंग नियमावलीनुसार एका खात्याची माहिती अन्य व्यक्तींना देण्याबाबतची तरतूद लक्षात घेता माहिती नाकारण्याचा बँकेचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती अंजना गोविंद तनपुरे
मु. पो. धांगवडी, ता. भोर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती भोर, ता. भोर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
पंचायत समिती भोर, ता. भोर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती भोर, ता. भोर, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एस.एल.शेटे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती भोर,
ता. भोर, जि. पुणे श्री. सुहास जगन्नाथ मोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती अंजना गोविंद तनपुरे यानी केलेला ग्रामसेवक व ग्रामपंचायतीची कार्यपध्दती या बाबतची सन १९८२ ते जानेवारी २०१० पर्यंतची माहिती मागणारा अर्ज ग्रामपंचायत विभाग, पंचायत समिती ,भोर यांच्याशी संबंधित आहे. अर्ज आपल्याकडे आला नसल्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न आला नाही. मात्र अपिलकर्त्या वारंवार अशा स्वरुपाचे अर्ज करीत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती भोर, ता. भोर, जि. पुणे श्री. सुहास जगन्नाथ मोरे यानी केले.

अपिलकर्त्यांचे अशा स्वरुपाचे १२ ते १५ अर्ज आहेत. श्री. गोविंद तनपुरे यांच्या स्वतःच्या, तसेच त्यांच्या पत्नीच्या व वाहन चालकाच्याही नावे अर्ज येतात. ग्रामपंचायत विभाग, पंचायत समिती, भोर यांच्याशी माहिती संबंधित असल्याचे त्याना कळविले. माहिती नेण्यासाठी अथवा प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ते येत नाहीत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी (पंचायत), पंचायत समिती भोर, ता. भोर, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एस.एल.शेटे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने लक्षात घेता अपीलकर्त्यांना सर्वसाधारण कार्यपध्दतीविषयीची माहिती आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अरूण नामदेव पाटील
मु.पो.खेबवडे, ता.करवीर, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९४ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरूण नामदेव पाटील
मु.पो.खेबवडे, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.नितीन संपतराव माने

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.ओमराज किसन गहाणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सरपंच व ग्रामसेवक यांच्याविरूध्दच्या तक्रार अर्जावर चौकशी करून अहवाल देण्याची मागणी आपण ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे केली होती. परंतु अहवाल न देता चौकशीबाबतचे पत्र दिले व चुकीची माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अरूण नामदेव पाटील यानी केली.

श्री.पाटील यांच्या दि.१७.७.२००९ च्या अर्जाला दि.२०.७.२००९ रोजी उत्तर दिले. चौकशी करून अहवाल देण्याची त्यांची मागणी होती. त्यानुसार चौकशीबाबतची माहिती दिली. दि.२७.११.२००९ रोजी चौकशी अहवाल प्राप्त झाला त्याचदिवशी त्याची प्रत श्री.पाटील याना दिली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.ओमराज किसन गहाणे व अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.नितीन संपतराव माने यानी केले. हा अहवाल खोटा असल्याचा आक्षेप श्री.पाटील यानी घेतला. चौकशी करून माहिती द्यावी, ही मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच अहवालाची सत्यासत्यता ही बाब या अधिनियमाच्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १२ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अरविंद नेमचंद शहा
२५५५, बी, फ्लॅट नं.६, आराधना हौसिंग सोसायटी,
मंगळवार पेठ पोस्टासमोर, मंगळवार पेठ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(दोन), कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा इस्टेट ऑफिसर, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१२ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(दोन), कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर प्रतिनिधी श्री.रामचंद्र सदाशिव काटकर

**जन माहिती अधिकारी** तथा इस्टेट ऑफिसर, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर श्री.रामचंद्र सदाशिव काटकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

जन माहिती अधिकारी तथा इस्टेट ऑफिसर, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांच्याकडून माहिती मिळाली असून सदर कामी काहीही तक्रार नाही असे अपीलकर्त्यांचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा इस्टेट ऑफिसर, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.रामचंद्र सदाशिव काटकर यानी आयोगला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

१. श्री. विष्णू काळूराम गायकवाड
शिवाई ३४१/१, नांगरगाव, लोणावळा,
ता. मावळ, जि. पुणे — अपीलकर्ता
२. कृष्णा काशिनाथ ढवळे
मु. वाकसई, पो. नेहरेगांव, ता. मावळ, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
नगरपालिका शिक्षण मंडळ, लोणावळा,
नगरपरिषद, ता. मावळ, जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लेखापाल,
नगरपालिका शिक्षण मंडळ, लोणावळा,
नगरपरिषद, ता. मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** १. श्री. विष्णू काळूराम गायकवाड<br>शिवाई ३४१/१, नांगरगाव, लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे<br><br>२. कृष्णा काशिनाथ ढवळे<br>मु. वाकसई, पो. नेहरेगांव, ता. मावळ, जि. पुणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## **विवेचन**

शिक्षिकेच्या नेमणुकीला मान्यतेबाबतची माहिती आपण मागितलेली असता कोणतीही माहिती मिळाली नाही, असे निवेदन अपीलकर्ते (१) श्री. विष्णू काळूराम गायकवाड, व (२) कृष्णा काशिनाथ ढवळे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगरपालिका शिक्षण मंडळ, लोणावळा, नगरपरिषद, ता. मावळ, जि.पुणे श्री. एस. ए. धारके यानी दिलेल्या सूचनेनुसार मुख्याध्यापिका, प्राथमिक विद्यालय, लोणावळा यानी माहिती दिल्याचे दिसते. त्यांच्या मान्यतेबाबतचे अन्य तपशील जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगरपालिका शिक्षण मंडळ, लोणावळा, नगरपरिषद, ता. मावळ, जि.पुणे श्री. एस. ए. धारके यानी अपीलकर्त्यास कळविल्याचे दिसून येते. मान्यता न देण्याच्या निर्णयाबाबत अपिलकर्त्याची तक्रार असून माहिती त्रयस्थ पक्षाची आहे व ही तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रियाझ पटवेकर
३४१, संतोषनगर, मस्जिद समोर, अपीलकर्ता
कात्रज, पुणे-४११ ०४६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र. ४, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
झोन क्र. ४, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, झोन क्र. ४, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. नरेंद्र व. कुलकर्णी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा इमारत निरिक्षक, झोन क्र. ४, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. एस. एच. मोहिते | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रियाझ पटवेकर यानी काही कायद्यांच्या संदर्भात अन्वयार्थ स्वरुपाची विचारणा केली होती. अशी माहिती/विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नमूद असलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. विकास नियंत्रण नियमावली व पुणे शहराचा विकास आराखडा संकेत स्थळावर उपलब्ध असून त्यावरुन अपीलकर्त्याला तपशील घेता येईल. नियमावलीची मागणी केल्यास प्रती देता येतील, असे कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र. ४, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. हेमंत देवधर यानी दिलेल्या आदेशानुसार मुद्देनिहाय उत्तरही दिले असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, झोन क्र. ४, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. नरेंद्र व. कुलकर्णी यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १२ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नागेश गणेश शिंगाडे
अलीपूर रोउ, व्हनकळस प्लॉट, शिवाजीनगर, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, करमाळा,
ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७६ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.व्ही.व्ही.देसाई

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.शि.रा.कनिचे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.नागेश गणेश शिंगाडे यानी मुख्याध्यापक व पदवीधर यांच्या पगारपत्रकाच्या प्रती मागितल्या होत्या. तीन आठवड्यात शुल्क भरून घेऊन माहिती दिली. वीस पानांची माहिती अनावश्यक मिळाली असून त्याचे शुल्क परत मिळावे म्हणून त्यानी अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर यांच्या निर्णयानुसार ४० रूपये मनीऑर्डरने पाठविले, असे जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.शि.रा.कनिचे यानी मनीऑर्डरच्या व अपीलकर्त्याची पोहोच असलेल्या पावतीच्या प्रतीसह नमूद केले. ही कार्यवाही लक्षात घेता आर्थिक भुर्दंड बसल्याच्या कारणावरून आयोगाकडे अपील करण्याची श्री.शिंगाडे याची कृती अधिकाराचा अतिशयोक्त अर्थ लावणारी व अवाजवी वापर करणारी आहे, त्याबाबत त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, जि.प.कार्यालयासमोर, नागाळा पार्क, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह-परिवहन आयुक्त, प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, वांद्रे पूर्व, महाराष्ट्र राज्य, मुंबई-५१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिवहन उपआयुक्त (प्रशासन), प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, वांद्रे पूर्व, महाराष्ट्र राज्य, मुंबई-५१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१३ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह-परिवहन आयुक्त, प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, वांद्रे पूर्व, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री.स.बा.सहस्त्रबुध्दे

**जन माहिती अधिकारी** तथा परिवहन उपआयुक्त (प्रशासन), प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, वांद्रे पूर्व, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री.एस.के.पाचारणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील सर्व कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या मालमत्ता व दायित्त्वासंबंधीच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यानी मागितल्या होत्या. नऊ अधिकाऱ्यांनी मोहोरबंद पाकिटात मालमत्ता व दायित्त्व विवरणपत्र सादर केल्याचे अपीलकर्त्यास कळविले. प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.डी.टी.पवार यानी असे विवरणपत्र सादर केले आहे की नाही याची माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सह-परिवहन आयुक्त, प्रशासकीय इमारत, चौथा मजला, वांद्रे पूर्व, महाराष्ट्र राज्य, मुंबई यानी दिले. तोही तपशील अपीलकर्त्यास दिला. विवरणपत्र मोहोरबंद असल्यामुळे व अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच फोडण्याची नियमात तरतूद असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, कलम ८(ज) प्रमाणे माहिती देता येणार नसल्याचे अपीलकर्त्यास कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा परिवहन उपआयुक्त, प्रशासकीय इमारत, चौथा मजला, वांद्रे पूर्व, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री.एस.के.पाचारणे व अपिलीय प्राधिकारी तथा सह-परिवहन आयुक्त, प्रशासकीय इमारत, चौथा मजला, वांद्रे पूर्व, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री.स.बा.सहस्त्रबुध्दे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.अंजना अशोकराव भोसले
३४९, जयसिंगराव पार्क, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण विभाग क्र.२, जी-२, तळमजला, ताराबाई पार्क, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभागीय कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२३ / २००९/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण विभाग क्र.२, जी-२, तळमजला, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.अशोक विष्णू शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभागीय कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.नितीन बाबासाहेब धुमाळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

स्वतःच्या घरातील विज वापराचे बिल जास्त आल्याच्या प्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अपीलकर्त्या सौ.अंजना अशोकराव भोसले यानी अनेक मुद्दयांचा खुलासा विचारणारी व विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. माहिती वेळेत देण्यात आली असून बिलाच्या संदर्भातील अडचणही सोडविली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभागीय कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.नितीन बाबासाहेब धुमाळ यानी सांगितले. 'माहितीची आता आवश्यकता नसल्याने अपील निकाली ठेवावे,' असे अपीलकर्त्यांचे लेखी निवेदन त्यानी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी यशवंत थोरात
मु.पो.लोणी देवकर, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता.इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी
सोसायटी म., लोणी देवकर, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता.इंदापूर, जि.पुणे श्रीमती एस.एस.धस

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी म., लोणी देवकर, ता.इंदापूर, जि.पुणे या संस्थेने ऊस बिलातून कर्जापोटी केलेल्या वसुलीबाबतची माहिती आपण मागितली होती. ती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.इंदापूर, जि.पुणे यानी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संभाजी यशवंत थोरात यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित नव्हते. माहिती देण्याबाबत आदेश दिल्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी म.लोणी देवकर, ता.इंदापूर, जि.पुणे यानी सन १९९९ ते २०१० या काळातील कर्ज खतावणीचा उतारा श्री.थोरात याना देऊ केला असता तो त्यानी नाकारला, म्हणून सचिवांनी आपल्या कार्यालयाला उतारा सादर केला, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.इंदापूर, जि.पुणे श्रीमती एस.एस.धस यानी लेखी व तोंडी नमूद केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) उपरोक्त संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते का, याबाबतचा अभिप्राय, अनुदान आदिच्या तपशिलासह जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी म., लोणी देवकर, ता.इंदापूर, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.इंदापूर, जि.पुणे यानी दि.५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनोहर तुकाराम चौत्रे
प्लॉट नं.३, गुरूकृपा राजोपाध्ये नगर, राधानगरी रोड, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६११+१६५७ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मनोहर तुकाराम चौत्रे
प्लॉट नं.३, गुरूकृपा राजोपाध्ये नगर, राधानगरी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.मधुकर बापू वाघमारे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.सदाशिव रामचंद्र चौगुले | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पदभरतीचे अधिकार शासनाला असून जिल्हा परिषदेला नाहीत. तसेच जिल्हा परिषदेने सन १९९० मध्ये निर्माण केलेल्या उपविभागांना शासकीय स्तरावर मान्यता न मिळाल्यामुळे ते रद्द केले पाहिजेत. या संदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना वारंवार अर्ज देऊनही त्यानी कार्यवाही केली नाही. 'सदरचे उपविभाग रद्द करण्याबाबतच्या प्रस्तावाला जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येईल,' असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर यानी देऊनही त्यानुसार कार्यवाही न करता उपविभाग चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मनोहर तुकाराम चौत्रे यानी केली.

मागणीनुसार उपलब्ध असलेली सर्व माहिती अपीलकर्त्यांना देण्यात आली आहे. सन १९९० मधील संबंधित संचिका उपलब्ध होत नाही. मात्र या कागदपत्रांचा जतनाचा कालावधी दहा वर्षांचा आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या संबंधित ठरावाची प्रत दिली आहे. याबाबत वेगळी टिपणी नाही. नसलेली माहिती अपीलकर्ता मागत असून प्रशासकीय कार्यवाहीची मागणी करीत आहेत. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशात म्हटल्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात आला. सर्वसाधारण सभेने उपविभाग चालू ठेवण्याचा ठराव केल्याची माहितीही अपीलकर्त्यास पुरविली. याच विषयाबाबत ते वारंवार अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत असून वेळोवेळी त्यांना सर्व माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा

परिषद, कोल्हापूर श्री.सदाशिव रामचंद्र चौगुले व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.मधुकर बापू वाघमारे यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे. प्रशासकीय कार्यवाहीची अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखलपात्र नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव दत्तात्रय भोसले
माऊली निवास पेट्रोलपंपामागे, मु.पो.ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२९+१७७७ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११. |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महादेव दत्तात्रय भोसले
माऊली निवास पेट्रोलपंपामागे, मु.पो.ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आबासाहेब सूर्यवंशी

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.शिवाजी वामन चंदनशिवे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन २००५/२००६ ते २००९-२०१० अखेरपर्यंतच्या शिक्षकांच्या मंजूर वैद्यकीय देयकाबाबतची माहिती विशिष्ट तक्त्याच्या स्वरूपात आपण मागितली होती. प्रथम अपील केल्यानंतर शुल्क कळविल्यामुळे ते भरले नाही. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी माहिती न देता अर्ज परस्पर निकाली काढला, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.महादेव दत्तात्रय भोसले यानी केले.

श्री.भोसले यानी त्यांच्या दि.१८.३.२०१० च्या अर्जान्वये ढोबळ स्वरूपात माहिती मागितली होती. सोलापूर जिल्ह्यात एकूण ११००० शिक्षक असून श्री.भोसले यानी मागितल्याप्रमाणे संकलित स्वरूपात माहिती ठेवली जात नाही. त्यामुळे नेमकी माहिती मागावी, असे त्याना दि.२२.३.२०१०च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर २०२ रूपये शुल्क भरण्याबाबत दि.५.४.२०१० च्या पत्रान्वये कळविले. दोन्ही पत्रे मिळाल्याचे त्यानी मान्य केले असूनही शुल्क भरले नाही. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते उपस्थित नव्हते. माहिती तयार असून सोबत आणली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.शिवाजी वामन चंदनशिवे यानी केले. माहितीच्या प्रती त्यानी आयोगापुढे सादर केल्या. त्यांचे निवेदन लक्षात घेता, माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. सरसकट स्वरूपात व विशिष्ट नमुन्यात मागितलेली विस्तृत माहिती नाकारण्याची जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

सोलापूर यांची कृती समर्थनीय आहे. उलट शुल्क न भरता माहिती न मिळाल्याची तक्रार करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अब्दुल अजीज गुलामनबी पटेल
ग्रीन व्हीयु अपार्टमेंट, दत्त मंदिर जवळ, अपीलकर्ता
रमणमळा, कोल्हापूर ४१६ ००३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
शिरोळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार,
शिरोळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७२/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अब्दुल अजीज गुलामनबी पटेल
ग्रीन व्हीयु अपार्टमेंट, दत्त मंदिर जवळ,
रमणमळा, कोल्हापूर ४१६ ००३

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि. ६.१०.२०१० रोजी घेण्यात आली.

माहिती वेळेत न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. अब्दुल अजीज गुलामनबी पटेल यानी केली. अपीलकर्ता पुन्हा पुन्हा त्याच विषयाबाबत अर्ज व अपिले करुन त्याच त्याच मुद्दयांची पुनरावृत्ती करीत आले आहेत. वेळोवेळी त्याना माहिती देण्यात आली असून दि.११.११.२००८ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातही त्यानी सर्व माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे. अनेक अर्जांबाबत तर त्यानी माहितीसाठीचे शुल्कही भरलेले नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्याची मुख्य मागणी अप्पर आयुक्तांच्या निदेशानुसार कार्यवाही करण्याची आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच याच विषयाबाबत त्यांच्या अपील क्र. ३३६/कोल्हापूर मध्ये आयोगाने दि. २२.७.२००८ रोजी निकाल दिला आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, शिरोळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. प्रशांत सुभाष ढगे यानी केले. ते लक्षात घेता पुन्हा पुन्हा त्याच विषयासाठी सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. साजिद इस्माईल शाब्दी
२४०/०१, मुस्लीम पाच्छापूठ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, शहर सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, शहर सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६२/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१४/७/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. साजिद इस्माईल शाब्दी
२४०/०१, मुस्लीम पाच्छापूठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, शहर सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. अ. डी. सातपुते

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, शहर सोलापूर श्री. एस. एस. राऊत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

न्यू आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ, लेखा तपासणी अहवाल याबाबतची माहिती संस्थेच्या स्तरावरील असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी यानी दिली नाही. माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापूर यानी देऊनही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. साजिद इस्माईल शाब्दी यानी केली.

न्यू आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली होती. ती देण्याबाबत संस्थेला कळविले होते. परंतु स्मरण देऊनही ती प्राप्त झाली नाही म्हणून देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापूर श्री. एस. एस. राऊत यानी केले.

संदर्भित संस्थेच्या संचालक मंडळाची नावे व लेखा तपासणी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापूर यानी प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास तीन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती प्राप्त करुन घेऊन दि. १५.७.२०१० रोजी अपीलकर्त्यास कळविले. ते न आल्यामुळे दि. ३१.७.२०१० रोजी पुन्हा स्मरणपत्र पाठविले. असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापूर श्री. एस. एस. राऊत यानी आयोगास अवगत केले. मात्र शुल्क भरुन माहिती घेण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले असून ते योग्य नाही. माहिती निःशुल्क पाठविणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळकृष्ण दत्तात्रय खरात
मु. पो. वालचंदनगर (जमदाडेवस्ती), अपीलकर्ता
ता. इंदापूर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४८/२००९/पुणे+३१११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१/६/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. बाळकृष्ण दत्तात्रय खरात
मु. पो. वालचंदनगर (जमदाडेवस्ती), ता. इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. नागेश प्र. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. ए.बी.डोईफोडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका प्रकरणातील तक्रार अर्ज, त्यावरील कारवाई व त्यातील अन्य व्यक्तींचा बॉण्ड रद्द करणे या बाबतची आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी चुकीची व दिशाभूल करणारी दिली. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची सुनावणी घेतली नाही. बॉण्डचा भंग करुनही अधिका-यांनी संबंधितावर कारवाई केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण दत्तात्रय खरात यानी केली.

श्री. खरात सातत्याने या विषयी अर्ज/अपिले करत आले असून याच विषयातील त्यांचे अपील क्र. ३१११/पुणे मध्ये राज्य माहिती आयोगाने निर्णय दिलेला आहे. संबंधित प्रकरणी वस्तुस्थितीची वेळोवेळी माहिती देऊनही प्रशासकीय कार्यवाहीविषयी आक्षेप घेणारे मुद्दे ते वेळोवेळी उपस्थित करीत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. ए.बी.डोईफोडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. नागेश प्र. पाटील यानी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. हणमंतराव पाटील यानी माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एका आठवडयात आयोगास सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र स्मरण दिल्यानंतर दि.१२.१.२०११ रोजी विलंबाने त्यानी खुलासा सादर केला, या निष्काळजीपणाबाबत त्याना समज देण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहितीबाबत अपीलकर्त्यास उत्तर देण्यात आले असून बॉण्ड रद्द करण्याबाबतचे त्यांचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश गबलू मावकर
रा. तुंगार्ली, लोणावळा, अपीलकर्ता
ता. मावळ, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
मावळ तहसील कार्यालय,
ता. मावळ, वडगाव, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
मावळ तहसील कार्यालय,
ता. मावळ, वडगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रकाश गबलू मावकर
रा. तुंगार्ली, लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
मावळ तहसील कार्यालय, ता. मावळ, वडगाव, जि. पुणे श्री.चंद्रकांत जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे |

## विवेचन

जमिनीच्या फेरफार नोंदी संदर्भातील माहिती संचिका आढळ होत नसल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी यानी नाकारली. एका आठवडयात माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी देऊनही माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. प्रकाश गबलू मावकर यानी केले. ही कागदपत्रे न मिळाल्यामुळे न्यायालयीन प्रकरणात आपल्याला अडचण येऊन आपले नुकसान झाले, असे त्यानी सांगितले.

सन १९८३ मधील ही फेरफार नोंद असून अभिलेख कक्षाला कळविल्यावर त्यानी शोध घेऊनही संचिका आढळली नाही. हे कायम स्वरुपाचे जतनाचे अभिलेख असूनही आढळत नाहीत. त्यामुळे ते देता आले नाहीत, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ तहसील कार्यालय, ता. मावळ, वडगाव, जि. पुणे श्री.चंद्रकांत जाधव यानी केले.

जमिनीविषयीचे कायम स्वरुपी जतनाचे अभिलेख आढळत नसल्यास जबाबदार असणा-या संबंधितांवर महाराष्ट्र शासन अभिलेख अधिनियम २००५ अन्वये कार्यवाही होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. प्रकाश गबलू मावकर यानी मागणी केलेले अभिलेख कायम स्वरुपी जतनाचे असून ते उपलब्ध होत नसल्यास जतनाची जबाबदारी असणा-या कर्मचा-यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मावळ, वडगाव, जि. पुणे श्री. सचिन बारवकर यानी दि. २५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बंडू वाघू ठाकर
मु. ठाकूरसाई, पो. पवनानगर, अपीलकर्ता
ता. मावळ, जि. पुणे - ४१० ४०६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी, (वडिवळे प्रकल्प),
पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,<br>पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. प्रशांत शेळके<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,<br>जिल्हा पुनर्वसन अधिकारी, (वडिवळे प्रकल्प),<br>पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सरकारी जमिनी पवना धरणग्रस्तांना वाटप न करणेबाबतच्या शासन निर्णय/आदेशाची माहिती अपीलकर्ता श्री. बंडू वाघू ठाकर यानी मागितली होती. शासन निर्णय/आदेशाची नेमकी तारीख व तपशील दिलेला नसल्यामुळे व अभिलेखांचा शोध घेऊन या स्वरुपाची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे देता येत नसल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, (वडिवळे प्रकल्प), पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. संजय पवार यानी अपीलकर्त्यास कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता श्री. ठाकर उपस्थित नव्हते, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, (वडिवळे प्रकल्प), पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. प्रशांत शेळके यानी केले.

शासन निर्णय/आदेश याची तारीख आदि तपशील अपीलकर्त्यांनी दिला नसला तरी विषय नेमका व सुस्पष्ट आहे. त्याआधारे माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. बंडू वाघू ठाकर यानी मागणी केलेल्या आदेशाचा/ शासन निर्णयाचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, (वडिवळे प्रकल्प), पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले यानी अपीलकर्त्यास माहिती द्यावी . तसेच अन्य माहितीही संबंधित अभिलेख अपीलकर्त्यास अवलोकन करु द्यावे. त्यानी लेखी मागणी केल्यास ५० पृष्ठांपर्यंतची माहिती निःशुल्क द्यावी व दि. ५.२.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पोपट गुलाबराव देवकाते
व्दारा श्री. मुकुंद मारुती करे, भोईगल्ली, अपीलकर्ता
मु. पो. ता. बारामती, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
(उजनी प्रकल्प) सोलापूर, मु. पो. ता. पंढरपूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
(उजनी प्रकल्प) सोलापूर, मु. पो. ता. पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. पोपट गुलाबराव देवकाते
व्दारा श्री. मुकुंद मारुती करे, भोईगल्ली, मु. पो. ता. बारामती, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
(उजनी प्रकल्प) सोलापूर, मु. पो. ता. पंढरपूर,
जि. सोलापूर श्रीमती अंजली मरोड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

धरणग्रस्त म्हणून मिळालेल्या जमिनीबाबतच्या फेर आदेशाविषयीची आपण मागितलेली माहिती विलंबाने व अपुरी दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. पोपट गुलाबराव देवकाते यानी केली.

अपीलकर्त्यांनी संभाव्य कार्यवाहीविषयी अशी विचारणा केली होती. त्यासह सर्व मुद्दयांचे उत्तर दिले. कागदपत्रांच्या छायाप्रती दिल्या. त्यानी नमूद केलेल्या नमुन्यात माहिती ठेवली जात नाही. तथापि कार्यविवरणपत्रामध्ये ती असते, त्यामुळे कार्यविवरण बारनिशीतील छायांकित प्रत हवी असल्यास देता येईल. कोणतीही माहिती नाकारलेली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, (उजनी प्रकल्प) सोलापूर, मु. पो. ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्रीमती अंजली मरोड यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांची लेखी मागणी करुन योग्य ते शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्याता येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पंडित आबा मासळकर
मु. पो. जातेगांव खुर्द — अपीलकर्ता
ता. शिरुर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी,
पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पंडित आबा मासळकर
मु. पो. जातेगांव खुर्द ता. शिरुर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी,
पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

धरणग्रस्तांना पुनर्वसनासाठी सन १९९२ ते २०१० या काळात वाटप केलेल्या जमिनीसंदर्भातील माहिती जन माहिती अधिका-यांकडून मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. पंडित आबा मासळकर यानी केली.

श्री. मासळकर यानी १८ वर्षांच्या कालावधीतील व प्रकल्पाचा नेमका तपशील न देता ढोबळ स्वरुपात विस्तृत माहिती मागितली होती. संबंधित विभागाकडून न मिळाल्यामुळे ती देता आली नाही. 'बनावट कागदपत्रांच्या आधारे किती धरणग्रस्तांनी जमिनी मिळविल्या', अशा स्वरुपाची त्यांची विचारणा असून तशी माहिती देणे शक्य नाही. या बाबतच्या शोधाची प्रक्रिया सातत्याने चालू आहे. अपीलकर्त्यांनी नेमके प्रकरण/व्यक्ती यांचा तपशील देऊन माहिती मागितल्यास देता येईल. तसेच अभिलेखही अवलोकनासाठी उपलब्ध करुन देता येतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले व अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. प्रशांत शेळके यानी केले.

अपीलकर्त्यांनी ढोबळ मानाने सरसकट माहिती मागितली आहे, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे रास्त आहे. अपीलकर्त्यांनी नेमका तपशील देऊन, आवश्यक तर, नव्याने अर्ज दोन दिवसांत द्यावा व त्यानंतर एक आठवडयात जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती. शुभांगी सं. फुले यानी माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- १३ जानेवारी २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.निवास केशवराव जगताप
मु.पो.चरण, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९३ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.शरद शंकरगिरी गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती शाहूवाडी,
ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.तुकाराम लहू मोळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.निवास केशवराव जगताप यानी ज्यांच्या जातीची नोंद असलेल्या शाळेच्या/शाळा सोडलेल्या दाखल्याची प्रत मागितली होती. ती माहिती त्रयस्थ व्यक्तीची असल्यामुळे संबंधित व्यक्तीला विचारणा केली असता देऊ नये, असे त्यानी कळविल्यामुळे प्रत दिली नाही. तसे श्री.जगताप याना कळविले. जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर यांचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यानी ग्राह्य ठरविला, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.तुकाराम लहू मोळे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.शरद शकरगिरी गोसावी यानी केले.

संबंधित माहितीमध्ये सार्वजनिक हिताचा कोणता विषय आहे, हे अपीलकर्त्यांनी स्पष्ट केलेले नाही. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरते. मात्र शासकीय सेवेविषयीच्या संदर्भात ही नोंद महत्त्वाची असल्यास अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार दाखल्याची प्रत द्यावी लागेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १३ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

श्री.शरद कृष्णाजी पोहरे
स्वारगेट पोलीस कॉलनी,
इमारत क्र.३, खोली नं.१९०,
पुणे ४११ ०४२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
पोलीस उपायुक्त परिमंडळ (२),
पुणे शहर, पुणे ४११ ०४२ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** पोलीस निरीक्षक,
स्वारगेट पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे ४११ ०४२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५४+१८०३/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.०४.२०१० |

**<u>शुध्दीपत्रक</u>**
**<u>वाचा :- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि.०२.०९.२०१०</u>**

सदर अपिलावर आयोगाने पारित केलेल्या उक्त आदेशामधील विवेचनामध्ये, तसेच आदेशामध्ये रोजनाम्याच्या प्रती या ऐवजी 'रोजनिशी' (केस डायरी) असे वाचण्यात यावे. (म्हणजे श्री.पोहरे याना रोजनिशीच्या आवश्यक छायाप्रती द्याव्या.) या दुरुस्तीसह आयोगाचे यापूर्वीचे म्हणजेच दि.०२.०९.२०१० रोजीचे आदेश कायम ठेवण्यात येत आहेत.

**स्थळ : पुणे** **( विजय कुवळेकर )**
**दि. १३ जानेवारी २०११** **राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

श्री.नरेश बनारसीदास अगरवाल,
स.न.११९, कळस, आळंदी रोड,
पुणे ४११ ०१५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अतिरिक्त पुणे महानगरपालिका आयुक्त (विशेष),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,पुणे४११ ००५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप आयुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, पुणे -४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६/पुणे |
| २ | फेर सुनावणीची तारीख | ०५.१०.२००७ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त (ग.व नि.) तथा क्षेत्रिय अधिकारी,<br>संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका, पुणे सौ.संध्या गागरे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उप आयुक्त (जनरल),<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.शिरीष यादव | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | १६.०१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | २४.०२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | २०.०२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | ०६.०३.२००६ |
| **८.** | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-**<br>मौजे कळस येथील सर्व्हे क्र.११३, प्लॉट क्र.९ या जागेत आळंदी रस्त्याचे बाजूस जाणाऱ्या | |

| |
|---|
| दुकानाचे चाळीतील गलिच्छ वस्ती म्हणून सेवा शुल्क घेतात, जेव्हा पहिल्यांदा घेतले तेव्हाचे व आज रोजीचे व त्यावेळेचे अधिकाऱ्यांची नावे व हुद्दे याची माहिती |

**वाचा :- आयोगाचे समक्रमांकाचे दि.३१.०८.२००७ रोजीचे आदेश**

सदर प्रकरणी शास्ती करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी उक्त आदेशाच्या पुनर्विलोकनाबाबत केलेल्या विनंतीनुसार, दि.०५.१०.२००७ रोजी फेरसुनावणी घेण्यात आली होती. त्यामध्ये उपस्थित असलेल्या संबंधितांनी केलेले प्रतिपादन तसेच आयोगाकडील अपीलामधील कागदपत्रे यांचे अवलोकनाअंतीही, आयोगाने या अपिलावर दि.३१.०८.२००७ रोजी पारित केलेले उक्त शास्तीबाबतचे आदेश कायम समजण्यात यावेत व त्यानुसार त्वरीत शास्ती वसुलीची कार्यवाही करुन त्याचा अनुपालन अहवाल आदेशापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा.

**स्थळ : पुणे**
**दि. १३ जानेवारी २०११**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबूलाल रसूलभाई सय्यद
मु.पो.शिवतक्रार, ता.पुरंदर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पुरंदर,
ता.पुरंदर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाबूलाल रसूलभाई सय्यद
मु.पो.शिवतक्रार, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पुरंदर,
ता.पुरंदर, जि.पुणे श्री.देवदत्त ठोंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.विश्वनाथ सोमा विरणक

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

७/१२ उताऱ्यावर मूळ मालकाच्या नावावर क्षेत्र दाखविले गेले असून त्याबाबत दुरूस्ती व्हावी व ताबा मिळावा, अशी मागणी आपण सातत्याने करीत असूनही अधिकारी माहिती देत नाहीत व चुकीचे निर्णय देतात, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बाबूलाल रसूलभाई सय्यद यानी केली.

अपीलकर्त्यांनी महसूल नियमावली अंतर्गत अर्ज दाखल केला आहे. माहितीच्या अधिकारात त्यांच्या मागणीबाबतचा अभिप्राय देता येणार नाही. त्यांच्या अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा लागेल. ही प्रक्रिया तीन महिन्यात पूर्ण केली जाईल, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.देवदत्त ठोंबरे यानी केले.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सी.एन.बनकर
विमल विहार, बी-४/१२, बिबवेवाडी, पुणे-१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, नागरी सुविधा केंद्र,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सी.एन.बनकर
विमल विहार, बी-४/१२, बिबवेवाडी, पुणे-१

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे डॉ.जयश्री कटारे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, नागरी सुविधा केंद्र,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.ज्ञानोबा परसराम गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

जात वैधता प्रमाणपत्राच्या संदर्भातील नियमावली व अनुषंगिक माहिती आपण विचारली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागरी सुविधा केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे े व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांच्या पातळीवर माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सी.एन.बनकर यानी केली.

अडीच वर्षे वयाच्या मुलाच्या जात पडताळणी दाखल्यासंबंधीची अपीलकर्त्याची मुख्य मागणी असून नियमावलीच्या प्रती देता येतील. परंतु त्याबाबतचे विश्लेषण व अभिप्राय माहितीच्या अधिकारात देता येणार नाहीत, असे त्याना कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागरी सुविधा केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.ज्ञानोबा परसराम गायकवाड यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यानी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यानी दिलेला निर्णय योग्य आहे. तसेच नियमावलीसारखी सार्वजनिकरित्या उपलब्ध असणारी माहिती विशिष्ट जन माहिती अधिकाऱ्याच्या कक्षेत असल्याचे मानता येणार नाही व त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- १४ जानेवारी २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोष सिताराम पासलकर
३७२, भवानी पेठ, भवानी माता मंदिरासमोर, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५६ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्रीमती शुभांगी फुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रकल्पग्रस्त म्हणून दिलेल्या भूखंडाच्या कब्जेपावतीची व दाखल्याची प्रत अपीलकर्ता श्री.संतोष सिताराम पासलकर यानी मागितली होती. संबंधित विषय सन १९९६ मधील असून त्याविषयीची अंतिम सुनावणी झाली की नाही, याबाबतची कागदपत्रे अभिलेखात आढळ होत नाहीत. शोध घेण्यात येत असून संबंधित प्रकरणातील अभिलेख उपलब्ध होताच माहिती दिली जाईल, असे अपीलकर्ता याना कळविले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.प्रशांत शेळके यानी नमूद केले.

विशिष्ट मुदतीत असा शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, याची जाणीव जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. यशवंत गंगाधर पटवर्धन
९, यशश्री अपार्टमेंट, कोहिनूर कॉलनी, अपीलकर्ता
सहकारनगर नं. २, पुणे - ९.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय मावळ, वडगांव मावळ, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय मावळ, वडगांव मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. यशवंत गंगाधर पटवर्धन
९, यशश्री अपार्टमेंट, कोहिनूर कॉलनी,
सहकारनगर नं. २, पुणे - ९.

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय मावळ, वडगांव मावळ, जि. पुणे श्री. राजेश चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जमीन फेरफार प्रकरणी सन १९६२ मध्ये महाराष्ट्र सरकारने काढलेल्या परिपत्रकाची मागणी आपण केली होती. ती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. ते मिळावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. यशवंत गंगाधर पटवर्धन यानी केली.

संदर्भित परिपत्रक आपल्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे तसे कळविले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय मावळ, वडगांव मावळ, जि. पुणे श्री. राजेश चव्हाण यानी केले. मात्र ते प्राप्त करुन घेऊन १५ दिवसांत त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,

तहसील कार्यालय मावळ, वडगांव मावळ, जि. पुणे यानी प्रधान सचिव, महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई याना दि. ८.१.२०११ च्या पत्रान्वये कळविल्याचे आयोगास अवगत केले. तथापि केवळ पत्र पाठविणे ही आदेशाची पूर्तता नाही. परिपत्रक प्राप्त न झाल्यास प्रधान सचिव, महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई हे जबाबदार ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार संदर्भित अधिसूचना प्राप्त करुन देण्याबाबतच्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय मावळ, वडगांव मावळ, जि. पुणे श्री. राजेश चव्हाण यानी दि. २९.१.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**प्रत -** प्रधान सचिव, महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई ३२
यानी पुढील कारवाईसाठी

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पोपट गुलाबराव देवकाते
व्दारा श्री. मुकुंद मारुती करे, अपीलकर्ता
भोईगल्ली, मु.पो.ता. बारामती जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे - ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, दौंड, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१/२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,<br>भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,<br>पुणे श्री. बाळासाहेब वानखेडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,<br>भूमि अभिलेख, दौंड, ता. दौंड, जि. पुणे श्री. प्रदीप रामचंद्र तावरे | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जमीन एकत्रिकरण प्रकरणात विशिष्ट मुदतीत अहवाल सादर करण्याच्या सूचना असूनही दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाल्यानंतरही अहवाल का पाठविला नाही, अशी विचारणा व त्या अनुषंगाने काही मुद्दयांच्या खुलाशाची मागणी अपीलकर्ता श्री. पोपट गुलाबराव देवकाते यानी केली होती. जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले. आवश्यक कागदपत्रांच्या नकलाही दिल्या व अभिलेख अवलोकन करण्याबाबत कळविले. एकत्रिकरण योजनेतील चुका दुरुस्त करण्याची अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, दौंड, ता. दौंड, जि. पुणे श्री. प्रदीप रामचंद्र तावरे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री. बाळासाहेब वानखेडे यानी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी शिवाजी वाडकर
मु.पो.यळगुड, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर
(२)**जन माहिती अधिकारी** तथा पुरवठा अव्वल कारकून,
तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६८५ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर मानसिंगराव शिंगटे

(१)**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.गुरूलिंगप्पा तम्माराय बिरादार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

गॅस पुरवठ्याच्या संदर्भात एजन्सीने केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याकडून मिळाली नाही. त्यांच्या उत्तरानुसार संबंधित एजन्सीकडे मागणी करूनही एजन्सीने माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संभाजी शिवाजी वाडकर यानी केली.

संदर्भित गॅस एजन्सी ही खाजगी संस्था असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदींनुसार सार्वजनिक प्राधिकरण नाही. त्यामुळे त्यांच्याकडील गॅस वितरणाबाबतची माहिती भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनच्या सोलापूर विभागीय कार्यालयाकडून घ्यावी, असे पत्र एजन्सीने दिले. त्याबाबत अपीलकर्त्यास कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.गुरलिंगप्पा तम्माराय बिरादार व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर मानसिंगराव शिंगटे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन ही संस्था केंद्रीय माहिती आयोगाच्या कक्षेतील असल्यामुळे या संस्थेकडे मागणी करून माहिती न मिळाल्यास अपीलकर्त्यास आवश्यक तर केंद्रिय माहिती आयोगाकडे दाद मागावी लागेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक परशुराम भोसले
३४९, जयसिंगराव पार्क, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५२ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.आण्णासाहेब आप्पाजी भाणसे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.आण्णासाहेब आप्पाजी भाणसे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्याला सन १९९९ ते २००९ या कालावधीतील कुळांचा राजीनामा आदिविषयक माहिती अंशतः दिली व ऊर्वरित कागदपत्रांची माहिती नंतर देत असल्याचे अधिकारी सांगतात. मुदतीत माहिती

मिळत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक परशुराम भोसले यानी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात केली आहे.

अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जानुसार अभिलेखातील सर्व माहिती देण्यात आली आहे. दाव्याचा क्रमांक व निकालाचा दिनांक आदि तपशील त्यानी दिलेला नसल्यामुळे काही नकला त्याना देता आल्या नाहीत. परंतु आपल्या कार्यालयातील फेरफार उताऱ्याबाबतची सर्व कागदपत्रे त्याना दाखविली व त्यांच्या मागणीनुसार फेरफार उताऱ्याच्या नकला दिल्या. जागा बिगरशेती करण्याच्या संदर्भातील स्पष्टीकरणही दिले. काही विषयातील 'रहस्य'उलगडण्याची मागणी श्री.भोसले यानी केली असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. श्री.भोसले यानी नेमका तपशील न देता मागणी करूनही कागदपत्रांचा शोध घेऊन उपलब्ध झालेली माहिती त्याना दिली आहे व ऊर्वरित कागदपत्रांचा शोध घेऊन माहिती देण्याची कार्यवाही सुरू आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.आण्णासाहेब आप्पाजी भाणसे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोहन तुकाराम चाळके
१३, पंचवटी, झुंजार कॉलनी, अपीलकर्ता
गोडोली, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
महाराष्ट्र लोक सेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसचिव,
महाराष्ट्र लोक सेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उपसचिव,
महाराष्ट्र लोक सेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई श्री. अजय धनिराम लोखंडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य सेवा मुख्य परीक्षा २००४ च्या निकालाच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री. मोहन तुकाराम चाळके यानी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते हजर राहिले नाहीत. याच संदर्भात राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्याकडेही श्री. चाळके यानी अपील केले होते. त्यावेळच्या सुनावणीलाही ते उपस्थित राहिले नाहीत. तसेच मुद्देनिहाय माहिती देण्यात आल्याचे नोंदवून राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यानी अपील निकाली काढले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपसचिव,महाराष्ट्र लोक सेवा आयोग, मुंबई श्री. अजय धनिराम लोखंडे यानी पूरक कागदपत्रांसह केले. माहिती दिलेली असताना व राज्य माहिती आयोगाच्या एका खंडपीठाने निर्णय दिला असताना त्याच विषयात पुन:पुन्हा अर्ज व अन्य खंडपीठाकडे अर्ज/अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उमेश बाबुराव शिंदे
मु. पो. माळीनगर, ता. माळशिरस, अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अपर चिटणीस,
कुळकायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. उमेश बाबुराव शिंदे
मु. पो. माळीनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अपर चिटणीस,
कुळकायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,
सोलापूर श्री. हेमंत पी. निकम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमामध्ये आपली जमीन येत नसतानाही इतर हक्कात शेरा मारला आहे. तीन वर्षे होऊनही तो रद्द करण्याबाबतच्या अपिलाचा निर्णय होत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. उमेश बाबुराव शिंदे यानी केली.

सन १९३२ पासून चालत आलेला हा विषय आहे. अशा स्वरुपाची ६ हजार अपिले असून संपूर्ण गावाबाबत हीच स्थिती आहे. नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमामध्ये आपली जमीन येत नसल्याचे अपिलकर्त्यांचे म्हणणे असून संबंधित विषय उपआयुक्त, पुनर्वसन यांच्याकडे दाखल आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयापर्यंत विविध स्वरुपाचे आदेश झालेले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस, कुळकायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. उमेश बाबुराव शिंदे यानी तपशीलवार नमूद केले. अपिलकर्त्यांची तक्रार व अनुषंगिक मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सूर्यकांत शामराव हळ्ळी
ब्लॉक नं. २९, दमाणी नगर, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
ज्ञानसंपदा प्रशाला, ब्रम्हचैतन्य नगर,
विजापूर रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सूर्यकांत शामराव हळ्ळी
ब्लॉक नं. २९, दमाणी नगर, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी. आंबेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
ज्ञानसंपदा प्रशाला, ब्रम्हचैतन्य नगर,
विजापूर रोड, सोलापूर श्री. एस. एस. बेडगनूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९९९ ते २००० या काळात ज्ञानसंपदा प्रशालेत नेमलेल्या शिक्षक आदि कर्मचा-यांच्या संदर्भातील माहिती अपुरी दिली. भरतीसाठीची जाहिरात, संबंधितांची वैद्यकीय प्रमाणपत्रे, जात-पडताळणीचे दाखले आदिंच्या प्रती दिल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सूर्यकांत शामराव हळ्ळी यानी केली.

श्री. सूर्यकांत शामराव हळ्ळी यांच्या मूळ अर्जात मागितलेली व शाळेकडे असलेली सर्व माहिती दिली. कर्मचा-यांची नियुक्ती संस्थेमार्फत केली जात असल्यामुळे त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास अपीलकर्त्यांनी संस्थेकडून घेतल्या पाहिजेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानसंपदा प्रशाला, ब्रम्हचैतन्य नगर, विजापूर रोड, सोलापूर श्री. एस. एस. बेडगनूर यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानसंपदा प्रशाला, ब्रम्हचैतन्य नगर, विजापूर रोड, सोलापूर श्री. एस. एस. बेडगनूर यानी अपीलकर्त्यास माहिती दिली. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती त्यानी अपिलामध्ये मागितली. ती जन माहिती अधिका-यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी. आंबेडकर यानी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून मूळ अर्जापेक्षा अधिक माहिती अपिलात मागण्याची कृती योग्य नाही. त्यामुळे ती न मिळाल्याची तक्रार दखलपात्र नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. वासुदेव जगप्पा नराळ
९४/२३९, जोडभावी पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (प्रशासन),
वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिव्हील लाईन,
जी. पी. ओ. समोर, नागपूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. वासुदेव जगप्पा नराळ
९४/२३९, जोडभावी पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (प्रशासन),
वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिव्हील लाईन,
जी. पी. ओ. समोर, नागपूर श्री. अशोक भांडवलकर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर श्री. अरुण डी. सातपुते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

यशवंत सहकारी सूतगिरणी म., सोलापूर व सोलापूर विणकर सहकारी सूत गिरणी म., सोलापूर या सहकारी सूत गिरण्यांमधील कामगारांची देणी देण्याबाबत केलेली कार्यवाही बेकायदेशीर आहे. बँकेतून आणलेली रक्कम व वाटपाची रक्कम, कामगारांकडून केलेली वसुली इ. बाबींविषयी अनियमितता असून दिलेली माहिती चुकीची आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. वासुदेव जगण्पा नराळ यानी केले.

अभिलेखानुसार त्या त्या वेळी असलेल्या वस्तुस्थितीची संपूर्ण माहिती दिली आहे. संस्था अवसायनातील असून दिलेल्या माहितीच्या सत्यतेबाबत त्या त्या वेळच्या अभिलेखांनुसार अपीलकर्त्यांनी खात्री करुन घ्यावी, अशीही तयारी दर्शविली होती. अपीलकर्ता याना माहितीबाबत शुल्क कळविले होते. परंतु त्यानंतर त्यानी आपण दारिद्रय रेषेखाली असल्याचा पुरावा देणार असल्याचे सांगितल्यामुळे माहिती निःशुल्क दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री. अरुण डी. सातपुते व अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (प्रशासन), वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिव्हील लाईन, जी. पी. ओ. समोर, नागपूर श्री. अशोक भांडवलकर यानी केले.

अपिलकर्त्यांना माहिती देण्यात आली असून त्यांचे आक्षेप प्रशासकीय कार्यवाहीविषयीचे आहेत,

व त्यामुळे माहिती चुकीची असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. प्रशासकीय कार्यवाहीचा कायदेशीरपणा-बेकायदेशीरपणा ठरविणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय शंकर पाटकळे
मु. पो. ता. मंगळवेढा, शनिवार पेठ, अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संजय शंकर पाटकळे
मु. पो. ता. मंगळवेढा, शनिवार पेठ, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर श्री.जयंत वसंतराव निकम

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. मुगुटराव परशुराम मगर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार माहिती देण्यासाठी कळविलेले शुल्क भरुन घेतले नाही. जमीन प्रकरणी दि. ११.१२.२००९ रोजी झालेल्या चौकशीचा अहवाल दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. संजय शंकर पाटकळे यानी केली.

श्री. संजय शंकर पाटकळे यांच्या अर्जानुसार विहित मुदतीत उत्तर देऊन शुल्क कळविले. त्यानी शुल्क न भरताही माहिती दिली. त्यांनी अर्जात मागणी केली आहे त्या तारखेला दि.११.१२.२००९ रोजी चौकशी झालेली नाही. दि. ११.११.२००९ रोजी झाली, त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांची मागणी नसतानाही पुरविल्या. पाठविलेले रजिस्टर्ड टपाल त्यानी घेतले नाही. दि. ११.१२.२००९ असे उत्तरात हस्तदोषाने कळविले गेले होते. त्यावर ते भर देत आहेत. त्यांच्या अर्जातही असे दोष आहेत. उदा. आपण २९.११.२०१० ला हजर झाल्याचे त्यानी दि.३०.६.२०१० च्या अर्जात नमूद केले आहे. माहिती घेण्याबाबत त्यांची भूमिका सहकार्याची नाही, श्री.पाटकळे यानी मागणी केलेल्या नकला त्याना दिनांक व वेळ कळवून, रीतसर फी भरुन घेऊन जाण्याबाबत कळविले असता त्यानी सदरची तारीख व वेळ आपल्यावर बंधनकारक नसल्याचे कळविले आहे. तसेच श्री. पाटकळे याना माहिती घेऊन जाण्याची तारीख व वेळ कळविणेकामी पत्र पाठविले असता तसे कळविण्याचा आम्हाला नैतिक अधिकार नसल्याचे त्यानी म्हटले आहे. अशा स्वरुपाची त्यांची भूमिका आहे. याच प्रकारचे त्यांचे सुमारे दिडशे ते दोनशे अर्ज आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. मुगुटराव परशुराम मगर व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री.जयंत वसंतराव निकम यानी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्ता याना खरोखरच माहिती हवी असल्यास त्यानी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. मुगुटराव परशुराम मगर यानी कळविलेल्या तारखेनुसार व

वेळेत अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या प्रतींची नेमकी मागणी लेखी स्वरुपात नोंदवून, योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेणे योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. म. हनिफ मिठेसाब सालवाडगी
मित्र नगर, १२ ब, संतोषी माता नगर,
शेळगी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री रेवणसिध्देश्वर अखाद्य तेल उत्पादक सहकारी संस्था मर्या.
लिंबीचिंचोळी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. म. हनिफ मिठेसाब सालवाडगी
मित्र नगर, १२ ब, संतोषी माता नगर,
शेळगी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री.विद्याधर भिमाशंकर माने

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री रेवणसिध्देश्वर अखाद्य तेल उत्पादक सहकारी संस्था मर्या.
लिंबीचिंचोळी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर श्री.मल्लीनाथ काशिनाथ कलशेट्टी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

श्री रेवणसिध्देश्वर अखाद्य तेल उत्पादक सहकारी संस्था मर्या., लिंबीचिंचोळी, ता. द.सोलापूर, जि. सोलापूर या संस्थेच्या गेल्या ३/४ वर्षांपासून सर्वसाधारण सभा झालेल्या नाहीत, लेखा तपासणी झालेली नाही. माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. म. हनिफ मिठेसाब सालवाडगी यानी केली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रिटपिटीशन क्र. १३०५/२००५ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार आमच्या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. तरीही सन २००७ ते २००९ मधील संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अहवाल व सन २००७-०८ चे लेखा परीक्षण अहवाल याची प्रत सादर करीत आहे, असे निवेदन संबंधित प्रतींसह सचिव, श्री रेवणसिध्देश्वर अखाद्य तेल उत्पादक सहकारी संस्था मर्या., लिंबीचिंचोळी, ता. द.सोलापूर, जि. सोलापूर श्री.मल्लीनाथ काशिनाथ कलशेट्टी यानी केले. ही माहिती खोटी असल्याची तक्रार व त्याच्या चौकशीची मागणी अपीलकर्ता श्री. म. हनिफ मिठेसाब सालवाडगी यानी दि.११.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही व अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर भागवत गात
मु. पो. जामगाव (आ), ता. बार्शी, अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे
पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८९/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शंकर भागवत गात
मु. पो. जामगाव (आ), ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी. आंबेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे
पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. सुनिल दादाराव जाधवर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शंकर भागवत गात यानी केलेली मागणी व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे, पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. सुनिल दादाराव जाधवर यानी दिलेले उत्तर आणि अनुषंगिक कागदपत्रे यांचा विचार करता आयोगाने अपीलकर्त्यांच्या अपील क्र. २०४५/२००९/सोलापूर मध्ये दिलेला निर्णय प्रस्तुत अपिलातही लागू आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सलीम इमाम मुजावर
उदगाव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, ता.करवीर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९५ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, ता.करवीर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्रीमती संगीता आदिनाथ चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्रीमती संगीता आदिनाथ चौगुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

सरकारी जागेवरील अतिक्रमण काढण्यास परवानगी मागणारा अर्ज अपीलकर्ता श्री.सलिम इमाम मुजावर यानी केला होता. त्यावरील कार्यवाहीची माहिती त्यानी मागितली होती. हे अतिक्रमण

काढण्याची मागणी त्यानी केली होती. हा विषय ग्रामसेवक / सरपंच, उदगाव, ता.शिरोळ यांच्याशी संबंधित असल्याने अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला होता. तसे अपीलकर्त्यास कळविले. अतिक्रमण काढून माहिती द्यावी, अशी अपीलकर्त्यांची मागणी असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ते शक्य नाही, असेही अपीलकर्त्यास स्पष्ट केले, असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्रीमती संगीता आदिनाथ चौगुले यानी केले.

अतिक्रमण काढण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे रास्त आहे. तथापि केवळ 'ग्रामपंचायतीला कळविले,' ही माहिती तांत्रिक स्वरूपाची व मूळ विषयाबाबत संदिग्धता ठेवणारी आहे. हे लक्षात घेता ग्रामपंचायतीने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) ग्रामविकास अधिकारी, उदगाव याना अतिक्रमण काढण्याबाबत दि.२१.११.२००९ च्या पत्रान्वये कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, ता.करवीर, जि.कोल्हापूर यानी लेखी नमूद केले असून त्यानी कलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यानी प्राप्त करून घेऊन दि.५.२.२०११ पर्यंत अपीलकर्त्यास पुरवावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबू पोमू राठोड
सोनवडी, ता.दौंड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९९+१७०० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाबू पोमू राठोड
सोनवडी, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

भूमीहीनांना मिळालेली २७ एकर जमीन बळकावण्यात आली आहे. त्याबाबत नोव्हेंबर २००६ मध्ये तहसीलदार, दौंड यानी अहवाल सादर केला असून त्यावरील कार्यवाहीची माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बाबू पोमू राठोड यानी केली.

तहसीलदार, दौंड यांच्या अहवालावर कार्यवाही झालेली नसल्याचे उत्तर श्री.राठोड याना दिलेले आहे. वीर बाजी पासलकर धरण प्रकल्पाच्या पुनर्वसन आदेशांबाबत अनेक बनावट कागदपत्रे आढळून येत असून तहसीलदारांच्या अहवालावर चौकशी व्हावयाची आहे. श्री.राठोड हे प्रकल्पग्रस्त नसून भूमीहीन आहेत व त्याना भूखंड हवा आहे. तो देता येत नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी यांचे सेवापुस्तक, मालमत्ता विवरणपत्र आदिंच्या प्रती ते मागत आहेत. त्याबाबतही उत्तर दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके यानी केले.

अपीलकर्त्यांची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाची प्रत त्याना हवी असल्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी. चौकशी अहवालाच्या संदर्भात आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून ते प्राप्त करून घेऊ शकतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मुरलीधर अनंत जोशी
कांचनबन फेज-२, फ्लॅट क्र.ए-३०४, शिवतीर्थनगर, कोथरूड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव, तहसील कार्यालय, खटाव,
ता.खटाव, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव,
तहसील कार्यालय, खटाव, ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मुरलीधर अनंत जोशी
कांचनबन फेज-२, फ्लॅट क्र.ए-३०४, शिवतीर्थनगर, कोथरूड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव, तहसील कार्यालय, खटाव,
ता.खटाव, जि.सातारा श्री.सुनिल शेरखाने

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव,
तहसील कार्यालय, खटाव, ता.खटाव, जि.सातारा श्री.बाबूराव सोनू मोहिते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

जमीन प्रकरणी एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणून असलेले नाव रद्द करावे, अशी मागणी अर्ज, फेरफार नोंदी आदि तपशीलासह सातत्याने करूनही त्यानुसार कार्यवाही केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मुरलीधर अनंत जोशी यानी केली.

अपीलकर्त्यांच्या दि.११.५.२००९ च्या अर्जाला दि.१८.५.२००९ रोजी उत्तर देऊन माहिती दिली. त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्याबाबतची माहितीही देण्यात आली आहे. मात्र त्याना अपेक्षित असलेली प्रशासकीय कार्यवाही हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव, तहसील कार्यालय, खटाव, ता.खटाव, जि.सातारा श्री.बाबुराव सानू मोहिते, अपिलीय प्राधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव, तहसील कार्यालय, खटाव, ता.खटाव, जि.सातारा श्री.सुनिल शेरखाने व प्रांत अधिकारी, वाई उपविभाग, वाई, ता.वाई, जि.सातारा श्री.कुमार खैरे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वासुदेव के.इदनानी
२७/३, पी.डब्ल्यू.डी.क्वार्टर्स, पिंपरी कॉलनी, पुणे-१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, ता.हवेली, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, ९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, ता.हवेली, जि.पुणे श्री.विकास शरद भालेराव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.वासुदेव के.इदनानी यानी काही नगरभूमापन क्रमांकाच्या संदर्भातील सरसकट स्वरूपात माहिती मागितली असून तिचा बोध होत नसल्याने अभिलेख कक्षात शोध घेता येत नाही. अभिलेख कक्षाशी संपर्क साधावा, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, ९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, ता.हवेली, जि.पुणे

श्री.जगदीश निंबाळकर यानी कळविल्याचे दिसते. तसेच त्यानी मागणी केलेल्या विषयातील कागदपत्रे सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत नष्ट झाली आहेत, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, ९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, ता.हवेली, जि.पुणे श्री.विकास शरद भालेराव यानी केले.

माहितीची मागणी बोध न होण्यासारखी नाही, मात्र ढोबळ स्वरूपाची आहे, हे लक्षात घेता अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख कक्षात अभिलेखांचे अवलोकन करून उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर मारूती शिंदे
मु.पो.घोडेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह-जिल्हा निबंधक, वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी,
पुणे शहर यांचे कार्यालय, फोटोझिंको कार्यालय इमारत, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२,
पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.ज्ञानेश्वर मारूती शिंदे
मु.पो.घोडेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह-जिल्हा निबंधक, वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी,
पुणे शहर यांचे कार्यालय, फोटोझिंको कार्यालय इमारत, पुणे श्री.बी.एम.कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२,
पुणे शहर, पुणे श्री.अजित साळी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

मूळ खरेदी दस्ताची मागणी आपण केली होती. तो मिळाला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर मारूती शिंदे यानी केली.

श्री.शिंदे यानी मागणी केलेला दस्त सन १९८५ सालचा आहे. जुन्या दस्तांच्या याद्या करण्याचे व शोध घेण्याचे काम सुरू आहे. तसे त्याना कळविले असून १५ दिवसांत दस्त शोधून देत आहोत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२, पुणे शहर, पुणे श्री.अजित साळी व अपिलीय प्राधिकारी तथा सह-जिल्हा निबंधक, वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांचे कार्यालय, फोटोझिंको कार्यालय इमारत, पुणे श्री.बी.एम.कोळी यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

काटेकोरपणे विचार करता, मूळ दस्ताची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत येणार नाही. तथापि, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनानुसार १५ दिवसांत अपीलकर्त्यास मूळ दस्त पुरवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सल्टन्सीज, हिरामण लांडे बिल्डिंग,
मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे-३४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड श्री.सुरेश कदम

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड श्री.समीर घारे, तत्कालीन-श्री.वसंत लक्ष्मण गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यानी ‘सरकारमान्य रेशन व रॉकेल विक्रेत्यांची संपूर्ण माहिती’ अशा स्वरूपात माहितीची मागणी केली होती. त्याना उत्तर व माहिती रजिस्टर्ड टपालाने दिली. त्यानी केलेल्या अपिलानंतर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड यानी दिलेल्या निर्णयानुसार अशी दोनदा पुन्हा माहिती पाठविली. माहिती-मागणीबाबत नेमकेपणा नसल्यामुळे व माहिती विशिष्ट स्वरूपात संकलित करून देण्यामुळे विलंब झ ााला, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड श्री.वसंत लक्ष्मण गायकवाड व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड श्री.सुरो कदम यानी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मारूती शंकर चव्हाण
अवसरी, पो.वडापूरी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर चिटणीस (कुळ कायदा शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१०९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मारूती शंकर चव्हाण
अवसरी, पो.वडापूरी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.संजय पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर चिटणीस (कुळ कायदा शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती अमिता तळेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

कुळकायदा विषयक जमीन प्रकरणी तहसीलदार, इंदापूर यानी जिल्हाधिकारी, पुणे याना सादर केलेल्या चौकशी अहवालावरील कार्यवाहीची माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मारूती शंकर चव्हाण यानी केली.

श्री.चव्हाण यानी शासनाकडे केलेला अर्ज कशा कशा पध्दतीने संबंधितांकडे वर्ग केला याबाबत त्याना कळविले. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांकडील सुनावणीनंतर अहवालाची प्रतही दिली. सन १९६८ चा तहसीलदारांचा निकाल असून त्याबाबत श्री.चव्हाण यांची तक्रार आहे. त्यासाठी महसूल नियमावलीनुसार श्री.चव्हाण यानी प्रांत अधिकाऱ्यांकडे अपील करणे आवश्यक आहे, याची कल्पना त्याना देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अप्पर चिटणीस (कुळ कायदा शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती अमिता तळेकर यानी केले.

संबंधित अहवालावरील कार्यवाहीची माहिती देण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात नेमकेपणाने व तत्परतेने काम झालेले नाही, याबद्दल जन माहिती अधिकारी तथा अप्पर चिटणीस (कुळ कायदा शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती अमिता तळेकर व अपिलीय प्राधिकारी तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.संजय पाटील याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चाँद युसूफ शेख
अश्विनी क्लासिक, घर नं.४०२, एन.आय.बी.एम.रोड,
कोंढवा खुर्द, ता.हवेली, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चाँद युसूफ शेख
अश्विनी क्लासिक, घर नं.४०२, एन.आय.बी.एम.रोड,
कोंढवा खुर्द, ता.हवेली, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे श्री.विकास शरद भालेराव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

पुरवठा निरीक्षक श्री.बी.आर.भामरे हे सेवेत रूजू झाल्यापासूनची माहिती आपण मागितली होती. ती विस्तृत स्वरूपाची असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे यानी नाकारली. जिल्हाधिकारी, पुणे यानी आठ दिवसांत माहिती देण्याचे आदेश देऊनही त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी कार्यवाही केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.चाँद युसूफ शेख यानी केली.

श्री.शेख यानी एका अधिकाऱ्याच्या संदर्भात सेवेत रूजू झाल्यापासून घेतलेले निर्णय, केलेली कार्यवाही, त्यांच्याविरूध्दच्या तक्रारी, मालमत्तेचा तपशील अशी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. ती संकलित करून देणे शक्य नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे श्री.जगदीश निंबाळकर यानी तसे कळविले, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे श्री.विकास शरद भालेराव यानी केले. आठ दिवसांत माहिती देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले नाहीत, तर श्री.शेख यांच्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीसंबंधातील ते आदेश आहेत, असे त्यानी निदर्शनास आणले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांना आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या संबंधित अभिलेखांचे अवलोकन करू द्यावे व त्यातील त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची लेखी मागणी केल्यास ५० पृष्ठांपर्यंतची माहिती निःशुल्क द्यावी.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- १७ जानेवारी २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय राजाराम सुतार
मु.पो.चौकाक, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५९ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर मानसिंगराव शिंगटे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.गुरूलिंगप्पा तम्माराय बिरादार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

तुकडेबंदी प्रकरणातील मे-२००६ मधील आदेशाच्या अंमलबजावणीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.विजय राजाराम सुतार यानी मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.प्रकाश कोळी यानी विहित मुदतीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला उपस्थित राहण्याबाबत व लेखी म्हणणे सादर करण्याबाबत दि.२३.१०.१२०१० च्या पत्रान्वये श्री.कोळी याना कळविले होते. संबंधित मूळ कागदपत्रे आढळ होत नसल्याचे हक्कनोंद लिपिकानी मूळ प्रकरणाच्या अंमलबजावणीविषयीच्या कार्यवाहीबाबतच्या खुलाशात म्हटले आहे. त्यानुसार दि.५.१.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.गुरलिंगप्पा तम्माराय बिरादार यानी केले.

संबंधित कागदपत्रांचा जतनाचा कालावधी तीस वर्षे आहे. मूळ संचिका उपलब्ध होत नसली तरी आदेशानुसार अंमलबजावणी करून देण्यात येईल, असे अपीलकर्त्यास स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर मानसिंगराव शिंगटे यानी केले. त्यांची ही सकारात्मक भूमिका उल्लेखनीय आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.प्रकाश कोळी यानी अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.गुरलिंगप्पा तम्माराय बिरादार यांच्या निवेदनावरून दिसते. तथापि श्री.कोळी यानी याबाबत कोणतेही निवेदन सादर केलेले नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.प्रकाश कोळी यानी अपीलकर्ता यांच्या दि.२१.८.२००९ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतचा व शास्ती का करू नये, याविषयीचा खुलासा दि.५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्यानंतर शास्तीबाबतचा निर्णय करण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

प्रत::श्री.प्रकाश कोळी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांना योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.साहेबराव वाघमारे
ग्रामपंचायत मागासवर्गीय प्रतिनिधी /सभासद, वॉर्ड नं.१,
सिध्दार्थनगर, मु.पो.वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.साहेबराव वाघमारे
ग्रामपंचायत मागासवर्गीय प्रतिनिधी /सभासद, वॉर्ड नं.१,
सिध्दार्थनगर, मु.पो.वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.ए.एम.माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आपण मागितलेली माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.साहेबराव विश्वंभर वाघमारे यानी केली.

अपीलकर्ता यांच्या दि.२९.६.२००९ च्या अर्जाला १४.७.२००९ रोजी उत्तर देऊन माहिती तयार असल्याचे कळविले. परंतु त्यानी माहिती घेतली नाही. ते स्वतः ग्रामपंचायतीचे सभासद असून समक्ष येत असल्यामुळे देऊ केलेली माहिती त्यानी घेतली नाही, म्हणून यूपीसीने पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.ए.एम.माने यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सदानंद शिवाजी कदम
१, भारती अपार्टमेंट, तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे-५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक, जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१०८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदानंद शिवाजी कदम
१, भारती अपार्टमेंट, तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे-५

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बाळासाहेब वा. वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक, जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्रीमती सु.अ.भावसार

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

**विवेचन**

न्यायालयाच्या आदेशानुसार जमिनीची दोनवेळा मोजणी होऊनही व हद्दीच्या खुणांसाठी तारखा ठरूनही त्यानुसार कार्यवाही केली जात नाही व माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सदानंद शिवाजी कदम यानी केली.

श्री.कदम याना नकाशाच्या प्रतीसह सर्व माहिती देण्यात आल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्रीमती सु.अ.भावसार यानी केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती दिली आहे. तसेच न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कार्यवाहीचा विषय नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बाळासाहेब वा. वानखेडे यानी केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आशिष सूर्यकांत कोरी
८९७, माने सदनिका, विनायक चौक, सेना मंदिर रोड, गावभाग, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, गृह शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२५/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आशिष सूर्यकांत कोरी
८९७, माने सदनिका, विनायक चौक, सेना मंदिर रोड, गावभाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली प्रतिनिधी श्री.संजीव पलांडे

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, गृह शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली प्रतिनिधी श्री.एस.एस.विभुते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

सांगली-मिरज आणि कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील शस्त्रास्त्र परवान्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यानी त्रयस्थ व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधांशी व वैयक्तिक सुरक्षिततेशी संबंधित असल्याच्या कारणावरून कलम ८(१)(क)(घ)(ञ) नुसार नाकारली. त्यांचे उत्तर योग्य असल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यानी दिला. शस्त्रास्त्र परवाने ही माहिती गोपनीय नसून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ब नुसार जनतेच्या माहितीसाठी सार्वजनिक प्राधिकरणाने जाहिर करणे आवश्यक आहे. तसे न केल्याबद्दल व माहिती नाकारल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली याना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.आशिष सूर्यकांत कोरी यानी केली.

शस्त्रपरवान्यासंबंधातील माहिती व्यक्तीगत सुरक्षिततेशी निगडित असल्यामुळे ती नाकारण्याचा आमचा निर्णय योग्य आहे. अशी माहिती जाहीर करणे त्या व्यक्तींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हानिकारक ठरू शकते, म्हणून माहितीा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ मधील तरतुदीनुसार माहिती नाकारली आहे. शस्त्र परवाना मिळविण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे आदी बाबतची माहिती श्री.कोरी यांनी मागितली असून ती दिली आहे. मात्र नियमावलीची माहिती सार्वजनिकरित्या उपलब्धप असून केवळ आपल्याच सार्वजनिक प्राधिकरणाच्या कक्षेत आहे असे नाही असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचे प्रतिनिधी श्री.एस.एस.विभुते यानी केले.

अपीलकर्त्यांनी कालावधी नमूद न करता सरसकट माहिती मागतली आहे. जन माहिती अधिकारी यानी त्याना विहित मुदतीत उत्तर दिले आहे. माहिती गोपनीय असल्याचा अन्वयार्थ वैयक्तिक सुरक्षिततेच्या अनुषंगाने त्यानी लावला आहे. मात्र शस्त्र परवाना देणे ही बाब शासकीय कारभारातील अपेक्षित पारदर्शकता लक्षात घेता गोपनीय मानता येणार नाही. असे परवाने कोणाला दिले गेले, हे नागरिकांना कळणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्यास सन २००० पासूनचे शस्त्रपरवाना रजिस्टर जन माहिती अधिकारी यानी अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावे व अपीलकर्त्यांना हव्या असलेल्या त्यातील प्रती योग्य ते शुल्क आकारून उपलब्ध करून द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी

दिले. त्यानुसार जिल्हाधिकारी, सांगली यानी सादर केलेल्या अनुपालन अहवालात नमूद केल्याप्रमाणे श्री.कोरी याना दि.१२.०८.२०१० रोजी आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती व चलनाची छायाप्रत समक्ष दिली, असा अहवाल **जन** माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यानी दि.७.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल देविदास झाड
१२७, रविवार पेठ, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा धर्मादाय उपआयुक्त, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय,
ढोले-पाटील रोड, पुणे श्री.चंद्रकांत पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुनिल देविदास झाड याना माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे श्री.चंद्रकांत पाटील यानी नमूद केले. आपल्याला माहिती मिळाली असल्याचे लेखी निवेदन श्री.झाड यानी आयोगाला पाठविले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि : १८ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रविण बाळकृष्ण खंडाळकर
१४३६, शुक्रवार पेठ, भाऊमहाराज बोळ, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, संजय गांधी योजना,
तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे-२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, संजय गांधी योजना,
तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११३ / २०१० /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, संजय गांधी योजना,
तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्रीमती सुरेखा माने

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, संजय गांधी योजना,
तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्री.एम.बी.ढाके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

निलंबित तलाठ्यांच्या संदर्भात मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.प्रविण बाळकृष्ण खंडाळकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.खंडाळकर यानी अर्ज केला तेव्हा जन माहिती अधिकारी पद रिक्त होते. त्यामुळे आपण विहित मुदतीत त्याना शुल्क कळविले. शुल्क भरल्याचे चलन त्यानी सादर केले नाही. अपिलाचा निर्णयही टपालाने पाठविला, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी योजना, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, पुणे श्रीमती सुरेखा माने यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुहास मोहन वाघमारे
मु.पो.रामानंदनगर, नरवाडकर मळा, ता.पलूस, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी, विभागीय कार्यालय, विटा, ता.खानापूर, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी, शाखा रामानंदनगर-किर्लोस्करवाडी, नरवाडकर मळा, ता.पलूस, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.१०.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा रामानंदनगर-किर्लोस्करवाडी, नरवाडकर मळा, ता.पलूस, जि.सांगली श्री.भारत पांडुरंग व्हनमाने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

विद्युत खांब, रस्ते व विद्युत वाहक तारा यांचा एका जागेच्या संदर्भातील नकाशा व अनुषंगिक माहिती आपण मागितली होती. ती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सुहास मोहन वाघमारे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

उपलब्ध कागदपत्रांनुसार अपीलकर्त्याला विहित मुदतीत उत्तर व माहिती देण्यात आली. नवीन विद्युत तारा टाकण्याचे काम योग्य की अयोग्य याची खात्री करून पत्र मिळावे, अशी मागणी त्यानी केली होती. प्रथम अपिलाच्या सुनावणीला दोन तारखा देऊनही ते उपस्थित राहिले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा रामानंदनगर-किर्लोस्करवाडी, नरवाडकर मळा, ता.पलूस, जि.सांगली श्री.भारत पांडुरंग व्हनमाने यानी केले. त्यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि माहिती आपल्या विभागाकडे नसल्यास ती कोठे मिळेल हे कळविणे अथवा संबंधित एका सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज वर्ग करणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा रामानंदनगर-किर्लोस्करवाडी, नरवाडकर मळा, ता.पलूस, जि.सांगली श्री.भारत पांडुरंग व्हनमाने व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, विभागीय कार्यालय, विटा, ता.खानापूर, जि.सांगली श्री.अविनाश रामराव पाटील याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि : १८जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पंडित आबा मासळकर
मु.पो.जातेगांव खुर्द, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पंडीत आबा मासळकर
मु.पो.जातेगांव खुर्द, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बाळासाहेब वा. वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.सुरेश राजाराम जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

संयुक्त जमीन मोजणीसाठी आपण अर्ज करूनही त्यानुसार कार्यवाही झाली नाही व त्याबाबतची माहितीही मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.पंडित आबा मासळकर यानी केली.

अपीलकर्ता यानी संबंधित प्रकरणातील वर्ष, क्रमांक आदि तपशील दिला नव्हता, तरीही उपलब्ध माहिती देऊ केली असता ते घेत नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.सुरेश राजाराम जाधव यानी केले.

अभिलेखाची पडताळणी करून / शोध घेऊन १५ दिवसांत माहिती योग्य ते शुल्क आकारून द्यावी, असा निर्णय आपण दिला. त्यानुसार काही कागदपत्रांच्या नकला तयार आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बाळासाहेब वा. वानखेडे यानी नमूद केले. तांत्रिकतेच्या पलीकडे जाऊन माहिती देण्याबाबतची अपिलीय प्राधिकारी श्री.बा.वा.वानखेडे यांची सकारात्मक भूमिका उल्लेखनीय आहे.

अपीलकर्त्यांनी संबंधित प्रकरणातील भूसंपादन साल, भूसंपादन मोजणी रजिस्टर नंबर आदि तपशील जन माहिती अधिकारी याना देऊन माहिती प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. मंजुषा सुरेश सोनवणे
सर्वोदय रेसिडेन्सी, फलॅट नं. ६, बी विंग, अपीलकर्ता
जगताप डेअरी, वाकड रोड, औंध कँप,
पुणे ४११ ०२७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ,
नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे - १ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप संचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ,
नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. मंजुषा सुरेश सोनवणे
सर्वोदय रेसिडेन्सी, फलॅट नं. ६, बी विंग,
जगताप डेअरी, वाकड रोड, औंध कँप, पुणे ४११ ०२७

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत,
३ रा मजला, पुणे सौ. शशिकला अरविंद साळुंके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठतेच्या अनुषंगाने चार कर्मचा-यांबाबतची माहिती आपल्याला वेळेत न मिळाल्यामुळे न्यायालयीन लढाईत हार पत्करावी लागली. श्री. जीवन खेराळे यांची शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्राची प्रत व त्याना दिलेल्या पदोन्नतीबाबतच्या इतिवृत्ताची प्रत मिळाली नाही, असे निवेदन अपीलकर्त्या सौ. मंजुषा सुरेश सोनवणे यानी केले.

सौ. मंजुषा सुरेश सोनवणे यानी उपसंचालक, आरोग्य सेवा, यांच्याकडे पत्रान्वये माहिती मागितली होती. त्यांचा अर्ज संबंधितांकडे वर्ग केल्यानंतर प्रशासकीय अधिकारी, उरो रुग्णालय, औंध पुणे- २७ यानी माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे श्री. सिद्राम एस. रायचुरकर व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे सौ. शशिकला अरविंद साळुंके यानी केले.

पदोन्नतीबाबतच्या इतिवृत्ताची व श्री. खेराळे यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दोन्हीबाबत माहिती पुरविल्याची अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे डॉ. महेंद्र सी. नगरे यानी दि. ३१.१२.२०१० च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले. त्यात दोन्हीबाबतचे स्पष्टीकरण व पूरक माहिती आहे, हे लक्षात घेता माहिती न मिळाल्याची अपीलकर्त्यांनी दि. १७.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केलेली तक्रार दखलपात्र नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महेश हरी ढोबळे
रामकृष्णनगर, दत्त कॉलनी, माधवनगर,
कुपवाड रोड, प्लॉट नं. १४, कुपवाड, अपीलकर्ता
ता. मिरज, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्र. कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग,
कोल्हापूर श्री. दिनकर महादेव पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा प्र. कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग,
कोल्हापूर श्री. हेमंत गणपतराव पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कर्मचारी भरती प्रक्रियेसंदर्भातील व परीक्षाविषयक कागदपत्रे अवलोकनासाठी मिळण्याची व काही कागदपत्रांच्या प्रतींची मागणी अपीलकर्ता श्री. महेश हरी ढोबळे यानी केली होती. विहित मुदतीत उत्तर देऊन अभिलेख अवलोकनासाठी त्याना वेळ कळविली होती. पत्र उशिरा मिळाल्याची त्यांची तक्रार असल्यामुळे पुन्हा तारीख दिली. परंतु ते आले नाहीत. प्रथम अपिलाच्या सुनावणीलाही ते उपस्थित राहिले नाहीत. कोणतीही माहिती नाकारलेली नाही. असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्र. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री. हेमंत गणपतराव पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री. दिनकर महादेव पाटील यानी केले. त्यांनी केलेली कार्यवाही तांत्रिक- दृष्टया योग्य असली तरी कागदपत्रे अवलोकनाव्यतिरिक्तची माहिती त्यानी उत्तराच्या वेळीच पुरविणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील मूलभूत सुत्रांशी अधिक सुसंगत ठरले असते, याची जाणीव जन माहिती अधिकारी तथा प्र. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री. हेमंत गणपतराव पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री. दिनकर महादेव पाटील याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- १९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. इनामदार रहिम अशमू
मु. सुमित्रानगर, पो. यशवंतनगर, — अपीलकर्ता
ता. माळशिरस, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह. संचालक,
साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री. शंकर सहकारी साखर कारखाना का. लि.,
सदाशिवनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रहिम अशमू इनामदार
मु. सुमित्रानगर, पो. यशवंतनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह. संचालक,
साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे श्री.डी.आर.घोडे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री. शंकर सहकारी साखर कारखाना का. लि.,
सदाशिवनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी
श्री. मारुती रामदास खटावकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सदाशिवनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर या कारखान्याने आपल्याला भविष्य निर्वाह निधी दिला नाही. तसेच सन २००१ मध्ये त्यानी एका खोटया फौजदारी गुन्हयामध्ये आपल्याला गोवले. त्यामुळे आपला पासपोर्ट रद्द झाला. त्या संदर्भातील माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रहिम अशमू इनामदार यानी केली.

अपीलकर्त्यांनी उल्लेख केलेल्या फौजदारी गुन्हयाचा व कारखान्याचा संबंध नाही. अपीलकर्त्यास साखर कारखान्याच्या सेवेतून मुक्त कलेले असल्यामुळे सातत्याने विविध प्रकारचे अर्ज करुन माहिती मागत असून वेळोवेळी ती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री शंकर सहकारी साखर कारखाना का. लि., सदाशिवनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. पंडित केशवराव पवार यानी संबंधित अर्ज व त्यावरील कार्यवाही याच्या प्रतींसह केले.

अपीलकर्त्यांनी आपल्याकडे अपील केलेले नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सह. संचालक साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे श्री.डी.आर.घोडे यानी नमूद केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून त्यांच्या अन्य तक्रारी व मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शाहु सुब्राव साठे
मु.पो.वडाळा, ता.उत्तर सोलापूर, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती उत्तर सोलापूर,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
पंचायत समिती उत्तर सोलापूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.शाहु सुब्राव साठे<br>मु.पो.वडाळा, ता.उत्तर सोलापूर,<br>जि.सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**<br>पंचायत समिती उत्तर सोलापूर,<br>जि.सोलापूर<br>श्री.एस.जी.स्वामी | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.शाहु सुब्राव साठे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली सर्व माहिती मला मिळालेली आहे. माझे समाधान झाले आहे. माझी कोणतीही तक्रार नसल्याने अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.साठे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

डॉ.सचिन गणपतराव मोरे
दत्तनगर,मोडनिंब, ता.माढा, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),**
पंचायत समिती कुर्डुवाडी,
ता.माढा, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
ग्रामपंचायत मोडनिंब, ता.माढा,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**<br>ग्रामपंचायत मोडनिंब, ता.माढा, जि.सोलापूर<br>श्री.दत्तात्रय गायकवाड<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),**<br>पंचायत समिती कुर्डुवाडी,<br>ता.माढा, जि.सोलापूर<br>श्री.नंदकिशोर बागवाले | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत मोडनिंबच्या सन २००१ सालापासून झालेल्या मासिक सभा, ग्रामसभा यांची इतिवृत्ते, ग्रामपंचायतीला शासनाच्या विविध प्रकारच्या योजना, घरपट्टी, बारावा वित्त आयोगामधून प्राप्त झालेला निधी व झालेला खर्चाचा तपशिल |

## विवेचन

अपीलकर्ता डॉ.सचिन गणपतराव मोरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी आयोगाकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मोडनिंब, ता.माढा, जि.सोलापूर यानी मला सर्व माहिती दाखविली असून सदर माहितीने माझे समाधान झाले आहे. माहिती परिपूर्ण मिळाली असल्यामुळे माझे अपील संपुष्टात आणावे', असे निवेदन अपीलकर्ता डॉ.मोरे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुनिल सुखदेव काटे
मु.पो.चिणके, ता.सांगोला, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),**
पंचायत समिती सांगोला,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत चिणके, ता.सांगोला,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६८९/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),**<br>पंचायत समिती सांगोला, जि.सोलापूर<br>श्री.एस.आर.पवार | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत चिणके मार्फत करण्यात येणारी घरपट्टी वसुली, भरणा, पाणीपट्टी, दलितवस्ती सुधारयोजनेवरील खर्च इ. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.सुनिल सुखदेव काटे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. मी मागणी केलेली माहिती मला जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिणके, ता.सांगोला, जि.सोलापूर यांच्याकडून संपूर्णपणे मिळालेली आहे याबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.काटे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.तानाजी तुकाराम मुळे
मु.पो.खंडाळी, ता.मोहोळ, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती मोहोळ,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**
लघु पाटबंधारे उपविभाग(स्थानिक स्तर) मोहोळ,
ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**<br>लघु पाटबंधारे उपविभाग(स्थानिक स्तर) मोहोळ,<br>ता.मोहोळ, जि.सोलापूर<br>श्री.बी.एस.वझरकर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**<br>पंचायत समिती मोहोळ, जि.सोलापूर<br>यांचे प्रतिनिधी श्री.एन.पी.कांबळे | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** खंडाळी ता.मोहोळ येथील पाझर तलाव क्र.६ बाबतची माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.तानाजी तुकाराम मुळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीप्रमाणे माहिती देण्यात आली असल्याचे निवेदन अपीलकर्त्याच्या पोहोचेसह जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघु पाटबंधारे उपविभाग (स्थानिक स्तर) मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर यानी दि.३१.१२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पोपट कुशाबा आतकरी
मु. सुलतानपुर, पो. बोरी बुद्रुक, ता. जुन्नर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलिस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलिस यांचे कार्यालय,
चव्हाणनगर, पुणे ४११ ००८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस निरीक्षक,
नारायणगांव पोलिस स्टेशन, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८/१२/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. पोपट कुशाबा आतकरी<br>मु. सुलतानपुर, पो. बोरी बुद्रुक, ता. जुन्नर, जि. पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस निरीक्षक,<br>नारायणगांव पोलिस स्टेशन, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. ए. बी. शेख | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण दिलेली फिर्याद व गैरअर्जदार यानी दिलेली फिर्याद याबाबतची माहिती मागितली असता दिशाभूल करणारी माहिती दिली. प्रतिपक्षाच्या फिर्यादीची प्रत आदि माहिती दिल्यास त्यांच्या जीवितास धोका असल्याचे जन माहिती अधिकारी यानी सांगितले. दोन्ही बाजूंना एकत्र बोलावून पोलिसांनी वाद मिटविण्यास सांगितले व त्यानुसार लिहून देण्याशिवाय पर्याय नसल्यामुळे लिहून दिले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. पोपट कुशाबा आतकरी यानी केले.

तक्रार नसल्याचे लिहून देण्याबाबत अपीलकर्त्यांवर कोणतीही सक्ती केलेली नव्हती. तसेच माहिती दिल्यास आपल्या जीविताला धोका होईल असे गैरअर्जदार यानी कळविल्यामुळे एफ.आय.आर.ची प्रत वगैरेची माहिती दिली नाही. मात्र अन्य माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरीक्षक, नारायणगांव पोलिस स्टेशन, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. ए. बी. शेख यानी केले.

फिर्यादीची अथवा एफ.आय.आर. ची प्रत दिल्याने गैरअर्जदार यांच्या जीविताला धोका होईल, हे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरीक्षक, नारायणगांव पोलिस स्टेशन, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. ए. बी. शेख यांचे समर्थन योग्य नाही. अर्जानुसार मागितलेली सर्व माहिती अपीलकर्त्यास त्वरित द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरीक्षक, नारायणगांव पोलिस स्टेशन, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. ए. बी. शेख यानी दि. ५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.आप्पा भिकु खारतुडे
मु.पो.पाटस (बिरोबावाडी), **अपीलकर्ता**
ता.दौंड, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),**
पंचायत समिती दौंड,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत पाटस, ता.दौंड,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |
| | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.आप्पा भिकु खारतुडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.७.१.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. आपण केलेल्या अर्जानुसार अहवाल देण्याची व कार्यवाही करण्याची मागणी अपीलकर्ता श्री.खारतुडे यानी केली होती.

'मी राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर मला आवश्यक ती सर्व माहिती मिळाली असून माझ्या तक्रारीचे निरासन झाले आहे. त्यामुळे माझे अपील निकाली काढावे', असे अपीलकर्ता श्री.खारतुडे यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती दौंड, जि.पुणे यानी दि.३.१.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विलास वसंत सराफ
नमिता अपार्टमेंट, गावडे कॉलनी, **अपीलकर्ता**
चिंचवड, पुणे-४११०३३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),**
विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
तळेगांव दाभाडे, नगरपरिषद,
ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०४५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.विलास वसंत सराफ<br>नमिता अपार्टमेंट, गावडे कॉलनी,<br>चिंचवड, पुणे-४११०३३<br><br>**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>तळेगांव दाभाडे, नगरपरिषद,<br>ता.मावळ, जि.पुणे<br>श्री.प्रशांत रोडे | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),**<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>पुणे विभाग, पुणे<br>श्री.पी.एस.पाटील |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** तळेगांव दाभाडे एस.टी.स्टँड आवारात नोव्हेंबर, डिसेंबर २००४ मध्ये करण्यात आलेल्या बेकायदा वृक्षतोडीबाबतची माहिती |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विलास वसंत सराफ यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.७.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगांव दाभाडे, नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे यानी माहिती दिली असल्याने माझे अपील मागे घेत आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.सराफ यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर रंगराव लोखंडे
रविवार पेठ (पूर्व), माधवनगर, अपीलकर्ता
ता. मिरज, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८०/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि. सांगली श्री. एम. व्ही. खद्दे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि. सांगली श्री. पी. एच. मोहिते | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शंकर रंगराव लोखंडे यानी रस्त्यावरील झाडांच्या संदर्भातील माहिती ३५ मुद्दयांमध्ये मागितली होती व त्यात अनेक उपमुद्दे होते. अपीलकर्ता दारिद्रय रेषेखालील असून माहिती विस्तृत व विविध ठिकाणाहून घेणे आवश्यक अशी होती. त्यामुळे देण्यास २२ दिवस विलंब झाला असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि. सांगली श्री. पी. एच. मोहिते व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि. सांगली श्री. एम. व्ही. खद्दे यानी केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत उत्तर/माहिती विहित मुदतीत दिली जाणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि. सांगली यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राघवेंद्र महादेवप्पा होन्मोरे
मु. पो. बोर्गी (बु), ता. जत, जि. सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३९/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ आंबेडकर मार्ग,
पुणे श्री. एम. डी. माने

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ आंबेडकर मार्ग,
पुणे श्री. सुधाकर म. तांबे

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राघवेंद्र महादेवप्पा होन्मोरे यानी डी.टी.एड. परीक्षेतील एका विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या प्रतीची मागणी केली होती. परीक्षा परिषदेच्या नियमानुसार पुनर्मुल्यांकनाची तरतूद नाही व उत्तरपत्रिकेची प्रत देता येत नाही, असे त्याना कळविले. परीक्षा परिषदेतर्फे विविध प्रकारच्या २० परीक्षा घेतल्या जातात व सुमारे ३० लाख विद्यार्थी/ उमेदवार परीक्षेला बसतात. श्री. होन्मोरे यानी तेलगू भाषेत उत्तरपत्रिका लिहिली होती. उमेदवारावर अन्याय होऊ नये म्हणून तेलगू भाषक शिक्षकाकडून ती तपासून घेण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे श्री. सुधाकर म. तांबे व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे श्री. एम. डी. माने यानी केले. संदर्भित परीक्षेला किती विद्यार्थी बसतात व उत्तरपत्रिकांच्या प्रती/ गुणपडताळणी/ पुनर्मुल्यांकन याची मागणी करणारे किती अर्ज येतात, या आयोगाने केलेल्या विचारणेवर अपिलीय प्राधिकारी यानी सुमारे २ लाख विद्यार्थी परीक्षेला बसतात व सुमारे एक हजार अर्ज येतात, असे सांगितले. परीक्षा परिषदेकडील जागेचा अभाव, अपुरी कर्मचारी संख्या आदी बाबी लक्षात घेता उत्तरपत्रिकेच्या प्रती पुरविण्याचे शक्य नसल्याचे प्रतिपादन त्यानी केले. त्या लक्षात घेतल्या तरी विद्यार्थ्याला/उमेदवाराला स्वतःच्या उत्तरपत्रिकेची प्रत मिळाली पाहिजे. त्यासाठी उत्तरपत्रिका द्यावयाच्या विषयांची संख्या, त्यासाठी आकारावयाचे शुल्क आदि बाबी परीक्षा परिषद ठरवू शकेल. पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ अशासारख्या संस्थांनी याबाबत केलेली व्यवस्था परीक्षा परिषदेला मार्गदर्शक ठरु शकेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याने मागितलेल्या उत्तरपत्रिकेची प्रत योग्य ते शुल्क आकारुन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे श्री. सुधाकर म. तांबे यानी पुरवावी, व अनुपालन अहवाल दि. ५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भालचंद्र रघुनाथ शिंदे
द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळेगांव बुद्रुक, **अपीलकर्ता**
ता.बारामती, जि.पुणे-४१३११५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
(रो.ह.यो.शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-४११००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
(रो.ह.यो.शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>श्री.भालचंद्र रघुनाथ शिंदे<br>द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळेगांव बुद्रुक,<br>ता.बारामती, जि.पुणे-४१३११५<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी**<br>(रो.ह.यो.शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-४११००१<br>यांचे प्रतिनिधी श्री.विलासराव गडांकुश | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** रोजगार हमी योजनेतील हजेरी सहाय्यकांच्या शासन सेवेतील समावेशासंदर्भातील कार्यवाहीबाबतची माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भालचंद्र रघुनाथ शिंदे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार व हवी असलेली अतिरिक्त माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी ४ दिवसांत द्यावी', असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, (रो.ह.यो.शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडून माहिती मिळाली आहे. त्याबद्दल काही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.शिंदे यानी दि.१९.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २० जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण असूदामला रोहाणी
सुभाष चौक, देना बॅंकेसमोर, बारामती, अपीलकर्ता
ता. बारामती, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर, जि. सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८८/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१२/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी<br>श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,<br>सोलापूर, जि. सोलापूर श्री. ज्योतिराम रोहिदास मस्के | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. नारायण असूदामला रोहाणी यानी एका परिचारिकेची वैयक्तिक माहिती वैयक्तिक कामाकरिता मागितली होती. अर्ज संबंधितांकडे वर्ग करुन माहिती प्राप्त करुन घेऊन शुल्क

कळविले असता अपीलकर्त्यांनी ते भरले नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते हजर राहिले नाहीत. तीच माहिती दुस-या अर्जाद्वारे त्यानी मागितली, तेव्हाही असेच झाले. आपण ज्येष्ठ नागरिक असल्याचे त्यानी कळविल्यानंतर रजिस्टर्ड टपालाने त्याना माहिती पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर, जि. सोलापूर श्री. ज्योतिराम रोहिदास मस्के यानी केले.

माहिती-मागणीच्या अर्जावरील कार्यवाही व बिलंब याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर, जि. सोलापूर डॉ. अशोक डी. शिंदे यानी लेखी खुलासा करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी डॉ. अशोक डी. शिंदे यानी दि. ६.१.२०११ च्या पत्रान्वये लेखी निवेदन सादर करुन कार्यवाहीबाबतचा तपशील कळविला. अर्ज वर्ग करणे आदि प्रक्रियेत माहिती पाठविण्यास विलंब झाला असून या पुढील काळात विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे, असे त्यात नमूद केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही होणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर, जि. सोलापूर श्री. ज्योतिराम रोहिदास मस्के व अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर, जि. सोलापूर डॉ. अशोक डी. शिंदे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सचिन किसन गायकवाड
फ्लॅट नं. ७, श्री. गजानन महाराज हौसिंग सोसायटी, अपीलकर्ता
मुंढवा, पुणे - ३६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
विभागीय कार्यालय क्र.२, पुणे महानगरपालिका, पुणे - ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे - ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१०६/२०१०/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. सचिन किसन गायकवाड<br>फ्लॅट नं. ७, श्री. गजानन महाराज हौसिंग सोसायटी, मुंढवा, पुणे - ३६<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,<br>विभागीय कार्यालय क्र.२, पुणे महानगरपालिका,<br>पुणे श्री. गणपत काशिनाथ साळुंखे<br><br>**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका,<br>पुणे श्री. शिरीष मधुसूदन भांगरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री. गजानन महाराज हौसिंग सोसायटी गृहनिर्माण संस्थेचा मान्य नकाशा, सुधारित नकाशा इ. बाबतची माहिती आपण मागितली होती. प्रकरण उपलब्ध होताच माहिती दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी यानी कळविले. १५ दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. तरीही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सचिन किसन गायकवाड यानी केली.

संदर्भित प्रकरण २००५-०६ सालचे असून अभिलेख विभागात माहिती उपलब्ध झाली नाही

म्हणून संबंधित आर्किटेक्टकडून प्रत घेतली असून ती प्रमाणित करुन देत आहोत, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शिरीष मधुसूदन भांगरे यांनी केले. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शिरीष मधुसूदन भांगरे यानी अपीलकर्त्यास माहिती प्रमाणित करुन निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्र.२, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. गणपत काशिनाथ साळुंखे यानी त्यांच्या दि. १०.१.२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्याच्या पोहोचेसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २० जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मुस्ताक इब्राहिम जमादार
नदीवेस, वैरण बाजार, मिरज, **अपीलकर्ता**
ता.मिरज, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जोडपत्र अ ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.मुस्ताक इब्राहीम जमादार यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी रेशनिंग व्यवस्था मिळणेबाबत केलेला अर्ज

माहिती अधिकाऱ्यांनी वरवर निकाली काढला. संबंधित दुकानदार हे कोणालाही रॉकेल व रेशन देत नाहीत', अशी तक्रार अपीलकर्त्यानी केली.

अपीलकर्त्याच्या दि.१५.११.२००६ रोजीच्या अर्जानुसार दि.६.१२.२००६ ला उपलब्ध असलेली माहिती दिली असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली श्री.एम.एल.जोशी यानी सांगितले. खुलाशाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. सुनावणीच्यावेळचा युक्तिवाद व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २० जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.उत्तम आनंदराव पाटील
मु.पो.ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, **अपीलकर्ता**
जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
भूमि अभिलेख, मार्केट यार्ड,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
भूमि अभिलेख वाळवा-इस्लामपूर,
मार्केट यार्ड, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे कार्यालयाकडून चुकीच्या जमीन एकत्रिकरण योजनेच्या दुरुस्ती संदर्भातील तक्रारीच्या निराकरणाबाबत सन २००१-०६ या कालावधीतील माहिती तसेच भूमि अभिलेख विभागाच्या कार्यपध्दतीसंदर्भातील एकूण १६ मुद्दयांबाबतची विस्तृत माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.उत्तम आनंदराव पाटील यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती-मागणी

अर्जाप्रमाणे उत्तर देऊन शुल्क कळविले. तथापि मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे दोन महिन्यांची वाढीव मुदत मागितली होती. ते लक्षात घेऊन विलंब क्षमापित करावा', अशी विनंती जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख वाळवा-इस्लामपूर, जि.सांगली श्री.ए.आर.जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली श्री.व्ही.एन.परदेशी यांनी सुनावणीच्यावेळी केली. विलंब क्षमापित करण्याची त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. तथापि मुदतीबाबतचा पत्रव्यवहार त्वरित करणे व आवश्यक तर अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख वाळवा-इस्लामपूर श्री.ए.आर.जाधव याना देण्यात येत आहे.

सुनावणीतील युक्तिवाद व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २० जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.जयंत गजानन कुलकर्णी (भिंगारे)
मु.पो.ओगलेवाडी, ता.कऱ्हाड, **अपीलकर्ता**
जि.सातारा-४१५ १०५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
कऱ्हाड उपविभाग कऱ्हाड,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
उपविभागीय अधिकारी कार्यालय
कऱ्हाड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३८/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१०.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.जयंत गजानन कुलकर्णी (भिंगारे)<br>मु.पो.ओगलेवाडी, ता.कऱ्हाड,<br>जि.सातारा<br><br>**जन माहिती अधिकारी,**<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय<br>कऱ्हाड, जि.सातारा<br>श्रीमती एस.डी.पवार | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**<br>कऱ्हाड उपविभाग कऱ्हाड, जि.सातारा<br>(तत्कालीन) श्रीमती निलिमा धायगुडे |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संदर्भ क्र.मह/३/वतन/ कावि-२२८ दि.११.५.२००९ या पत्राच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड यानी जिल्हाधिकारी, सातारा याना सादर केलेल्या अहवालाची छायाप्रत |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.जयंत गजानन कुलकर्णी (भिंगारे) यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. मिळकतीच्या नोंदीतील वहिवाट रद्द होऊन नाव लागावे, अशी मागणी असून आता तक्रार नसल्याचे त्यानी सांगितले. या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती त्याना देण्यात आल्या असल्याचे जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय कऱ्हाड, जि.सातारा श्रीमती एस.डी.पवार व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कऱ्हाड उपविभाग कऱ्हाड, जि.सातारा (तत्कालीन) श्रीमती निलिमा धायगुडे यानी सांगितले. दरम्यान 'मी मागणी केलेली माहिती मला प्राप्त झाली असल्याने माझे आयोगाकडील प्रलंबित अपील क्र.१५३८/२००९/सातारा हे निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.कुलकर्णी (भिंगारे) यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २० जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. बाहुबली हिरालाल शहा
हिरानंद होमिओपॅथी क्लीनिक, अपीलकर्ता
रणवरे टॉवर्स, सिनेमारोड, बारामती
जि. पुणे - ४१३ १०२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग यांचे कार्यालय, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती,
ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३७/२०१०+१८३९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** डॉ. बाहुबली हिरालाल शहा
हिरानंद होमिओपॅथी क्लीनिक, रणवरे टॉवर्स, सिनेमारोड, बारामती
जि. पुणे -४१३ १०२

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग यांचे कार्यालय, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. पी. पी. साबळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती,ता. बारामती, जि. पुणे यांच्याकडे आपण दोन अर्जांद्वारे मागितलेली माहिती अपुरी व विलंबाने मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता डॉ. बाहुबली हिरालाल शहा यानी केली. या अर्जांवरील अपिलांबाबत पुढील प्रमाणे निवेदन त्यानी केले :

<u>अपील क्र.१८३९</u> : प्रवेश घेणा-या विद्यार्थी- विद्यार्थिनींची नावे आदि तपशील वैयक्तिक माहितीच्या कारणावरुन नाकारला. माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिल्यानंतरही चुकीच्या पध्दतीने माहिती दिली. अनुदानित व विनाअनुदानित अशा दोन्ही शाखांना सारखीच शुल्क आकारणी केली आहे.

<u>अपील क्र. ३३७</u> : शुल्क भरुनही मुदतीत माहिती दिली नाही. प्रथम अपील केल्यावर दुस-या दिवशी माहिती घरी आणून दिली. आर्थिक व्यवहाराविषयीची ही माहिती त्वरित मिळणे आवश्यक होते. तसेच शाळा संहितेप्रमाणे शिक्षक पालक संघ स्थापन न करणे अनिवार्य असून स्थापलेला नाही व त्याबाबतची माहिती दिली नाही.

आपली शास्तीची मागणी नाही परंतु माहिती परिपूर्ण व मुदतीत देण्याबाबत संबंधितांना ताकिद द्यावी, अशी मागणी डॉ. शहा यानी केली.

विशिष्ट मुदत घालून देऊन माहिती देण्याचे आदेश प्रथम अपिलाच्या निर्णयात दिले होते. परंतु त्यानंतर उभय बाजूंपैकी कोणीही कार्यवाहीबाबत आपल्याला कळविले नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे श्री. सुनिल मगर यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री. पी. पी. साबळे यानी सादर केले.

शुल्क आकारणी योग्य की अयोग्य, पालक शिक्षक संघ न स्थापणे या स्वरुपाचे अपीलकर्त्यांचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. प्रवेश घेणा-या विद्यार्थी- विद्यार्थिनींचे दाखले, जात इ. माहिती त्या विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वरुपाची असून ती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे यांचा निर्णय योग्य आहे. ऊर्वरित माहिती एक आठवडयात जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे यानी अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक

आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे डॉ. चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर यानी दि. ११.१०.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. अपील क्रमांक १८३९ मध्ये डॉ.शहा यांच्या दि. १.८.२००९ च्या अर्जानुसार दि. २९.८.२००९ रोजी शुल्क कळविले व ते भरल्यानंतर माहिती दिली. आयोगाच्या आदेशानंतर पुन्हा ती दिली आहे. अपील क्र. ३३७ मध्ये डॉ. शहा यांच्या दि. २९.१०.२००९ च्या अर्जानुसार विहित मुदतीत शुल्क कळविले.

तथापि शुल्क भरल्यानंतर ७५४ पानांची माहिती संकलित करुन देण्यास विलंब झाला. असा विलंब होईल याची कल्पना त्याना दिली होती. दि. ५.११.२००९ रोजी माहिती पुरविली, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे डॉ. चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर यानी अहवालात नमूद केले आहे. शुल्क कळविण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत केली असली, तरी माहिती देण्याबाबत अधिक तत्परता व काटेकोरपणा आवश्यक आहे, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेश बळीराम ओहोळ
स.क्र.७९/३/२+३+७, सहयाद्री फ्लोरा,
फलॅट नं. १, कुशल पार्क समोर, डावी भुसारी कॉलनी अपीलकर्ता
कोथरुड, पुणे ४११ ०३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता, झोन क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे- ४११ ००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रक/विकास योजना झोन क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे- ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजेश बळीराम ओहोळ
स.क्र.७९/३/२+३+७, सहयाद्री फ्लोरा, फलॅट नं. १,
कुशल पार्क समोर, डावी भुसारी कॉलनी , कोथरुड, पुणे ४११ ०३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता, झोन क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रक/विकास योजना झोन क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

कोथरुड, पुणे-३८ येथे आपण सर्व परवाने नियमानुसार बांधकाम पूर्ण केले आहे. सर्व विभागांचे ना हरकत दाखले जोडूनही व स्थळ पाहणी होऊनही महानगरपालिकेचे अधिकारी भोगवटापत्र देत नाहीत. आपल्या बांधकामानंतर झालेल्या इमारतींना भोगवटापत्र मिळते. परंतु आपल्याला ते का मिळत नाही, याची माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. राजेश बळीराम ओहोळ यानी केली.

डी. पी. रस्त्याचा प्रश्न असल्यामुळे त्या आधारे मंजूर केलेल्या बांधकामांना भोगवटापत्र देण्यात आलेले नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रक/विकास योजना झोन क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे व अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता, झोन क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास सुस्पष्ट स्वरुपात उत्तर दिले जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांनी नमूद केलेल्या मिळकतीला भोगवटापत्र न देण्याबाबतच्या कारणांची संबंधित नियमांच्या तपशिलासह नेमकी माहिती देऊन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रक/विकास योजना झोन क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे यानी अनुपालन अहवाल दि. ५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शाम मधुकर केवटे
रा. १६३/१, शुक्रवार पेठ, योगीराज कॉर्नर, अपीलकर्ता
शिंदे आळी, पुणे - ४११ ००२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता (पाणी पुरवठा),
पुणे महानगरपालिका, पुणे ४११००५. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),
पुणे महानगरपालिका, पुणे ४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शाम मधुकर केवटे
रा. १६३/१, शुक्रवार पेठ, योगीराज कॉर्नर, शिंदे आळी, पुणे - ४११ ००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता (पाणी पुरवठा),
पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. नंदकिशोर अ. जगताप

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अशोक अ. आटोळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

भाडेकरुला दिलेल्या नळजोडणीबाबतच्या तक्रारीची योग्य दखल घेऊन कारवाई केली जात नाही. संबंधितांच्या बिलाबाबत शहानिशा करण्यात येऊन अहवाल सादर करावा व बिलाची दुरुस्ती करावी. नळजोडणी बंद करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. शाम मधुकर केवटे यानी केली.

संबंधित लिपिक निलंबित झाल्यामुळे कपाटे सिलबंद केल्याने विहित मुदतीत माहिती देता आली नाही. नंतर त्याना समक्ष चर्चेस बोलावून सर्व माहिती दिली, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अशोक अ. आटोळे

यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यांच्या मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाहीत. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता (पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. व्ही.जी.कुलकर्णी यानी माहितीच्या अधिकारात प्रशासकीय कार्यवाहीचे आदेश देणे- त्यांचा उद्देश उल्लेखनीय असला तरी- योग्य ठरत नाही. जन माहिती अधिकारी श्री. अशोक अ. आटोळे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता (पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. नंदकिशोर अ. जगताप यानी कागदपत्रे तपासून माहितीबाबत शहानिशा करुन घेऊन मुद्देनिहाय उत्तर अपीलकर्त्यास दोन दिवसांत पुन्हा द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अशोक अ. आटोळे यानी संबंधित पत्राच्या प्रतीसह दि. ३१.१२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल भिमाशंकर वाकसे
सरस्वतीनगर, मु. पो. इंदापूर, अपीलकर्ता
ता. इंदापूर, जि. पुणे - ४१३१०६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे - ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे - ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुनिल भिमाशंकर वाकसे
सरस्वतीनगर, मु. पो. इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे - ४१३१०६

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे श्री. अ.भि.चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे श्री. एस.ए.चौधरी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

रस्त्याच्या कामासाठी नेमलेल्या पवन टेक्नो कन्सल्टन्सीमध्ये आपण काम करत होतो. त्या अनुषंगाने मागणी केलेली कोणतीही माहिती मिळाली नाही. या संस्थेकडून कोणतेही काम झाले नसल्याची चुकीची माहिती दिली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सुनिल भिमाशंकर वाकसे यानी केली.

श्री. वाकसे यांच्या दि.७.७.२०१० च्या अर्जाला दि. २.८.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. अभिलेखानुसार माहिती दिली असून अपीलकर्त्यास हवे असल्यास सर्व अभिलेख दाखविण्यात येतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे श्री. एस.ए.चौधरी, अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे श्री. अ.भि.चव्हाण यानी केले. त्यानुसार आवश्यक तर अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता प्राप्त करुन घेऊ शकतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.युवराज शामराव जाधव
उदय चौक, मु.पो.उरुण इस्लामपूर,
ता.वाळवा, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
भूमि अभिलेख, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
भूमि अभिलेख वाळवा-इस्लामपूर, मार्केट यार्ड,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जोडपत्र अ ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.युवराज शामराव जाधव यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. 'अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती ही तालुका तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय वाळवा या कार्यामध्ये उपलब्ध नसल्यामुळे

अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येणे शक्य झाले नाही', असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, वाळवा-इस्लामपूर, जि.सांगली यानी सुनावणीच्या वेळी सांगितले. तथापि माहिती-मागणी अर्जावर तत्परतेने कार्यवाही करण्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख वाळवा-इस्लामपूर, जि.सांगली श्री.ए.आर.जाधव याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २० जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री.बुऱ्हाण बाबासाो नाईकवाडी
सि.सर्व्हे नं.८३१, प्लॉट नं.२४, **अपीलकर्ता**
साई पार्क, ई वॉर्ड, भोसलेवाडी,
बावडा रोड, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय करवीर,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय करवीर,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२६/२००९/कोल्हापूर |

अपीलकर्ता श्री.बुऱ्हाण बाबासाो नाईकवाडी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला माहिती-मागणी अर्जानुसार माहिती मिळाली नसल्याने मी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. आयोगाकडून झालेल्या पत्रव्यवहारामुळे मला माहिती मिळाली असल्याने मी माझे अपील मागे घेत आहे, ते निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री.नाईकवाडी यांचे दि.६.१.२०१० च्या पत्रान्वये सादर केलेले निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी

नायब तहसीलदार, तहसील कार्यालय करवीर, जि.कोल्हापूर श्री.रमेश सदाशिव शेंडगे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

सदर अपिलाबाबत माहिती मिळाली नाही, अशी तक्रार श्री.नाईकवाडी यानी मूळ निवेदनानंतर जवळजवळ नऊ महिन्यांनी, दि.४.१०.२०१० च्या पत्रान्वये केली आहे. आधी अपील मागे घेणे व त्यानंतर तक्रार करणे या बाबी अपीलकर्त्याच्या भूमिकेबाबत साशंकता निर्माण करतात. या स्थितीत ही तक्रार दखलपात्र नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. :- १८ जानेवारी २०११**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.निवृत्ती तुकाराम चौगुले
सि.स.नं.८३९, देवार्डे मळा, **अपीलकर्ता**
(सरकारी मळा), कसबा बावडा,
कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय करवीर,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय करवीर,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२५/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१०.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर<br>श्री.रमेश सदाशिव शेंडगे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००१ पासून तहसील कार्यालय करवीर क्षेत्रातील पाऊस, पूर इ. नैसर्गिक आपत्तीमुळे देण्यात आलेल्या नुकसान भरपाईची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.निवृत्ती तुकाराम चौगुले यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. ‘मला माहिती-मागणी अर्जानुसार माहिती मिळाली नसल्याने मी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. आयोगाकडून झालेल्या पत्रव्यवहारामुळे मला माहिती मिळाली असल्याने मी माझे अपील मागे घेत आहे, ते निकाली काढण्यात यावे’, असे अपीलकर्ता श्री.चौगुले यांचे दि.६.१.२०१० च्या पत्रान्वये सादर केलेले निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.रमेश सदाशिव शेंडगे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

सदर अपिलाबाबत माहिती मिळाली नाही, अशी तक्रार श्री.चौगुले यानी दि.४.१०.२०१० च्या पत्रान्वये केली आहे. आधी अपील मागे घेणे व त्यानंतर तक्रार करणे या बाबी अपीलकर्त्याच्या भूमिकेबाबत साशंकता निर्माण करतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कैलास आबा लोकरे
नविन कराड नाका पाठीमागे, **अपीलकर्ता**
जे.डी.पाटील बंगल्या मागे,
सावरकर नगर, पंढरपूर,
जि.सोलापूर-४१३ ३०४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगर परिषद पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा पाणी पुरवठा अभियंता,**
नगर परिषद पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५०/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा पाणी पुरवठा अभियंता,**<br>नगर परिषद पंढरपूर,<br>ता.पंढरपूर, जि.सोलापूर<br>श्री.रमाकांत दत्तात्रय पवार | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>नगर परिषद पंढरपूर,<br>ता.पंढरपूर, जि.सोलापूर<br>श्री.रविंद्र जाधव |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पंढरपूर नगरपालिकेला ड्रेनेज पाईपलाईनसाठी शासनाकडून मिळालेला निधी व झालेला खर्च इ. बाबतची सविस्तर माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.कैलास आबा लोकरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागितलेली माहिती मला मिळालेली आहे. त्याबाबत माझी काहीही तक्रार नाही. माझे अपील रद्द करण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री.लोकरे यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा पाणी पुरवठा अभियंता, नगर परिषद पंढरपूर, जि.सोलापूर श्री.रमाकांत दत्तात्रय पवार व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद पंढरपूर, जि.सोलापूर श्री.रविंद्र जाधव यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुखदेव नरसिंग झालटे
मु.पुरी, पो.घारी, ता.बार्शी, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथ उपअभियंता (बांधकाम),**
जिल्हा परिषद उपविभाग, बार्शी,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पुरी ते धानोरे रस्त्याच्या खडीकरणाच्या व डांबरीकरणाच्या कामाच्या संदर्भातील एकूण ६ मुद्दयांची माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.सुखदेव नरसिंग झालटे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.५.१.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मी मागणी केलेली माहिती

मला मिळालेली आहे. माहिती जरी उशिरा मिळाली असली तरी माहिती मिळवणे हा माझा उद्देश सफल झाला असल्यामुळे मला सदरचे अपील चालविण्याची इच्छा नाही. त्यामुळे अपील निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.झालटे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भूपाल लगमाण्णा कुमठाळे
गल्ली नं.६, मु.पो.जयसिंगपूर, **अपीलकर्ता**
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सेक्रेटरी,**
श्री बाहुबली विद्यापीठ, बाहुबली,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर-४१६ ११०

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
श्री बाहुबली विद्यापीठ, बाहुबली,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर-४१६ ११०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३६/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री बाहुबली विद्यापीठ, बाहुबली या संस्थेच्या घटनेची छायाप्रत, श्री.एस.बी.पाटील, शिक्षक यांच्या विरुध्दच्या विविध कोर्टातील खटल्यांबाबतची माहिती व दिवाणी न्यायालय, पेठ वडगांव येथील खटला क्र.३८/९३, ३९/९३ व ४०/९३ कामी आतापर्यंत झालेल्या खर्चाची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भूपाल लगमाण्णा कुमठाळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.४.१.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. ‘मी मागणी केलेली माहिती मला प्राप्त झाली

असून माझे समाधान झाले आहे. माझी कोणतीही तक्रार नाही. माझे अपील रद्द करण्यात यावे ', असे अपीलकर्ता श्री.कुमठाळे यांचे निवेदन संचालक, श्री बाहुबली विद्यापीठ, बाहुबली, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यानी दि.३१.१२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कुमार महादेव पाथरे
मंगळवार पेठ, मु.पो.मलकापूर, ता.शाहूवाडी, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**
सहकारी संस्था,
२०४/ख/ई, न्यू शाहूपुरी, भू-विकास बँक इमारत,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
कृषि उत्पन्न बाजार समिती,
श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४०/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१०.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**<br>सहकारी संस्था,<br>२०४/ख/ई, न्यू शाहूपुरी, भू-विकास बँक इमारत,<br>जि.कोल्हापूर<br>श्री.सचिन भिमाशंकर रावल | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कोल्हापूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भातील माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.कुमार महादेव पाथरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली सर्व कागदपत्रे मी पाहिली असून त्याच्या प्रती मला विनाशुल्क मिळालेल्या आहेत. तसेच मला (अतिरिक्त शुल्काचे) रु.९६/- परत मिळालेले आहेत, माझी काहीही तक्रार नाही, तरी सदरचे अपील काढून टाकण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.पाथरे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुनिल कुंडलिक केंबळे
रा.ब्लॉक नं.१४, समाज सेवा को.ऑप.हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
भोसलेवाडी, कोल्हापूर-३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथ अव्वल कारकून,**
विधी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर<br>श्रीमती शिल्पा नाईक | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** रे.क.नं.८७२/२००६ या दाव्याच्या संदर्भातील एकूण १२ मुद्दयांबाबतची खुलासेवजा स्वरुपातील माहिती | |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.सुनिल कुंडलिक केंबळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१९.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला समाधानकारक मिळाली असल्याने मला आयोगाकडील अपील चालविण्याचे नाही, तरी अपील निकाली काढावे', असे अपीलकर्ता श्री.केंबळे यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती शिल्पा नाईक यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र राघू निंबाळकर
पौड रोड फाटा, केळेवाडी, स.नं.४४,
ज्ञानराज क्लासेसजवळ, एरंडवणा, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती (बांधकाम विभाग), ता.मुळशी, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, उपविभाग
पंचायत समिती (बांधकाम विभाग), ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०+९१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती (बांधकाम विभाग), ता.मुळशी, जि.पुणे श्री.सतीश वि.गाढवे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, उपविभाग पंचायत समिती (बांधकाम विभाग), ता.मुळशी, जि.पुणे श्री.जी.जी.साळुंके | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.२६.१०.२०१० रोजी घेण्यात आली.

ग्रामसचिवालय बांधकामाबाबतची आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर विहित मुदतीत न मिळता चार महिने पंधरा दिवसांनी मिळाली, असे अपीलकर्ता श्री.रामचंद्र रघु निंबाळकर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे.

अपील क्र.९१ मध्ये श्री.निंबाळकर यानी मागितलेली माहिती आपल्या कार्यालयाच्या कक्षेतील नसून संबंधित ग्रामपंचायतीकडून मिळेल असे अपीलकर्त्यास तीन दिवसांत कळविले व त्यांच्या अर्जाची प्रत सरपंचांना पाठविली. संबंधित ग्रामसेवकांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविल्याचे कळविले. अपील क्र.९० मध्ये श्री.निंबाळकर यानी मागितलेली माहिती संबंधित शाखा अभियंता श्री.ए.पी.राजापूरकर त्या कालावधीत वैद्यकीय रजेवर असल्यामुळे व संबंधित वरिष्ठ लिपिक श्री.एम.डी.पावगी यांच्याकडून माहिती प्राप्त होण्यास लागलेल्या अवधीमुळे माहिती देण्यास विलंब झाला. मात्र त्यात अपीलकर्त्यांनी भाष्य, अभिप्राय, कारणे अशा स्वरूपाची विचारणा केली आहे. तरीही विहित मुदतीत उत्तर व माहिती देण्याबाबत काटेकोरपणे कारवाई केली जाईल, असे लेखी निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, उपविभाग पंचायत समिती (बांधकाम विभाग),

ता.मुळशी, जि.पुणे श्री.जी.जी.साळुंके यानी आयोगाला सादर केले. अशी कार्यवाही करण्याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानदेव जिजाबा पारखे
निमगाव तर्फे महाळुंगे, ता.जुन्नर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग,
जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.ज्ञानदेव जिजाबा पारखे
निमगाव तर्फे महाळुंगे, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एम.एल.वळवी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे श्री.आर.एस.वैराटकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जुन्नर तालुक्यातील सन २००५ ते २००९ या कालावधीतील सर्व ग्रामपंचायतींच्या कामांची अंदाजपत्रके व मूल्यांकने यांच्या प्रती आपण मागितल्या होत्या. परंतु फक्त मूल्यांकनाबाबतची व तीही अपूर्ण माहिती मिळाली. मूल्यांकन वेळेत न झाल्यास सार्वजनिक पैशाची मोठी हानी होऊ शकते म्हणून तालुक्यातील सर्व १४२ ग्रामपंचायतींची माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.ज्ञानदेव जिजाबा पारखे यानी केले. काही ग्रामपंचायतींकडील कामांचे मूल्यांकन वेळेत झाले नसल्याची तक्रार त्यानी केली.

श्री.पारखे यांच्या दि.१६.३.२००९ च्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे यानी दि.२३.३.२००९ रोजी उत्तर दिले. प्रत्येक ग्रामपंचायतीला जन माहिती अधिकारी असून अपीलकर्त्यांनी त्या त्या ग्रामपंचायतीकडून माहिती घेणे आवश्यक आहे. १४२ ग्रामपंचायतींची माहिती संकलित करून देणे शक्य नाही. तरीही माहिती तयार करण्याचे व अपीलकर्त्याच्या शंकाकुशंकाचे निरसन करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे यानी दि.११.५.२००९ रोजी दिले. त्यानुसार उपलब्ध माहिती दि.२६.५.२००९ रोजी दिली व ऊर्वरित माहिती दि.२१.१२.२००९ रोजी दिली, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.आर.एस.वैराटकर व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एम.एल.वळवी यानी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.डी.यादवाडकर यानी माहिती मागणी अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विलंबांच्या कारणासह व शास्तीबाबतच्या म्हणण्यासह तीन दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.यादवाडकर यानी दि.२७.१२.२०१० च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. श्री.पारखे यांच्या प्रथम अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एम.एल.वळवी यानी दि.११.५.२००८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार संबंधित ग्रामपंचायतींकडून माहिती मागवून एकूण २७२ पानांच्या प्रती दि.२६.५.२००९ रोजी रजिस्टर्ड टपालाने पाठविल्या. माहिती अपुरी असल्याची तक्रार दि.१०.६.२००९ रोजी त्यानी अपिलीय

प्राधिकाऱ्यांकडे केली. परंतु आपल्याकडील सर्व माहिती देण्यात आली असल्याचे आपण कळविले. मुळात ही माहिती बांधकाम उपविभाग कार्यालयामध्ये उपलब्ध नसते. १४२ ग्रामपंचायतींकडून अपीलकर्त्याने ती घेणे आवश्यक असतानाही संकलित करून दिली. त्यामुळे विलंब झाला. त्यानंतरही त्यानी माहिती अपुरी मिळाल्याची तक्रार दि.१९.११.२००९ च्या पत्रान्वये केली, असे श्री.यादवाडकर यानी अहवालात नमूद केले आहे. त्यातील तपशील पाहता मुळात अपीलकर्त्यांनी त्या त्या ग्रामपंचायतीकडून माहिती घेणे आवश्यक आहे. एकापेक्षा अधिक आस्थापनांकडे अर्ज वर्ग करणे वा त्यांच्याकडून माहिती मिळविणे बंधनकारक नसल्याचे केंद्र शासनाने परिपत्रक क्र.एफ.१०/२/२००८-आयआर, दि.२४ सप्टेंबर २००८ ने स्पष्ट केले आहे. ते लक्षात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही योग्य असून विलंबाबाबतची अपीलकर्त्याची तक्रार अमान्य करण्यात येत आहे. अपीलकर्त्याच्या मूल्यांकन वेळेत न झाल्याबाबतची तक्रार व प्रशासकीय कार्यवाहीविषयीचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.माणिक ए.दुसुंगे
ओटा नं.२५, शिवदर्शन, पुणे-९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पद्मावती विभाग, संगम सोसायटीजवळ, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे-९ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियता, पद्मावती विभाग, संगम सोसायटीजवळ, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे-९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पद्मावती विभाग, संगम सोसायटीजवळ, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे भानुदास भगवंतराव भोसले

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियता, पद्मावती विभाग, संगम सोसायटीजवळ, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे श्री.किशोर बापूराव गोरडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.५.१०.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता ॲड.माणिक प्र. दुसुंगे यानी सन २००२ मधील वीज कनेक्शनच्या संदर्भातील कागपत्रांची मागणी केली होती. अभिलेखात सखोल शोध घेऊनही संबंधित संचिका आढळली नाही. दरम्यानच्या कालावधीत अभिलेखातील काही संचिका गायब झाल्याचे आढळून आले. त्यानंतर कार्यालयातून काही संचिका चोरून नेताना एका चोराला पकडण्यात आले. पोलिसांकडे तक्रार करण्यात आली. त्याचा तपास पूर्ण होण्याआधीच चोर मृत्यू पावला. या सर्व परिस्थितीमुळे माहिती देता आली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियता, पद्मावती विभाग, संगम सोसायटीजवळ, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे श्री.किशोर बापूराव गोरडे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पद्मावती विभाग, संगम सोसायटीजवळ, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे भानुदास भगवंतराव भोसले यांनी केले. कागदपत्रे शोधण्याचा त्यानी प्रयत्न केल्याचे दिसते. तथापि अपीलकर्त्यास त्या त्या वेळी विहित मुदतीत कळविले जाणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा

उपकार्यकारी अभियता, पद्मावती विभाग, संगम सोसायटीजवळ, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे श्री.किशोर बापूराव गोरडे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पद्मावती विभाग, संगम सोसायटीजवळ, पुणे-सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे भानुदास भगवंतराव भोसले याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र पांडुरंग पोळ
प्लॉट नं. १७, स. नं. ४२४,
श्री रामकृष्ण परमहंस सहकारी गृहनिर्माण संस्था, अपीलकर्ता
सांगली, १०० फुटी रोड, सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४५/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामचंद्र पांडुरंग पोळ
प्लॉट नं. १७, स. नं. ४२४,
श्री रामकृष्ण परमहंस सहकारी गृहनिर्माण संस्था,
सांगली, १०० फुटी रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली श्री. व्ही. पी. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली श्री. जी. एस. वर्धन

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या निवडणुकीतील अर्ज अवैध ठरविण्याबाबतच्या नियमावलीची प्रत व संचालक मंडळावरील कारवाईबाबतचा अहवाल याची मागणी आपण केली होती. ही माहिती मिळाली नाही. शुल्क भरुन घेऊन माहिती द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी यानी दिला. परंतु माहिती विहित मुदतीत मिळाली नसल्याने निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रामचंद्र पांडुरंग पोळ यानी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ. एस. एन. जाधव यानी दि. २२.८.२००८ च्या अर्जानुसार दि. २१.१०.२००८ रोजी माहिती दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसते, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली श्री. जी. एस. वर्धन यानी नमूद केले.

नियमावलीसारखी सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली माहिती विशिष्ट जन माहिती अधिका-यांच्याच कक्षेत असल्याचे मानता येणार नाही व त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. तथापि अन्य माहिती देण्यास झालेल्या विलंबाविषयीचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ. एस. एन. जाधव यानी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. श्री. पोळ यांचा अर्ज आला तेव्हा आपण सहा.निबंधक, सहकारी संस्था, पलूस या पदावर कार्यरत होतो. उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.२.८.२००८ पासून आपल्याकडे देण्यात आला. दोन्ही गावामधील अंतर सुमारे ६० कि.मि असून त्याच वेळी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), मिरज या पदाचा अतिरिक्त कार्यभारही आपल्याकडे होता. मिरज अर्बन बँकेच्या अवसायक पदाचा कार्यभार दि. २.९.२००८ पासून स्वीकारावा लागला. याच काळात वसंतदादा सहकारी सूत गिरणी मर्या., सांगली या सूत गिरणीच्याही अवसायक पदाचा कार्यभार दि. २.८.२००८ पासून आपल्याकडे होता. या सर्व पदभारांमुळे माहिती देण्यास विलंब झाला. तसेच संबंधित गृहनिर्माण संस्थेबद्दलच्या अपिलकर्त्यांच्या विविध तक्रार अर्जांवरील कार्यवाहीही

याच काळात करण्यात आली आहे, असे डॉ. जाधव यानी निवेदनात नमूद केले आहे. ते लक्षात घेता विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल सुकलाल सुरळकर
द्वारा-श्री.सुरेश शंकर भालेराव
२७/१११, मुंजाबावस्ती, धनेश्वर शाळेजवळ, धानोरी, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य
पुरवठा कार्यालय, शासकीय मध्यवती इमारत, अे बॅरक, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी, ई विभाग,
संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे- ६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य
पुरवठा कार्यालय, शासकीय मध्यवती इमारत, अे बॅरक, पुणे प्रतिनिधी श्री.यू.के.बढे

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी, ई विभाग,
संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे श्रीमती मंजुषा निवृत्ती तांबडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२६.१०.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण दि.४.११.२००८ रोजी माहिती मागण्यासाठी केलेल्या अर्जाची दखल जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, ई विभाग, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे यानी घेतली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य पुरवठा कार्यालय, शासकीय मध्यवती इमारत, अे बरॅक, पुणे यानी अपिलाची दखल घेतली नाही. सहजगत्या देता येण्यासारखी माहिती असूनही चार महिने विलंबाने देणारे जन माहिती अधिकारी श्री.पी.के.वीर यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुनिल सुकलाल सुरळकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.सुरळकर यांच्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, ई विभाग, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे यानी उत्तर दिले नव्हते. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या तीन तारखानंतर अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य पुरवठा कार्यालय, शासकीय मध्यवती इमारत, अे बरॅक, पुणे यानी श्री.वीर याना नोटीस काढून माहिती निःशुल्क देण्याचे आदेश दिले. तसेच त्यानुसार कार्यवाही न झाल्यास दंडात्मक कारवाई करण्याची जाणीवही दिली. त्यानंतर दि.७.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, ई विभाग, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे यानी माहिती तयार असल्याचे श्री.सुरळकर याना कळविले. ती मिळाल्याची श्री.सुरळकर यांची पोहोच आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, ई विभाग, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे श्रीमती मंजुषा निवृत्ती तांबडे यानी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, ई विभाग, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे यानी मूळ अर्जावर केलेली कार्यवाही व विलंबाबाबतचा खुलासा शास्तीबाबतच्या म्हणण्यासह तीन दिवसात सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.पी.के.वीर यानी दि.२७.१०.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला.

श्री.सुरळकर यांच्या दि.४.११.२००८ च्या अर्जानुसार दि.७.३.२००९ रोजी माहिती देण्यात आली असून माहितीबाबत काही तक्रार नसल्याचे त्यानी लेखी दिलेल्या पोहोचमध्ये नमूद केलेले आहे, असे श्री.वीर यानी खुलाशात म्हटले आहे. तथापि विलंबाचे व शास्तीबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण त्यानी दिलेले नाही. त्यांच्या पत्रावरूनच अपीलकर्त्यास १२३ दिवस विलंबाने माहिती दिल्याचे स्पष्ट होते. माहितीबाबत तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने म्हटले असले तरी त्यामुळे विलंब क्षम्य ठरत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) स्वत:कडे उपलब्ध असलेली व सहजगत्या देता येण्यासारखी माहिती न देणे व त्याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण न करणे या कारणास्तव जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, ई विभाग, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे श्री.पी.के.वीर याना २५००० रूपये शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती मार्च २०११, एप्रिल २०११ व मे २०११ मध्ये त्याना मिळणाऱ्या फेब्रुवारी २०११, मार्च २०११ व एप्रिल २००१ या महिन्यांच्या वेतनातून तीन हप्त्यात वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य पुरवठा कार्यालय, शासकीय मध्यवती इमारत, अे बॅरक, पुणे यानी करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि : २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीराम ठकुजी कान्हुरकर
मु. पो. दावडी, ता. खेड, जि. पुणे                    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (उ.श्रे.)
पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षण अधिकारी,
पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. श्रीराम ठकुजी कान्हुरकर
मु. पो. दावडी, ता. खेड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (उ.श्रे.)
पंचायत समिती खेड, ता. खेड,
जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. लक्ष्मण दगडू विरणक

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षण अधिकारी,
पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. बाळासाहेब गोपाळ कड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

सन २००७ ते २००९ या काळात सर्व शिक्षा अभियान, गटसाधन केंद्राला प्राप्त झालेले अनुदान आदिबाबींची माहिती आपण मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले नाही. आयोगाकडे अपील केल्यानंतर त्यानी शुल्क कळविले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. श्रीराम ठकुजी कान्हुरकर यानी केली.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे विलंबाने शुल्क कळविले. ७८० पृष्ठांची माहिती तयार असून सोबत आणली आहे. आणखी माहिती हवी असल्यास देण्यात येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. बाळासाहेब गोपाळ कड यानी केले.

अपीलकर्त्यास उत्तर देण्यास झालेल्या विलंबाचे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. बाळासाहेब गोपाळ कड यानी केलेले समर्थन योग्य नाही. अपीलकर्त्यांचा मूळ अर्ज दि. २५.६.२००९ चा असून शुल्क दि. १५.१०.२००९ रोजी कळविले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विलंब झाल्यास माहिती निःशुल्क देणे आवश्यक असताना शुल्क कळविले आहे व तेही नेमके न कळविता अवाजवी रक्कम आकारली आहे. ७८० पृष्ठांची माहिती असतांना रु. ४००० शुल्क कळविले आहे. या बाबी माहिती देण्याबाबतच्या सकारात्मकतेच्या निदर्शक नाहीत. माहिती विस्तृत असल्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिपादना नुसार काही विलंब मान्य केला, तरी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. बाळासाहेब गोपाळ कड यानी विहित मुदतीत व सकारात्मक दृष्टीने कार्यवाही केलेली नाही, हे स्पष्ट होते. हे शास्तीस पात्र ठरतात. अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क देणे आवश्यक आहे. अपिलीय प्राधिकारी यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रथम अपिलाबाबत कार्यवाही करणे आवश्यक असल्याची समज अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. अनिल म. यादव याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. बाळासाहेब गोपाळ कड यानी निःशुल्क पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे

श्री. बाळासाहेब गोपाळ कड यानी माहिती विहित मुदतीत न देता ८२ दिवस विलंबाने दिली आहे. माहिती विस्तृत असल्याचे व त्याचा आढावा घेण्यास कालावधी लागल्याचे त्यांचे समर्थन मान्य करुन विलंबातील ३० दिवस क्षमापित करण्यात येत असून उर्वरित ५२ दिवसांसाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे (५२ x २५०) रुपये १३,०००/- अशी शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. बाळासाहेब गोपाळ कड यांच्या फेब्रुवारी २०११, मार्च २०११, एप्रिल २०११ व मे २०११ च्या अनुक्रमे मार्च २०११, एप्रिल २०११, मे २०११ व जून २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून समान हप्त्यात कपात करुन **'००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)'** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे श्री. अनिल म. यादव यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर यशवंत फडतरे
मु.केंजळ, पो.कवठे, ता.कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कराड, तहसील कार्यालय, कराड,
ता.कराड, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कराड,
तहसील कार्यालय, कराड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८४ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कराड, तहसील कार्यालय, कराड,
ता.कराड, जि.सातारा श्री.विठ्ठल भालचंद्र जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कराड,
तहसील कार्यालय, कराड, ता.कराड, जि.सातारा श्रीमती रमा प्रसन्न जोशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शकर यशवंत फडतरे यानी सन १९३० पासूनचे ७/१२ उतारे व फेर फार उतारे याबाबतची माहिती मागितली होती. कळविलेले शुल्क भरूनही माहिती मिळाली नसल्याची तक्रार त्यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केलेली दिसते. तथापि शुल्क भरल्याचे चलन त्यानी सादर केले नाही. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीलाही ते उपस्थित नव्हते. माहिती तयार असून शुल्क भरल्यास त्वरित देता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कराड, तहसील कार्यालय, कराड, ता.कराड, जि.सातारा श्रीमती रमा प्रसन्न जोशी व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कराड, तहसील कार्यालय, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.विठ्ठल भालचंद्र जोशी यानी नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये उत्तर / माहिती देण्यासाठी असलेल्या तीस दिवसांच्या मुदतीखेरीज शुल्काचे पत्र पाठविणे योग्य नाही. तीस दिवसात शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेता येईल अशा मुदतीने उत्तर पाठविले गेले पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कराड, तहसील कार्यालय, कराड, ता.कराड, जि.सातारा श्रीमती रमा प्रसन्न जोशी व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कराड, तहसील कार्यालय, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.विठ्ठल भालचंद्र जोशी याना देण्यात येत आहे.

अपीलकर्त्यास टपालाने माहिती पाठवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यानी भरलेल्या शुल्काच्या चलनाची प्रत आयोगाच्या कार्यालयाकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास माहिती पाठविण्यात आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कराड, तहसील कार्यालय, कराड, ता.कराड, जि.सातारा श्रीमती रमा प्रसन्न जोशी यानी दि.११.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अरुण रामचंद्र पवार
मु. पो. कसबे डिग्रज, वॉर्ड नं. १ — अपीलकर्ता
ता. मिरज, जि. सांगली.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, सांगली, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, सांगली, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८०/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अरुण रामचंद्र पवार
मु. पो. कसबे डिग्रज, वॉर्ड नं. १
ता. मिरज, जि. सांगली.

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

दि न्यू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, इचलकरंजी या शाळेतील सेवाज्येष्ठता, पर्यवेक्षक पद, पर्यवेक्षक भत्ता आदिबाबत नियमानुसार कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यानी दिलेली माहिती चुकीची आहे. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अरुण रामचंद्र पवार यानी केली.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली, जि. सांगली श्री. शरद गोसावी यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. प्रशासकीय कार्यवाही कायदेशीर की बेकायदेशीर हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबासाहेब अमृत माळी
सहजीवन को. ऑप. हौसिंग सोसा. अपीलकर्ता
प्लॅट नं. ८३, पाचगाव, आर.के. नगर रोड, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६४/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. सचिन भिमाशंकर रावल

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. आर.एस.मिठारी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला कोणतेही शासकीय भाग भांडवल वा अर्थसहाय्य नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार ही बँक 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. ही भूमिका कायम ठेऊनही अपीलकर्त्यास माहिती दिली आहे. याच मागणीच्या अपील क्र. ७९७ व ७९८ मध्ये राज्य माहिती आयोगाने या पूर्वी निर्णय दिला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. आर. एस. मिठारी यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.यशवंत भाऊसाहेब ढवण
द्वारा विक्रम भिकाजी फुकटे
स.नं.६६/६७, सातवनगर, हांडेवाडी रोड, ग्रीन सिटीसमोर, हडपसर, पुणे-२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री रामराव विद्यामंदिर
हायस्कूल, जत, ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली श्री.डी.सी.लोंढे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री रामराव विद्यामंदिर
हायस्कूल, जत, ता.जत, जि.सांगली श्री.नंदकुमार माधवराव आळंदकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.यशवंत भाऊसाहेब ढवण यानी सेवानिवृत्ती वेतन मिळण्याबाबत मागितलेली माहिती देण्यात आली. अनेक मुद्दयांचे खुलासे त्यानी अर्जात विचारले असून सेवानिवृत्ती वेतनाबाबतचे अधिकार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे असल्याचे संबंधित नियमावलीच्या प्रतीसह त्याना वेळोवेळी कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री रामराव विद्यामंदिर हायस्कूल, जत, ता.जत, जि.सांगली श्री.नंदकुमार माधवराव आळंदकर यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री रामराव विद्यामंदिर हायस्कूल, जत, ता.जत, जि.सांगली यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. खुलासा, स्पष्टीकरण अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश जोतीराम म्हमाणे
विरंगुळा, साखर कारखाना समोर, अपीलकर्ता
सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक,
सहकारी संस्था महावीर नगर, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था महावीर नगर, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक,<br>सहकारी संस्था महावीर नगर, सांगली श्री. व्ही. पी. पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था महावीर नगर, सांगली श्रीमती जयश्री अरुण अमृतसागर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुरेश जोतीराम म्हमाणे यानी एका अधिका-यांच्या संदर्भातील विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. अशा प्रकारे अधिकारीनिहाय माहिती संकलित स्वरुपात ठेवली जात नाही. अपीलकर्त्यांनी अर्ज केला तेव्हा आपण जन माहिती अधिकारी नव्हतो. त्यानंतरच्या काळात आपल्याकडे जन माहिती अधिकारी, सांगली, जिल्हा देखरेख संघ, सहा निबंधक, मिरज, उपनिबंधक, वसंतदादा शेतकरी बँकेची वसुली, बालाजी सहकारी बँकेचे अवसायकपद, केंद्रीय कर्ज माफी गटाचे सदस्यत्व आदी पदभार होते. अपिलीय प्राधिका-यांच्या निर्णयानुसार त्वरित माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था महावीरनगर, सांगली श्रीमती जयश्री अरुण अमृतसागर व अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था महावीरनगर, सांगली श्री. व्ही. पी. पाटील यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता अपीलकर्त्यास हवी असल्याप्रकारे माहिती अभिलेखात ठेवली जात नसल्यामुळे आवश्यक तर अपीलकर्त्यांनी संबंधित अभिलेखांचे अवलोकन करुन कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था महावीरनगर, सांगली श्रीमती जयश्री अरुण अमृतसागर यांचे लेखी व तोंडी निवेदन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २४ जानेवारी २०११** — **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप गोपाळराव माणगांवकर
रा. ८/१२, गांधी चौक, इचलकरंजी, अपीलकर्ता
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्याधिकारी,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९३/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. दिलीप गोपाळराव माणगांवकर<br>रा. ८/१२, गांधी चौक, इचलकरंजी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,<br>इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. नितीन ना. देसाई<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्याधिकारी,<br>इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर डॉ. श्रीकांत विश्वनाथ सुर्यवंशी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ढकलगाडया दुरुस्तीबाबतची निविदा नगरपरिषदेने काढली असून त्या संदर्भातील अचूक माहिती अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशानंतरही दिली गेली नाही. याच विषयाच्या संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी याना दिले होते. हा अहवाल अद्याप मिळालेला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दिलीप गोपाळराव माणगांवकर यानी केली.

अपीलकर्त्यांच्या दि. ३.१२.२००८ च्या अर्जाला दि. ३१.१२.२००८ रोजी उत्तर व माहिती दिली. नवीन ढकलगाडया खरेदीच्या प्रस्तावात 'दुरुस्ती' अशी तांत्रिक चूक झाली असून आवश्यक असल्यास अपीलकर्ता सर्व अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती घेऊ शकतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा आरोग्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर डॉ. श्रीकांत विश्वनाथ सुर्यवंशी व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. नितीन ना. देसाई यानी केले.

नगरपरिषदेकडे आजमितीला असलेल्या ढकलगाडयांची नेमकी संख्या व त्यातील दुरुस्त किती आणि नादुरुस्त किती याचा नेमका तपशील जन माहिती अधिकारी तथा आरोग्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर डॉ. श्रीकांत विश्वनाथ सुर्यवंशी यानी अपीलकर्त्यास पुरवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रमेश शंकर भाकरे
मु.पो.बुधगाव, ता.मिरज, **अपीलकर्ता**
जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विश्वस्त,**
दि. हिंद एज्युकेशन सोसायटी, मिरज द्वारा आर.एम.हायस्कूल,
मिरज, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
न्यू इंग्लिश स्कूल नरवाड,
ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८९/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जून २००६ ते एप्रिल २००७ या कालावधीतील नवीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मिळालेल्या मान्यतेसंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.रमेश शंकर भाकरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२९.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल नरवाड, जि.सांगली यांचेवर दंडात्मक कारवाई करावी,

तसेच विश्वस्तांनी प्रथम अपील स्वीकारले नाही', असे अपीलकर्ता श्री.भाकरे यानी सांगितले. अपीलकर्त्याने अन्य व्यक्तीची (श्री.राहुल साळुंखे यांची) व्यक्तिगत माहिती मागितली असून संपूर्ण माहिती यु.पी.सी ने पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल नरवाड, जि.सांगली श्री.प्रताप सिताराम जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा विश्वस्त, दि हिंद एज्युकेशन सोसायटी, मिरज द्वारा आर.एम.हायस्कूल, मिरज, जि.सांगली श्रीमती मंगला हिंदूराव साळुंखे यांचे प्रतिनिधी ॲड.एच.व्ही.जोशी यानी सांगितले. अपीलकर्त्याने शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे प्रथम अपील न करता संस्थेच्या विश्वस्तांकडे केले आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल नरवाड, जि.सांगली यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

ॲड.श्रीपाद दत्तात्रय आष्टेकर
४६/५, जानकी निवास, मंगळवार पेठ, **अपीलकर्ता**
ता.जत, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१०/सांगली |
| २ | **जोडपत्र अ ची छायाप्रत सोबत जोडली आहे.** | |

**विवेचन**

अपीलकर्ता ॲड.श्रीपाद दत्तात्रय आष्टेकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. माहिती उपलब्ध असतानाही उपलब्ध नाही असे उत्तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर

महानगरपालिका, सांगली यानी दिले व प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यानी आदेश दिल्यानंतर अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली. बांधकामाची पाहणी करुन माहिती देणे शक्य होते. तडजोडीमध्ये ४५ दिवसात पूर्तता करण्याचे ठरले असतानाही तडजोडीप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी श्री.आष्टेकर यानी केली.

अपीलकर्त्यानी मागणी केलेली माहिती ही नगररचना शाखेशी संबंधित असल्यामुळे सहाय्यक संचालक, नगररचना यानी जी माहिती उपलब्ध करुन दिली ती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली नात्याने अपीलकर्त्यास दिली. अनधिकृत बांधकाम पाडण्याची कारवाई करण्याची आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज श्री.शिवाजी रसाळे आणि प्रभारी आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.यशवंतराव बी. माळी यानी सांगितले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यानी माहिती दिलेली आहे. तडजोडीप्रमाणे कार्यवाही करावी, ही अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २४ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती वंदना रामचंद्र पैलवान
रसिका, सावंत प्लॉट, गुलमोहोर कॉलनी, **अपीलकर्ता**
वसवाडे हॉस्पिटल शेजारी,
सांगली-४१६ ४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
आरफळ कालवे विभाग, करवडी ता.कराड,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४०/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आरफळ कालवे विभाग सा.क्र.१७५/१०० येथील मायनर क्र.१३ बाबतची माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्त्या श्रीमती वंदना रामचंद्र पैलवान यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.४.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी

अभियंता, आरफळ कालवे विभाग, करवडी ता.कराड, जि.सातारा यानी आपणास मागणीप्रमाणे वेळेत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, जि.सातारा यांच्या आदेशानुसार माहिती दिली. तथापि दिलेला नकाशा चुकीचा/खोटा आहे, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती वंदना रामचंद्र पैलवान यानी केली.

अपीलकर्त्यानी मागणी केलेली माहिती ही क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन दिली. माहिती-मागणी अर्जातील सर्व मुद्दयांची माहिती दिलेली आहे. त्यांची मूळ मागणी ही नुकसान भरपाई मिळावी अशी आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, आरफळ कालवे विभाग, करवडी ता.कराड, जि.सातारा श्री.एच.व्ही.गुंणाले यानी केले. सातत्याने त्याच मागणीसाठी अपीलकर्ता अर्ज व अपिले करीत असून वेळोवेळी उत्तरे दिली आहेत. मंजूर नकाशाव्यतिरिक्त दुसरा नकाशा नाही व तोच नकाशा दिला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जि.सातारा श्री.पी.सी.घोलप यानी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, आरफळ कालवे विभाग, करवडी ता.कराड, जि.सातारा यानी अपीलकर्त्यास माहिती दिलेली आहे. चुकीचे काम करण्यात आलेले आहे, हा अपीलकर्त्याचा आक्षेप ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची बाब नाही. अशा प्रकारे त्याच त्याच व तेही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेबाहेरील विषयासाठी अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळकृष्ण महादेव आपटे
२७३, प्रताप सहकारी संस्था, सहकारनगर क्र.२, पुणे-९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता (पथ),
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (पथ),
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळकृष्ण महादेव आपटे
२७३, प्रताप सहकारी संस्था, सहकारनगर क्र.२, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता (पथ),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.नामदेव नथुजी बारापात्रे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (पथ),<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण वा.गेडाम | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पुण्यातील रस्त्यांबाबतची आपण मागितलेली माहिती दहा महिन्यानी-कालच दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण महादेव आपटे यानी केली.

सहकारनगर क्र.२ मधील कोहिनूर कॉलनीतील एका रस्त्याच्या कामाबद्दल अपीलकर्ता श्री.आपटे यांची तक्रार होती व त्या अनुषंगाने १८ मुद्दयांवर त्यानी माहिती मागितली होती. अभिप्राय, खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाचे अनेक मुद्दे त्यात आहेत. तरीही प्रत्यक्ष जागेवर त्याना काम दाखवून दि.९.३.२०१० व दि.११.३.२०१० रोजी सविस्तर माहिती तोंडी देण्यात आली होती. त्यानी केलेल्या प्रथम अपिलानंतरही प्रत्यक्ष जागेवरील पाहणी व त्यानुसार उत्तर त्यांना पाठविण्यात आले. त्यावर त्यानी उपस्थित केलेल्या मुद्दयांना काल उत्तर देण्यात आले. सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता(पथ), पुणे महानगरपालिका श्री.सुभाष पावरा व सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता(पथ), पुणे महानगरपालिका श्री.विठ्ठल इंगवले याना माहिती देण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानी अपीलकर्त्यास लेखी कळविले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पथ), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण वा.गेडाम व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता (पथ), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.नामदेव नथुजी बारापात्रे यानी केले.

खुलासा, अभिप्राय, संभाव्य कारवाई अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच तक्रारीवरील प्रशासकीय कार्यवाही व माहिती यांची सरमिसळ अपीलकर्त्यांनी केली असून जन माहिती अधिकारी यानीही तशीच कार्यवाही केली आहे. असे न करता माहितीच्या अधिकारातील अर्जाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या विहित मुदतीत उत्तर / माहिती देणे आवश्यक आहे. त्याचे पालन काटेकोर न झाल्यास संबंधित शास्तीस पात्र ठरतील, याची समज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पथ), पुणे

महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण वा.गेडाम, सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता(पथ), पुणे महानगरपालिका श्री.सुभाष पावरा व सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता(पथ), पुणे महानगरपालिका श्री.विठ्ठल इंगवले यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रणजित संपतराव जाधवराव
फ्लॅट नं.१२, बिल्डिंग डी-१६, सुंदर गार्डन, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे-५१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(जनरल), यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त(जि.घ), यांचे कार्यालय, सेवकवर्ग
विभाग कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रणजित संपतराव जाधवराव
फ्लॅट नं.१२, बिल्डिंग डी-१६, सुंदर गार्डन, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे-५१

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(जनरल), यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त(जि.घ), यांचे कार्यालय, सेवकवर्ग विभाग कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयातकर प्रमुखांच्या एका पत्रावरील कार्यवाही व तीन वर्षात बदली न झालेले कर्मचारी / अधिकारी यांच्या संदर्भातील माहिती विहित मुदतीत मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रणजित संपतराव जाधवराव यानी केली.

श्री.जाधवराव यांच्या दि.१५.४.२०१० च्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त(जि.घ), सेवकवर्ग विभाग कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.खेमजी भोईर यानी दि.१२.५.२०१० रोजी उत्तर देऊन काही माहिती दिली व शुल्क कळविले. मुद्दा क्र.१ ची माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून श्री.जाधवराव यानी प्रथम अपील केले. संबंधित माहितीची व्याप्ती लक्षात घेता श्री.जाधवराव याना संबंधित संचिकांचे अवलोकन करू द्यावे व त्यातील आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करून द्याव्यात. तसेच मुद्दा क्र.२ मधील माहिती तपशिलवार १५ दिवसांत उपलब्ध करून द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(जनरल), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.कुंडलिक कारकर यानी दि.१९.६.२०१० रोजी दिले. तथापि या माहितीचे संकलन करण्यास लागलेल्या अवधीमुळे दि.३.८.२०१० रोजी माहिती दिली, असे प्रतिपादन विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त(जि.घ), सेवकवर्ग विभाग कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे अनुक्रमे श्री.रामदास बापू जाधव व श्री.खेमजी भोईर यांनी पूरक कागदपत्रांसह केले. श्री.जाधवराव यानी कार्यालयात येऊन अभिलेखांचे अवलोकन करणे अपेक्षित होते. परंतु ते आले नाहीत व माहितीबाबत त्यानी नंतर काही कळविले नाही, असे प्रतिपादन

अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(जनरल), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.कुंडलिक कारकर यानी केले.

अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास तीन दिवसांत संबंधित संचिकेचे अवलोकन करावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त(जि.घ), सेवकवर्ग विभाग कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यानी निःशुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर शरणप्पा तोंडारे
फ्लॅट नं.सी-७, साई इेरिटेज को.ऑप.हौ.सो.लि.,
स.नं.२४०/१/१+२+३, बाणेर, पुणे-७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अग्निशमन अधिकारी, मध्यवर्ती अग्निशमन
केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे महानगरपालिका, पुणे-४२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक विभागीय अधिकारी, मध्यवर्ती अग्निशमन
केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे महानगरपालिका, पुणे-४२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर शरणप्पा तोंडारे
फ्लॅट नं.सी-७, साई इेरिटेज को.ऑप.हौ.सो.लि.,
स.नं.२४०/१/१+२+३, बाणेर, पुणे-७

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अग्निशमन अधिकारी, मध्यवर्ती अग्निशमन
केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रशांत दादाराम रणपिसे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक विभागीय अधिकारी, मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.दत्तात्रय नारायण नागलकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

विकसकाने इमारतीत उभी केलेल्या अग्निशमन यंत्रणेला ना हरकत दाखला देताना केलेल्या चाचणीविषयीची माहिती व तपासणी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विभागीय अधिकारी, मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे महानगरपालिका, पुणे यानी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शंकर शरणप्पा तोंडारे यानी केली.

अपीलकर्ता यानी सन २००२ मधील चाचणीबाबतची माहिती मागितली असून त्या कालावधीत अशा प्रकारची चाचणी घेतली जात नव्हती. त्यामुळे अहवालाची प्रत मुळातच नाही. त्यामुळे ती माहिती देणे शक्य नाही. उपलब्ध माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विभागीय अधिकारी, मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.दत्तात्रय नारायण नागलकर यानी केले.

अपीलकर्ता यानी विचारणा केलेल्या इमारतीतील यंत्रणेबाबत तपासणी करून अहवालाची प्रत नंतर अपीलकर्त्यास दिली. सन २००८ पासून अशा प्रकारची तपासणी केली जाऊन अहवाल उपलब्ध असतात, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अग्निशमन अधिकारी, मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रशांत दादाराम रणपिसे यानी केले.

सन २००२ मध्ये अशा प्रकारचे तपासणी अहवाल ठेवले जात नव्हते, असे अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विभागीय अधिकारी, मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे महानगरपालिका, पुणे यानी लेखी द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वजीर मोहमंद शेख
गांधी चौक, दौंड, ता.दौंड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.वजीर मोहमंद शेख<br>गांधी चौक, दौंड, ता.दौंड, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या शिंदे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, पुणे श्री.के.एन.चौधरी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

नूर एज्युकेशन सोसायटी मैंदर्गी यांच्या दौंड येथील उस्मानअली शाब्दी उर्दू हायस्कूल या शाळेला बक्षिसपत्राने जागा मिळालेली असूनही संस्था, शाळा व संबंधित अधिकारी मिळून शासनाचे

अनुदान लाटत असल्याची शंका आहे. त्या अनुषंगाने मागितलेली माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.वजीर मोहम्मद शेख यानी केली.

माहिती आपल्या कार्यालयाच्या कक्षेतील नसून संस्थेकडून मागविली. परंतु संस्थेने दिली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री.के.एन.चौधरी यानी केले.

अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेला विषय सार्वजनिक निधीच्या विनियोगाच्या दृष्टीने महत्त्वाचा असून संबंधित माहिती संस्था देत नसल्यास जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री.के.एन.चौधरी व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या शिंदे यानी प्रशासकीय अधिकारात माहिती प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरविणे व वस्तुस्थितीची शहानिशा करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) नूर एज्युकेशन सोसायटी मैंदर्गी या संस्थेला दौंड येथील उस्मानअली शाब्दी उर्दू हायस्कूल या शाळेसाठी भाड्यापोटी मिळणारे शासकीय अनुदान व जागेची मालकी याबाबतची माहिती पुराव्याच्या कागदपत्रांसह जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यानी प्राप्त करून घेऊन पर्यंत अपीलकर्त्यास पुरवावी व अनुपालन अहवाल माहितीच्या प्रतींसह दि.५.२.२०११ आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिल विष्णु जावडेकर
२४५, गृहकुल सोसायटी, सहकारनगर क्र. १, अपीलकर्ता
गुलटेकडी, पुणे - ३७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलगुरु,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे - ३७
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लघुलेखक,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे - ३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अनिल विष्णु जावडेकर
२४५, गृहकुल सोसायटी, सहकारनगर क्र. १, गुलटेकडी, पुणे - ३७

**जन माहिती अधिकारी** तथा लघुलेखक,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे श्रीमती वीणा कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार आलेले अर्ज, उमेदवारांच्या मुलाखती, अधिका-यांनी मारलेले शेरे व निर्णय इ. संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी चुकीची व अपूर्ण दिली. आमच्या संदर्भात माहिती दिली. परंतु इतर उमेदवारांच्या संदर्भातील नावे व माहिती दिली नाही. विद्यापीठाचे कुलगुरु हे अपिलीय प्राधिकारी असताना कुलसचिवांनी अधिकार नसूनही पत्र पाठविले व कुलगुरुंनी असलेले अधिकार न वापरता अपिलाचा निर्णय घेतला नाही. त्यामुळे या दोघांवरही माहिती अधिकार कायद्यानुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी. माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. अनिल विष्णु जावडेकर यानी केली.

श्री. जावडेकर यांच्या दि. ५.१०.२०१० च्या अर्जाला दि. १४.१०.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. कुलसचिवांनी नंतरच्या त्यांच्या पत्राला उत्तर दिले आहे, अपिलाचा निर्णय दिलेला नाही. श्री. जावडेकर यांची मुख्य तक्रार त्याना सेवेत न घेतल्याबाबतची असून शैक्षणिक पात्रतेत ते बसत नसल्यामुळे तसा निर्णय करण्यात आला. संबंधित विषयातील सर्व संचिका त्याना आवश्यक असल्यास अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिली जाईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा लघुलेखक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे श्रीमती वीणा कुलकर्णी यानी केले.

जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तथापि उमेदवारांची नावे दिलेली नाहीत, व मुद्दा क्र. २ व ४ ची माहिती 'प्रशासकीय बाब' असल्याच्या कारणावरुन नाकारली आहे. संबंधित निवडप्रक्रिया पूर्ण झाली असल्यास अशा प्रकारे माहिती नाकारता येणार नाही. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास एक आठवडयात संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १६.४.२०१० रोजी श्री.जावडेकर याना संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन माहिती दिली, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा लघुलेखक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे श्रीमती वीणा कुलकर्णी यानी दि. २१.४.२०१० च्या पत्रान्वये सादर केला. श्री. जावडेकर यानी विविध विषयांवर माहिती मागणारे तेरा अर्ज केले असून या आठवडयात पुन्हा दोन अर्ज केले आहेत, असे त्यानी अहवालात नमूद केले आहे. मात्र उमेदवारांची यादी, त्यांचे बायोडाटा, शैक्षणिक प्रमाणपत्रे ही माहिती दिली नाही. दि. १४.१०.२००९ च्या उत्तरात जन माहिती अधिकारी यानी

५० उमेदवारांचे अर्ज असल्याचे लिहिले होते. संचिकापाहणी नंतरच्या उत्तरात ५९ उमेदवारांचे अर्ज असल्याचे दाखविले. ५९ उमेदवारांची यादी कशी झाली ? अधिका-यांचे शेरे देता येत नसल्याचे आधी कळविले होते. 'काही शेरे पेन्सिलने, काही शेरे शाईने लिहिलेले होते', अशी माहिती दि. १६.४.२०१० च्या पत्रात देऊन दिशाभूल केली आहे. टंकलेखनाच्या कामात ३ सेवक कार्यरत आहेत, असे उत्तर आता दिले असून दि. २२.९.२००९ रोजी आपल्याला दिलेल्या पत्रात 'टंकलेखन करण्याचे काम जॉबवर्क पध्दतीने आपणास देण्यात आले होते, सदर काम आता पूर्ण झाले आहे', असे म्हटले आहे. ही विसंगत माहिती आहे, अशी तक्रार श्री. जावडेकर यानी दि. २७.४.२०१० च्या पत्रान्वये केली.

उमेदवारांची संख्या ५० की ५९ याबाबतची नेमकी संख्या व दोन उत्तरातील तफावतीचे कारण जन माहिती अधिकारी तथा लघुलेखक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे यानी स्पष्ट करणे आवश्यक आहे. जॉबवर्क आदिबाबतच्या अपीलकर्त्यांच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत. तसेच पत्राला उत्तर पाठविणारे (कुलसचिव) व अपिलीय प्राधिकारी (तथा कुलगुरु, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ) यांच्यावर दंडात्मक अथवा फौजदारी कारवाई करण्याची या अधिनियमात तरतूद नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव सखाराम पोवार
२६५१ डी डांगेगल्ली, जुना बुधवार पेठ, अपीलकर्ता
कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
नगररचना विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२९/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
नगररचना विभाग, कोल्हापूर महानगरपालिका,
जि. कोल्हापूर श्री. मारुती दगडू राठोड

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. म. य. देवडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाला परवानगी दिलेल्या जागेच्या संदर्भात माहिती दिली जात नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. सदाशिव सखाराम पोवार यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केली आहे. परंतु याच संदर्भात त्यानी आतापर्यंत २० अर्ज केले असून वेळोवेळी त्याना माहिती देण्यात आली आहे. त्यानी माहिती स्वीकारली नाही तेव्हा टपालाने पाठविली. त्यांच्या याच मागणीच्या संदर्भात आयोगाने अपील क्र. ५५६/कोल्हापूर, अपील क्र. १४८+४४४/२००९/कोल्हापूर ही अपिले निकाली काढली आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, जि. कोल्हापूर श्री. मारुती दगडू राठोड व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. ओमप्रकाश दिवटे यानी केले.

निर्णय झालेल्या विषयासंदर्भात पुन्हा पुन्हा अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणाचा वेळ व कार्यशक्ती

यांचा अपव्यय करण्याची अपिलकर्त्यांची कृती योग्य नाही, याबाबत त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु. पो. पेठ वडगांव, अपीलकर्ता
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर ४१६ ११२

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
वडगाव नगर परिषद, पेठ वडगाव, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिफ मेडिकल ऑफिसर,
वडगाव नगर परिषद, पेठ वडगाव, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१६/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, वडगाव नगर परिषद, पेठ वडगाव, जि. कोल्हापूर श्री. विनायक आत्माराम वाठारे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा चिफ मेडिकल ऑफिसर, वडगाव नगर परिषद, पेठ वडगाव, जि. कोल्हापूर डॉ. नूतन रमाकांत पोटे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कर्मचा-यांच्या उपस्थितीसंदर्भात अपीलकर्ता यानी केलेल्या तक्रारीची वरिष्ठ लिपिक, वडगाव नगर परिषद यानी कार्यालयीन स्तरावर शहानिशा करुन महाराष्ट्र सेवा नियम १९८१ नुसार उचित कार्यवाही करावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिलेले असूनही त्यानुसार कार्यवाही झालेली नाही, ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सतीश नरसू मोरे यानी लेखी निवेदनाद्वारे केली.

अपीलकर्ता श्री. सतीश नरसू मोरे यानी दि. १४.५.२००९ च्या अर्जान्वये विविध मुद्दयांच्या संदर्भात स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची विचारणा केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील व्याख्येनुसार ती 'माहिती' ठरत नाही. तरीही दि. १२.६.२००९ च्या अर्जान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य वैद्यकीय अधिकारी , वडगाव नगर परिषद, पेठ वडगाव, जि. कोल्हापूर डॉ. नूतन रमाकांत पोटे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तसेच या

अधिनियमांतर्गत अपिलाच्या आदेशात प्रशासकीय कार्यवाहीचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, वडगाव नगर परिषद, पेठ वडगाव, जि. कोल्हापूर श्री. विनायक आत्माराम वाठारे यानी दिले आहेत. हे उल्लेखनीय असले तरी अधिनियमाच्या चौकटीत बसणारे नाही. तथापि या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्य वैद्यकीय अधिकारी , वडगाव नगर परिषद, पेठ वडगाव, जि. कोल्हापूर डॉ. नूतन रमाकांत पोटे यानी अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश बाबुराव कोले
घ. नं. ५४४, सी वॉर्ड, रविवार पेठ, अपीलकर्ता
सबजेल समोर, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
पोलिस प्रशिक्षण विद्यालय,
खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्राचार्य,
पोलिस प्रशिक्षण विद्यालय,
खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४३/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुरेश बाबुराव कोले
घ. नं. ५४४, सी वॉर्ड, रविवार पेठ,
सबजेल समोर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण विद्यालय,
खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे श्री. एम. आर. घुर्ये

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण विद्यालय,
खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे श्री. जे. पी. तिवटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. सुरेश बाबुराव कोले यानी

केली.

गेल्या चार वर्षांपासून अपीलकर्ता कार्यालयात न येता गैरहजर आहेत. त्यांच्या अर्जाला वेळोवेळी उत्तर व माहिती देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी उप प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे श्री. जे. पी. तिवटे व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे श्री. एम. आर. घुर्ये यानी केले.

अपीलकर्ता श्री. सुरेश बाबुराव कोले याना आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार 'मागितलेली माहिती मला मिळालेली आहे, माझी काहीही तक्रार नसून मी समाधानी आहे', असे लेखी निवेदन दि. २९.१२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे श्री. एम. आर. घुर्ये याना दिले. दिलेल्या माहितीच्या मुद्देनिहाय उत्तरासह त्याची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे श्री. एम. आर. घुर्ये यानी आयोगास दि. २९.१२.२०१० च्या पत्रान्वये सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर तुकाराम शिंदे
१०२ केदारलिंग सोसायटी, मु. रिस, अपीलकर्ता
पो. मोहोपाडा, ता. खालापूर जि. रायगड

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, शाहुवाडी, मु. पो. ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर,
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सवते, पो. शिंपे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६३/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. मधुकर तुकाराम शिंदे<br>१०२ केदारलिंग सोसायटी, मु. रिस,<br>पो. मोहोपाडा, ता. खालापूर जि. रायगड<br><br>**अपीलकर्ता -** यांचे प्रतिनिधी श्री. आनंद परशुराम विद्वांस<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती, शाहुवाडी, मु. पो. ता. शाहुवाडी<br>जि. कोल्हापूर श्री.व्ही.एन.ढाले<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत सवते, पो. शिंपे, ता. शाहुवाडी,<br>जि. कोल्हापूर श्री.एम.बी.जाधव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या जागेवर झालेल्या अतिक्रमणासंबंधी आपण तक्रार केली असून आपल्या समक्ष जागेची
मोजणी केली नाही. त्याबाबत मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीमुळे चुकीच्या नोंदी रद्द करणे ग्रामसेवकांना भाग पडले. तथापि अतिक्रमण हटवून जागेचा ताबा अद्याप आपल्याला दिलेला नाही, तो द्यावा, अशी लेखी व तोंडी मागणी अपीलकर्ता श्री. मधुकर तुकाराम शिंदे व त्यांचे प्रतिनिधी श्री. आनंद परशुराम विद्वांस यांनी केली.

अपीलकर्त्यांच्या पत्त्यावर माहिती पाठविली असून त्यांच्या पत्नीची पोहोचदर्शक स्वाक्षरी आहे. जागेच्या मालकी हक्कासंबंधी कागदपत्रे सादर करण्यास सांगूनही त्यानी अद्याप कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. माहिती देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सवते, पो. शिंपे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर श्री.एम.बी.जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शाहुवाडी, मु. पो. ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर श्री.व्ही.एन.ढाले
यांनी केले.

आपण केलेल्या सहीच्या वरील भागात नंतर इतर मजकूर लिहिला गेला. ग्रामसेवक व सरपंच यानी आपल्याला धमकावले इ. तक्रारीही अपीलकर्त्यांनी नमूद केल्या. तथापि या तक्रारी व त्यांची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बापूजी भाऊराव घोरपडे
काळाराम मंदिराजवळ कुरुंदवाड, अपीलकर्ता
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी ,
कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पाणी पुरवठा विभाग प्रमुख,
कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६३/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी ,
कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड, ता. शिरोळ,
जि. कोल्हापूर श्रीमती शिल्पा प्रताप दरेकर

**जन माहिती अधिकारी** तथा पाणी पुरवठा विभाग प्रमुख,
कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड, ता. शिरोळ,
जि. कोल्हापूर श्री. आप्पासाहेब कृष्णा शेडबाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बापूजी भाऊराव घोरपडे यानी दि. २७.७.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि. २४.८.२००९ च्या पत्रान्वये देण्यात आली. त्यानी प्रथम अपील केलेले नाही. राज्य ग्राहक मंच, मुंबई यांच्याकडील त्याना हवी असलेली माहिती सदर मंचाकडूनच त्यानी घेणे आवश्यक आहे. तसे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पाणी पुरवठा विभाग प्रमुख, कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर श्री. आप्पासाहेब कृष्णा शेडबाळे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी ,

कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर श्रीमती शिल्पा प्रताप दरेकर यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे. दाव्यातील यशस्वी पक्षाला खर्चाची रक्कम मिळणे आदि मुद्दे अपीलकर्त्यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात उपस्थित केले असून ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २५ जानेवारी २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.भिमराव जयसिंग लगड (अ.क्र.५११ /२०१०/ पुणे )
द्वारा भिमसेन निकम, वृंदावन निवास, सर्व्हे नं.७३, ज्योतिबानगर, काळेवाडी, पुणे-१७
(२)श्री.रामदास बबन जाधव (अ.क्र.५१२/२०१०/ पुणे)
द्वारा-श्री.पी.बी.दोरगे, आदिनाथ कॉलनी, श्रीनगर, रहाटणी, पुणे-१७ अपीलकर्ता
(३)श्री.संदिप गजानन भोईटे (अ.क्र.५१३/२०१०/ पुणे)
द्वारा-श्री.यू.एस.भोईटे, ७५/६, एकता कॉलनी, ज्योतिबानगर, काळेवाडी, पुणे-१७
(४)श्री.नवनाथ रामदास देवकर (अ.क्र.५१४/२०१०/ पुणे)
शिवचैतन्य, सर्व्हे नं.५५/२, देवकर पथ, त्रिमूर्ती कॉलनी, नवीन सांगवी, पुणे-२७
(५)श्री.नवनाथ दामोदर गारगोटे (अ.क्र.७८३/२०१०/ पुणे)
स.नं.४९/१/१, अ,भारत कॉलनी, रहाटणी-काळेवाडी लिंक रोड, रहाटणी, पुणे-१७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, शिवतेज क्रिडा व शिक्षण मंडळ, लाभताधाम,
तापकीरनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे- १७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, कै.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्या
मंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे-१७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५११+५१२+५१३+५१४/२०१०/ पुणे, ७८३/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता**
(१)श्री.भिमराव जयसिंग लगड (अ.क्र.५११ /२०१०/ पुणे )

| | |
|---|---|
| | द्वारा भिमसेन निकम, वृंदावन निवास, सर्व्हे नं.७३, ज्योतिबानगर, काळेवाडी, पुणे-१७<br><br>(२)श्री.रामदास बबन जाधव (अ.क्र.५१२/२०१०/ पुणे)<br>द्वारा-श्री.पी.बी.दोरगे, आदिनाथ कॉलनी, श्रीनगर, रहाटणी, पुणे-१७<br>(३)श्री.संदिप गजानन भोईटे (अ.क्र.५१३/२०१०/ पुणे)<br>द्वारा-श्री.यू.एस.भोईटे, ७५/६, एकता कॉलनी, ज्योतिबानगर, काळेवाडी, पुणे-१७<br>(४)श्री.नवनाथ रामदास देवकर (अ.क्र.५१४/२०१०/ पुणे)<br>शिवचैतन्य, सर्व्हे नं.५५/२, देवकर पथ, त्रिमूर्ती कॉलनी, नवीन सांगवी, पुणे-२७<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, शिवतेज क्रिडा व शिक्षण मंडळ, लाभताधाम, तापकीरनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे श्री.मल्हारी भाऊसाहेब तापकीर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, कै.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्यामंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे श्रीमती उल्का रणजित जगदाळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

उपरोक्त अपिलांच्या दि.२८.७.२०१० व २७.९.२०१० रोजी आयोगापुढील सुनावणीला जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते. म्हणून दि.२६.१०.२०१० रोजी अंतिम सुनावणी घेण्यात आली. श्री.भिमराव जयसिंग लगड, श्री.रामदास बबन जाधव, श्री.संदिप गजानन भोईटे, श्री.नवनाथ रामदास देवकर व श्री.नवनाथ दामोदर गारगोटे या सर्व अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कै.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्यामंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, शिवतेज क्रिडा व शिक्षण मंडळ, लाभताधाम, तापकीरनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे यांच्याकडे अर्ज व अपिले केली आहेत. सर्वांच्या मागण्या व तक्रारी समान स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे सर्व अपिलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

आपल्या नियुक्तीची प्रत्यक्षातील तारीख व नोंद केलेली तारीख, दिलेले वेतन, सहाव्या वेतन आयोगानुसार केलेली वेतननिश्चिती आदिंबाबत खोटी व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कै.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्यामंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, शिवतेज क्रिडा व शिक्षण मंडळ, लाभताधाम, तापकीरनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे देत आहेत. सेवापुस्तकात चुकीच्या तारखांच्या नोंदी केल्या आहेत व दोन तारखांमधील कालावधीच्या वेतनवाढी दिल्या जात नाहीत. रजिस्टर्ड टपालाने पाठविलेले अर्जही स्वीकारले जात नाहीत व कोणतीही खरी कागदपत्रे दिली जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.भिमराव जयसिंग लगड, श्री.रामदास बबन जाधव, श्री.संदिप गजानन भोईटे व श्री.नवनाथ रामदास देवकर यानी केली.

अपीलकर्त्यांचे अर्ज आल्यानंतर शुल्क कळविले. परंतु ते न भरल्यामुळे माहिती दिली नाही. शाळेकडील अभिलेखानुसार प्रती व माहिती देण्याची तयारी तेव्हाही दर्शविली असून वेतनविषयक तक्रारीबाबत यातील कोणीही लेखी स्वरूपात अर्ज दिलेले नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कै.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्यामंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे श्रीमती उल्का रणजित जगदाळे यानी केले.

आयोगापुढील सुनावणीची सूचनापत्रे न मिळाल्यामुळे हजर राहता आले नाही. अपीलकर्त्यांनी संस्थेच्या सचिवांकडे अर्ज न करता पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळाकडे अर्ज केले होते. शिक्षण मंडळाकडून ते आपल्याला प्राप्त झाल्यानंतर सर्वांना शुल्क कळविणारे पत्र पाठविण्यात आले. परंतु त्यांनी शुल्क भरले नाही. तसेच संस्थेला त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीच ते मागत असून सातत्याने विविध पातळ्यांवर तक्रारी व अर्ज करून संस्थेला त्रास देत आहेत. सन २००७ ते २००८ च्या मध्यरात्री संस्थेच्या कार्यालयाला लागलेल्या आगीत कागदपत्रे जळाल्यामुळे सन २००४-२००५ ची माहिती देता येणार नाही. अन्य सर्व माहिती देता येईल व अपीलकर्त्यांना हवी असल्यास

कागदपत्रे पाहता येतील, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, शिवतेज क्रिडा व शिक्षण मंडळ, लाभताधाम, तापकीरनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे श्री.मल्हारी भाऊसाहेब तापकीर यानी केले.

अपीलकर्त्यांना पत्र पाठविल्याची जावक रोजनिशीतील नोंदीची छायाप्रत आयोगाला सादर करावी, अपीलकर्त्यांना दि.३१.१०.२०१० पर्यंत शुल्क कळवावे व शुल्क भरल्यानंतर दि.५.११.२०१० पर्यंत माहिती देऊन अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कै.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्यामंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे श्रीमती उल्का रणजित जगदाळे यानी दि.२७.१०.२०१०च्या पत्रान्वये जावक बारनिशीची छायाप्रत सादर केली. अपीलकर्त्यास माहिती दिल्याचा अहवालही त्यानी सादर केला. तथापि मिळालेली माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.भिमराव जयसिंग लगड, श्री.रामदास बबन जाधव, श्री.संदिप गजानन भोईटे व श्री.नवनाथ रामदास देवकर यांनी दि.२९.१२.२०१० च्या पत्रान्वये व श्री.नवनाथ दामोदर गारगोटे यानी दि.११.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्याबाबत आयोगाने दि.५.१.२०११ व दि.१०.१२.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविला. मात्र मूळ अभिलेखानुसार सर्व माहिती व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या असून संस्थेने व शाळेने दिलेल्या माहितीबाबत कोणतीही शंका असल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कै.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्यामंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे अथवा अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, शिवतेज क्रिडा व शिक्षण मंडळ, लाभताधाम, तापकीरनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे याना भेटावे असे कळवूनही त्यानी संपर्क साधलेला नाही, असा खुलासा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कै.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्यामंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे श्रीमती उल्का रणजित जगदाळे यानी दि.१७.१.२०११ च्या पत्रान्वये (श्री.भिमराव जयसिंग लगड, श्री.रामदास बबन जाधव, श्री.संदिप गजानन भोईटे व श्री.नवनाथ रामदास देवकर यांच्या तक्रारीवरील अहवाल) व दि.४.१.२०११ च्या पत्रान्वये (श्री.नवनाथ दामोदर गारगोटे यांच्या तक्रारीवरील अहवाल) आयोगाला सादर केला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता माहितीबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे. अपीलकर्त्यांनी केलेल्या तक्रारीमध्ये नियुक्तीच्या तारखा, वेतन आदिंबाबतचे आक्षेप नोंदविले असून त्यानुसार माहिती चुकीची असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे. परंतु कार्यवाहीच्या योग्यायोग्यतेबाबतची शहानिशा हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विनोद बक्का वाघेला
दावणे गल्ली, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल, तहसील कार्यालय, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल,
तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९७ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विनोद बक्का वाघेला
दावणे गल्ली, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल, तहसील कार्यालय, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर डॉ.संपत कोंडाजी खिलारी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपील क्र.२०००/२००९ कोल्हापूरमध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार कळविलेले शुल्क माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार प्रतिपृष्ठ रुपये २ प्रमाणे न आकारता रूपये १०.१५ असे आकारले असून जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा हा प्रकार आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विनोद बक्का वाघेला यानी केली.

अपील क्र.२००० मधील माहितीसाठी आयोगाच्या आदेशाप्रमाणे ४९० पानांसाठी रूपये ९८० शुल्क कळविले होते. प्रस्तुत अपिलातील सर्व माहिती संकलित करून ठेवण्यात आली असून शासनाने निर्धारित केलेल्या नक्कल शुल्काप्रमाणे शुल्क कळविले आहे. अपीलकर्त्यांनी समक्ष माहिती पाहून ती चुकीची असल्याचे त्यांचे म्हणणे आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर डॉ.संपत कोंडाजी खिलारी यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नवनाथ बळीराम चौगुले
स.नं.२४४/१-अ, प्लॉट नं.६, मोझेनगर, येरवडा, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, भूमी आणि जिंदगी,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, भूमी आणि जिंदगी,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०१० |

**३. उपस्थित**
**९**
**अपीलकर्ता** श्री.नवनाथ बळीराम चौगुले
स.नं.२४४/१-अ, प्लॉट नं.६, मोझेनगर, येरवडा, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, भूमी आणि जिंदगी,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुधाकर तेलंग

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, भूमी आणि जिंदगी,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.अभिजीत डोंबे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मालकीच्या भूखंडातून ये-जा करण्यास दिवाणी न्यायालयाची मनाई असूनही या जागेतून सार्वजनिक रस्ता घोषित करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न नियमाबाह्य असून या जागेबाबत मालकीची माहिती आपणाकडे नाही, असे उत्तर जन माहिती अधिकाऱ्यानी दिले. म्हणून ४३५०० रूपये मोजणी शुल्क कशाच्या आधारे भरले, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावित रस्त्याचा तपशीलही देणे आवश्यक आहे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.नवनाथ बळीराम चौगुले यानी केली.

संबंधित रस्ता सार्वजनिक असून तो घोषित करण्याचा हा विषय आहे. जागेची मोजणी करण्याबाबतचे आदेश व शुल्क भरणा याबाबतची माहिती व सर्व कागदत्रांच्या छायाप्रती दिल्या. मोजणी करण्याची तारीख निश्चित नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, भूमी आणि जिंदगी, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुधाकर तेलंग यानी केले.

अपीलकर्त्यांनी अनेक मुद्दयांबाबत खुलासा व नियमानुसार कार्यवाही केल्याबाबतचा अभिप्राय यांची मागणी केली आहे. ते, तसेच संबंधित विषयातील कार्यवहीच्या कायदेशीरपणाबाबतचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र संबंधित जागेच्या मोजणीबाबतचा तपशील अपीलकर्त्यास दिला जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांनी नमूद केलेल्या जागेच्या मोजणीबाबतचा तपशील जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, भूमी आणि जिंदगी, पुणे महानगरपालिका, पुणे यानी निःशुल्क पुरवावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**